



ज्याप्रमाणे 'बीजा' मध्ये झाड आहे,
त्याची फुले आहेत आणि फळे आहेत.
त्याप्रमाणे मुलामध्ये संपूर्ण मनुष्य आहे.
- गिजुभाई

★ लहान मुल मेणाच्या गोळ्याप्रमाणे असते.
त्यापासून तो सर्वांगसुंदर, आदर्श मानव तयार होवू शकतो अथवा
एक विक्षिप्त स्वभावाचा मानव होवू शकतो.
तो कसा व्हावा हे आई-वडिलांच्या हाती असते.

★ हे पुस्तक एक निष्पाप मुलाचे सर्वांगसुंदर,
आदर्श मानव कसा घडवाल? याबाबत मार्गदर्शक आहे.

★ आजच्या छोटे कुटुंब पद्धतीकरिता एक दीपस्तंभ.

★ प्रत्येक आई वडिलांनी वाचावेच आणि
प्रत्येक घरात संग्रही असावेच असे पुस्तक.



लेखक
गिजुभाई



अनुवादक
प्रा. अनंत वाईकर
एम.ए. (राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास)

महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध
विद्याभारती प्रकाशन
गुजराती शाळेसमोर, मेन रोड, लातूर ४१३ ५१२.
फोन : (०२३८२) २४२७२१, २५८३८४
• मुंबई • पुणे • कोल्हापूर • नाशिक • जळगाव • औरंगाबाद • नांदेड • लातूर • अकोला • अमरावती • नागपूर

## मुलांचे व्यक्तिमत्त्व तुमच्या हाती

# आई वडिलांना

गिजुभाई
अनु. अनंत वाईकर



खास तुमच्या लाडक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

तुमच्या मुलाच्या व्यक्तिमत्त्व विकासात
तुमचा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा असतो.
मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक विकासासाठी पालक मार्गदर्शक पुस्तक.

विद्याभारती प्रकाशन

" मुलांचे व्यक्तिमत्व तुमच्या हाती "

# आई - वडिलांना

* तुमच्या मुलाच्या व्यक्तिमत्व विकासात तुमचा दृष्टिकोन अत्यंत महत्वाचा असतो.
* मुलांच्या शारीरिक, बौद्धिक आणि भावनिक विकासासाठी पालक मार्गदर्शक


लेखक

**गिजुभाई**

मराठी अनुवाद

प्रा. अनंत वासुदेव वाईकर

एम.ए.(राज्यशास्त्र, इतिहास,समाजशास्त्र), बी.एड्., डी.एड्.



किंमत :- रू.४०=००

विद्याभारती प्रकाशन,लातूर

विशेष सूचना -
'आई - वडीलांना' या पुस्तकाच्या भेट प्रती पालक मेळाव्यात शाळांतर्फे निःशुल्क अथवा सःशुल्क दिल्या जातात. ज्या सामाजिक संस्था, बालकमंदिर अथवा शाळा यांना जास्त प्रती हव्या आहेत त्यांनी प्रकाशनाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

ज्याच्या घरात लहान मुल आहे किंवा लवकरच येणार आहे अशा सर्वांना भेट देण्याकरिता 'आई-वडीलांना' हे एक उत्कृष्ट पुस्तक आहे.

प्रकाशक

ISBN 81-7876-024-X

प्रकाशक :-
**विद्याभारती प्रकाशन**
गुजराती शाळेसमोर, मेन रोड,
लातूर- ४१३ ५१२
☎: (०२३८२) २५८३८४, २४२७२१,

© प्रकाशकाधीन


आवृत्ती :- १ जानेवारी २००८

मुद्रक :-
प्रभात प्रिंटींग वर्क्स, गुलटेकडी, पुणे

अक्षर जुळवणी :-
**विद्या कॉम्प्युटर्स**
'विद्याभारती' मेन रोड,
लातूर- ४१३ ५१२.

वितरक :-
**भारतीय पुस्तकालय**
गीतांजली मार्केटजवळ, मेन रोड,
लातूर- ४१३५१२
☎: (०२३८२) २४८३८४

वितरक :-
**प्रभात बुक डिस्ट्रिब्युटर्स**
गुजराती शाळेसमोर, मेन रोड,
लातूर- ४१३ ५१२
☎: (०२३८२) २५८३८४



# कुशीत

हे छोटेसे पुस्तक आपल्या समोर ठेवताना मला खूप आनंद होतो आहे. या पुस्तकामधील लेख वेगवेगळ्या वेळी आपणाला नजरेसमोर ठेवूनच लिहिले आहेत. या लेखामधून मी आपणापुढे मुलांची बाजू मांडली आहे. मुलांच्या दुःखाबद्दल तक्रारी केल्या आहेत. मुलांच्या सुखाची याचना केली आहे. आपण या सर्व गोष्टी लक्षात घ्याल अशी मी आशा करतो.

मुलांची बाजू घेताना कधी आपणाला शिकवण दिलेली असेल किंवा जास्त काही सांगितले गेले असेल, तर आपण त्याचे वाईट वाटून घेऊ नका. गेल्या अठरा वर्षा पूर्वीपासून मी मुलांची कंगाल स्थिती पाहिली आहे, त्यांच्या बरोबर होणारे वाईट वर्तन पाहिले आहे. त्यांचे दुःख मी माझ्या मनात लपवू शकलो नाही. म्हणून कधी कधी काही कठोर शब्द वापरले आहेत. त्याबद्दल मी आपली माफी मागतो.

मुलांच्या संदर्भात मला इतक्या गोष्टी सांगायच्या आहेत की, कित्येक पुस्तके लिहून त्या संपणार नाहीत. मी केवळ ही सुरुवात केली आहे. मुलांच्या आणि आपल्या सर्वांच्या सुदैवाने थोड्या काळातच मी माझे इतर अनुभव आपल्या सेवेत रुजू करेन.

'मुलांची अपूर्णता आणि त्यावरील उपाय' हा लेख इंग्रजीमधून घेतला गेला आहे. हे उपाय अगदी सावधानतेने योजले पाहिजेत.

आज हे इथेच पूर्ण करतो.

\- गिजुभाई

## अनुवादकीय
## 'आई - वडिलांसाठी एक शुभसंदेश'

आपल्या कुटुंबामध्ये मुलाचा जन्म होतो. तसे पाहिलेतर मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्माने कुटुंबात जास्त आनंदी वातावरण दिसते. खरे तर मुलगा अथवा मुलगी यांचे आपल्या कुटुंबातील आगमन ही आगळी वेगळी घटना असते. जन्माला आलेले मूल विशिष्ट व्यक्तिमत्त्व घेऊनच जन्माला येते. या मुलावर आपण आपले नाव, परंपरा, रूढी, आचार, विचार लादत असतो. त्याला विशिष्ट अशा साचामधून घडवण्याचा प्रयत्न त्याच्या जन्मापासूनच करत असतो. मूल हे विकसित होण्याची प्रक्रिया नैसर्गिक आहे. ज्याप्रमाणे बागेतील माळी रोपांना प्रेम, संरक्षण, पाणी, खत देईल त्याप्रमाणे त्यांची वाढ होते. तसेच मुलांच्या बाबतीत आहे. आई-वडील मुलांना ज्या प्रमाणे विकासाचे योग्य वातावरण उपलब्ध करून देतील त्याप्रमाणे मुलांची वाढ होईल.

आई आणि वडील हे बालकाचे पहिले शिक्षक असतात. आपल्या उपनिषदामध्ये सुद्धा गुरुचे स्थान आई आणि वडिलांच्या नंतरचे आहे. म्हणजे आई वडिलांची तुलना कोणाशीही होवू शकत नाही. नवजात अर्भकाला सुद्धा स्वतःच्या गरजा असतात. त्याची आवड निवड असते. ते आपल्या नजरेतून या दुनियेला पारखत असते. पण आई वडील मात्र बालकाला समज नसलेला, स्वतःचे स्वतंत्र व्यक्तित्त्व नसलेला मानतात. यामुळे बालकाच्या विकासामध्ये बाधा निर्माण होते. गंमत म्हणजे मूल जन्माला आल्या बरोबर कित्येक आई वडील त्याला भावी जीवनात काय बनवायचे? याचा विचार करतात. आपल्याला योग्य वाटते त्याच मार्गावर मुलाने पुढे जाण्याची सक्ती करतात. यातून मूल आपल्या बालपणातील सुखाला हरवून बसते. त्या मुलात प्रसंगी विकृती निर्माण होते. याला आई वडिलांचा दुराग्रह जबाबदार आहे.

प्रसंगी आई-वडील बनणे माझ्या मते सोपे वाटते परंतु आई वडिलांचे कर्तव्य पालन करणे ही अवघड आणि मोठ्या जबाबदारीची बाब आहे. आपल्या कुटुंबामध्ये येणाऱ्या मूलरुपी पाहुण्याचे आपण स्वागत कशा तयारीने करावे याबद्दल गिजूभाईंनी अगदी उत्तम रीतीने विचार मांडले आहेत. व्यवसायाने वकील असणाऱ्या गिजूभाईंनी शाळा काढल्या. स्वतः अनुभव घेतला आणि त्या आधारे लेखन केले. त्यांनी गुजराती भाषेत २०० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली. त्यांच्या एका पुस्तकाचा अनुवाद 'मातापिता से' या नावाने हिंदीमध्ये प्रसिद्ध झाला. त्याच पुस्तकाचा मराठी अनुवाद 'आई - वडिलांना' यानावाने प्रकाशित केला जात आहे.

या पुस्तकामध्ये आई-वडिलांच्या संदर्भात बरेच महत्त्वपूर्ण विचार मांडण्यात आले आहेत. आई वडिलांच्या शिक्षणाची तसेच प्रशिक्षणाची गरज आहे काय? मूळ लेखक श्री. गिजुभाई हे शिक्षकांच्या प्रशिक्षणापेक्षा आई-वडिलांच्या प्रशिक्षणाला विशेष महत्त्व देताना दिसतात. हे आपणास सदरचे पुस्तक वाचल्यावर लक्षात येईल.

सदरच्या पुस्तकामध्ये गिजुभाईंनी आई-वडिलांच्या वैवाहिक जीवनापासून मुलाचा जन्म; सुरवातीचा काळ, मुलाचे पालन पोषण, मुलाचा इतरांशी येणारा संबंध याबद्दल योग्य सल्ला दिला आहे. त्यांच्या मते मुलाला स्वतःचे व्यक्तिमत्त्व असते. मूल आपल्या विकासात मग्न असते. त्यामध्ये आई-वडिलांनी बाधा आणू नये. आई-वडील आपल्या अपेक्षा मुलाकडून पूर्ण करवून घेण्यासाठी मुलांवर विविध बंधने घालतात. त्याच्या विकासात अडथळा उत्पन्न करतात. हा दृष्टिकोन आई-वडिलांनी बदलला पाहिजे. मुलांची गरज ओळखून त्याला योग्य वातावरण निर्माण करून दिले पाहिजे.

मूल आपल्या स्वतःच्या बळावर आपला शारीरिक, बौद्धिक, भावनिक विकास करुन घेते. त्याला स्वतःची आवड-निवड, अपेक्षा असते. पण आई वडील मुलाला आपल्या मतानुसार मार्गक्रमण करायला लावतात. प्रसंगी मुलाला धाक दाखवतात, मारहाण करतात किंवा एखाद्या वस्तूचे प्रलोभन दाखवतात. मारहाणीने मूल गुंड बनते. तर बक्षिसामुळे व्यभिचारी बनते. मारहाण आणि बक्षीस या दोन्हीमुळे मूल गुलाम बनते. याबद्दलचे विचार गिजुभाईंनी समर्पक शब्दात मांडले आहेत. त्यांच्यामते घरातील नोकर, मुलाला घरी शिकवायला येणारे शिक्षक यामुळे मुलांचे स्वातंत्र्य संपते. मुले गुलाम बनतात.

स्वतःच्या हाताने खाणे, स्वतः चालणे, स्वतः खेळणे, स्वतः एखादे काम करणे यामध्येच मुलांना आनंद असतो. यातच त्याला खरे सुख मिळते. यासंदर्भात आपल्या घरातील वातावरण कसे असावे? आपल्या घरातील फोटो, खुंट्या, कपाट, टेबल, खुर्च्या कशा असाव्यात? मुलाची खोली कशी असावी? मुलांची खेळणी कशी असावीत? यासंदर्भात गिजुभाईंनी अतिशय सुंदर मार्गदर्शन केलेले आहे. मुलाने घरामध्ये काय करावे? मुलाचा आहार, कपडे, मुलाचे खेळ यासंदर्भात अतिशय सुंदर रीतीने गिजुभाई मार्गदर्शन करतात.

या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून यापुस्तकाचा अनुवाद आपणापुढे सादर केला आहे. या पुस्तकातील माहितीचा आधार घेऊन आई-वडिलांनी मुलांशी कसे वागावे? हे आपणास ठरविला येईल. या पुस्तकाच्या वाचनाने आपण मुलांवर अधिक प्रेम करु लागू. त्यांच्या हिताचा विचार करु लागू. या मध्येच मुलाचे, आपले आणि समाजाचे कल्याण आहे. 'आई-वडिलांना' हे मराठी अनुवादरुपी पुस्तक लातूर येथील विद्याभारती प्रकाशनाने प्रकाशित केल्याबद्दल मी अनुवादक या नात्याने त्यांचा आभारी आहे.

मुलांचे आई-वडील, इतर नातेवाईक आणि शिक्षकसुद्धा या अनुवादित पुस्तकाचे मनापासून स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

अनुवादक
प्रा. अनंत वासुदेव वाईकर
[एम्.ए.(राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र), बी.एड्., डी.एड्.]
६ अ, महावीर सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर ०४.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १ | वैवाहिक जीवनाची धन्यता केंव्हा समजेल? | ०७ |
| २ | बाल-महिमा | १५ |
| ३ | आपल्या मुलांच्या कल्याणासाठी | २० |
| ४ | मुलाचे घरामधील स्थान कोणते ? | २४ |
| ५ | मुलाने घरात काय करावे ? | ३३ |
| ६ | आई वडिलांनी काय करावे ? (एक पत्र) | ४८ |
| ७ | आईस.......... | ७० |
| ८ | श्रीमंतांना ......... | ८८ |
| ९ | अपूर्ण मूल | ९५ |
| १० | मुलांचे घाणेरडे खेळ | १०३ |




# १. वैवाहिक जीवनाची धन्यता केव्हा समजेल?

ज्याप्रमाणे 'बीजा' मध्ये झाड आहे. त्याची फुले आहेत आणि फळे आहेत त्याप्रमाणे मुलामध्ये संपूर्ण मनुष्य आहे.

तारुण्य हे बाल्य अवस्थेचे विकसित रुप आणि मध्यान्ह होय. काळभेदानुसार मनुष्याच्या सर्व अवस्था ह्या लहान मुलाच्याच वेगवेगळया अवस्था आहेत.

मूल हे मनुष्य जातीचे मूळ आहे आणि त्याच्या मुळापासूनच मानवी प्रगतीचा प्रवाह हा जीवनाच्या उद्दिष्टांकडे वाहत राहतो.

बाल्य अवस्थेत हा प्रवाह शक्तिशाली असूनही लहान असतो. हा मंद बनतो. वेगवेगळया धारा आणि वेगवेगळी गती धारण केलेला हा प्रगतीचा प्रवाह शेवटी समुद्रालाच जावून मिळतो.

तरीही मूल आत्तापर्यंत उपेक्षित राहिले आहे, झिडकारलेले आहे. अपमानित झाले आहे. भटकत राहिले आहे.

आजचा असमाधानी, अव्यवस्थित, असहाय्य असणारा तरूण हा कालचा झिडकारला गेलेला, इकडे तिकडे फेकला गेलेला आणि कसाबसा गढून गेलेला मुलगा आहे. तरूण आज जसा आहे, तो तसा काल बालक होता.

आजच्या तरुणांना दोष देवू नका. दोष त्यांना दिला गेला पाहिजे ज्यांनी त्या छोट्या मुलांना त्रास दिला आहे; ज्यांनी त्यांच्या वाढत्या शक्तीला प्रतिबंध केला आहे आणि जे लोक आपल्या क्षुद्र स्वार्थामध्ये आणि जीवनातील अवैध धंद्यात गुरफटून राहिले, ज्या लोकांनी लहान मुलांना समजून घेतले नाही. तेच लोक आजच्या अपंग तरुणांचे, सत्वहीन आणि दुबळया तरूणांचे निर्माते आहेत आणि याच कारणासाठी ते आजच्या तरूणांचे द्रोही ठरतात. ते आपल्या तरुणपणात तारुण्याचा आनंद लुटत असतात. मुलांचे पालन पोषण विसरतात. आपल्या तारुण्याच्या काव्यामध्ये रममाण होऊन ते लहान मुलांच्या भव्य काव्याला समजू शकले, ना ऐकू शकले. त्यांनी या मुलांच्या विकासात नव्हे तर त्याच्या आईचा विकास करण्यात आपली सर्व शक्ती खर्च केली. तिला पाहत राहण्यामध्ये ते या

छोट्याकडे पाहणे विसरले. त्यांनीच आम्हाला आजच्या तरुणांची भेट दिली आहे आणि आजच्या तरुणांच्या गंतागुंतीच्या प्रश्नाबद्दल आपण त्यांचे आभारी आहोत. चांगले झाले असते, जर त्यांनी आपल्या मुलांची काळजी घेतली असती. त्यांनी आपल्या तारुण्यातील सुखाचा उपभोग घेताना आपल्या मुलांची काळजी घेतली असती तर चांगले झाले असते. जग खूप पूर्वीच स्वर्गासारखे सुखी झाले असते आणि मुलांच्या पालन पोषणाची किंवा तरुणांची एकही अडचण शिल्लक राहिली नसती.

परंतु आता हे सगळे होऊन गेले आहे. आता कोणाला जबाबदार धरावे आणि कोणाला धरू नये? प्रश्न हा आहे की आता काय केले पाहिजे? कोठून आरंभ करावा? कोणी करावा?

मी म्हणेन की आपण लहान मुलांपासूनच आरंभ करावा. अगदी त्यांच्या पालन पोषणापासून माणसाच्या पालन पोषणाचे आणि उद्धाराचे काम आपण हाती घेऊ या. बाल्य अवस्थेपासूनच आपण मुलांच्या विकासाचे संपूर्ण आणि शुद्ध रूप गतिमान बनवू या. हे काम कोणी सांभाळावे? मी म्हणतो की तरुणांनी सांभाळावे - निश्चितपणे तरुणांनीच सांभाळावे. त्या तरुणांनी सांभाळावे की ज्याच्या घरात लहान मूल आहे. त्या तरुणींनी सांभाळावे ज्यांच्या घरात छोटे मूल आहे. आई-वडिलांच्या रूपात तरूण आणि मुलांच्या पालनपोषण करण्याचे आणि त्यांच्या विकासाचे खरे हक्कदार आहेत; खरे जबाबदार सुद्धा आहेत.

आजचा तरूण सर्व बाजूंनी त्रासला आहे एकीकडे त्याला शिक्षण घ्यायचे आहे तर दुसरीकडे त्याला पोट भरायचे आहे. त्याच्यावर निसर्गाने आणि समाजाने 'कृपा' केल्याने त्याला 'विशेष स्वरूपात' एका पत्नीला सांभाळायचे आहे आणि तिचे संरक्षण करायचे आहे. एक अथवा एका पेक्षा जास्त मुलांचे पोषण आणि त्यांच्या शिक्षणाचीही सोय करायची आहे. समाजाने आणि रूढींनी त्याला आज अशा स्थितीत आणून सोडले आहे की त्याचा परिणाम म्हणून या सर्व बाजूंनी येणाऱ्या संकटांना तोंड देण्यात तरुणांना आपली सगळी शक्ती खर्च करावी लागते. या सर्व कारणामुळे तो अगदी कृश, निस्तेज आणि निराश बनला आहे.

जुन्या लोकांनी आपल्या अनुभवानेच निर्णय घेतला होता की, आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतरच तरूणांनी वैवाहिक जीवनात प्रवेश करावा. यावरून ही गोष्ट सहज लक्षात येते की, बालविवाह ही प्रथा अत्यंत वाईटात वाईट अशी कुप्रथा



आहे. स्वावलंबनाचे शिक्षण न मिळाल्यानेच आर्थिक चणचण भोगताभोगता तरुण कमजोर बनतो. यावरुन हेही स्पष्ट होते की, स्वावलंबी न बनविणारे शिक्षण हे निरुपयोगी शिक्षण आहे. जे तरुण सुखी वैवाहिक जीवनाची अपेक्षा धरतात अशा तरुणांना ही परिस्थिती एक मोठा मूल्यवान अनुभव देते. यावरुन आपण कितीतरी तयारी केल्यानंतरच वैवाहिक जीवनात प्रवेश करावा याची त्यांना कल्पना येते.

परंतु, आज काय करावे? आजच्या अविवाहित तरुण आणि तरुणींनी वैवाहिक जीवनाच्या आनंदापासून दूर राहिले पाहिजे. आजपर्यंत सर्व दोष रुढींच्या माथ्यावर मारुन तरुण आणि तरुणींनी विवाह व्यवस्थेचा लाभ घेतला आहे. जर आता त्यांनी प्रेमाच्या नावावर झटपट लग्न करण्याची रुढी स्वीकारली तर त्यात त्यांचे नुकसानच होईल आणि त्यांना याची फळे भोगावी लागतील. स्त्री आणि पुरुष अशा दोघांनीही आपल्या विवाहापूर्वी विवाहाची तयारी करणे आवश्यक आहे. त्यांना हे लक्षात घ्यावे लागेल की मूल हा त्यांच्या प्रेमाचा परिणाम आणि परिपाक आहे. मुलांचे पालनपोषण आणि संवर्धनात त्यांना आपले संपूर्ण जीवन घालवावे लागेल. जीवन हा एक यज्ञ आहे हे मानून चालावे लागेल. प्रेमाच्या माध्यमातून मुलाच्या सेवेला एखाद्या उत्सवाचे रूप द्यावे लागेल. या सर्व गोष्टी समजून घेतल्यानंतरच त्यांना वैवाहिक जीवनाच्या दिशेने पाऊल टाकता येईल.

आज विवाह हा धुक्यामध्ये पाय ठेवण्यासारखा आहे. अशुद्ध-शुद्ध भावना आणि स्वार्थाने प्रेरित होऊन तरुण आणि तरुणींनी प्रेमाच्या नावावर बांधलेली विवाहाची गाठ उद्या सैल करण्यासाठी किंवा तोडून टाकण्यासाठी असते. विवाहाचे बंधन पक्के रहावे आणि विवाहबंधनाचा पक्केपणा भावी पिढीच्या संवर्धनासाठी आणि संस्कारासाठी उपयोगी पडावा याची कल्पना अगदी थोड्या लोकांना असते. शिवाय याची फिकीर कोणालाही राहात नाही.

यासाठी हे आवश्यक आहे की, विवाहापूर्वी तरुणांनी विचार करावा. आपण स्वतः चरितार्थ चालवायला समर्थ आहोत का? हे पहावे. दोघांनीही सशक्त आणि योग्य वय होईपर्यंत वाट पहावी. ज्यावेळी ते दोघे मुलांचे पालनपोषण करण्यायोग्य बनतील, ज्यावेळी बालसंगोपनाच्या दृष्टीने ते आपल्या मनाला आणि बुद्धीला तयार करतील. त्यावेळी त्यांनी विवाह करावा.

आज बाळाचा जन्म हा एका आकस्मिक घटनेसारखा वाटतो. समज नसलेल्या स्त्री-पुरुषांना मूल हे आपल्या दोघांच्या जीवनातील एक विघ्न वाटते.

यासाठी ते मुलाला आपल्यापासून दूर ठेऊ इच्छितात. मूल आपल्या दोघामध्ये येणे हे त्यांना पसंत नाही. ते याची किंमत समजत नाहीत आणि समजून घेऊ इच्छित नाहीत. दोन मुलांचे छोटे कुटुंबसुद्धा आजच्या तरुण-तरुणींना खूप कष्टदायक बनले आहे. त्यांना हे एक कोडे वाटते आहे.

पण, बाळाचा जन्म ही कोणती आकस्मिक घटना नव्हे. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत विवाह ही एक आकस्मिक घटना आहे. त्याच मर्यादेपर्यंत बाळाचा जन्मसुद्धा आकस्मिक आहे. असे म्हटले जाते. अजाणतेपणी का होईना परंतु मूल ही निसर्गाच्या सहज अशा प्रेमाची आणि प्रेरणेची अनमोल देणगी आहे. जगातील सर्व समजूतदार लोकांनी आणि आई-वडिलांनी या ईश्वरी देणगीला प्रेमाने स्वीकारले आहे. तरीही आजचा तरुण याला घाबरतो. आपल्याला मिळालेल्या शिकवणुकीमुळे आणि सामाजिक, धार्मिक क्षेत्रात बनलेल्या विचित्र वातावरणामुळे तो मुलाला एक ओझे मानतो. याच्या परिणामाने तरुण आपल्या लहान मुलासह अधोगतीच्या दिशेने वाटचाल करतो आहे.

छोटे बाळ हे आमच्या जीवनामधील सुखाची एक आनंदी आणि प्रसन्न पणे खुलणारी कळी आहे. ते आई-वडिलांच्या हृदयाचे पवित्र आणि निर्मळ प्रतिबिंब आहे. परंतु समाजातील विखुरलेल्या खऱ्या-खोट्या आदर्शाची खिचडी बनविणारे आई-वडील आपल्याच मनाला स्वतःच ओळखू शकत नाहीत. ते आपल्याच जीवनाला सावरण्यास बेजबाबदार बनतात. ते स्वतःच आपला धिक्कार करतात. स्वतःच आपल्या मुलांची निंदा करतात, त्यांना डाफरतात, फटकारतात, त्यांच्याशी भांडतात कधी कधी त्यांच्यापासून सुटका कशी होईल? याचा विचार करतात. ते मुलांना त्यांचे काका, आजोबा इत्यादींच्या ताब्यात देऊन स्वतः मात्र हिंडायला फिरायला व सहलीला जातात. मौज मजा करतात किंवा दंगा-मस्तीसाठी घराबाहेर पडू इच्छितात आणि या सर्व कामामध्ये व्यग्र होतात. परंतु मूल हे आपल्या शुभ पावलांनी घरामध्ये लक्ष्मी घेऊन येत असते. आपले तोतरे,बोबडे बोल घेऊन ते आनंदी जीवन घेऊन येते. या सर्व गोष्टी पहाव्यात आणि समजून घ्याव्यात. याच्या ऐवजी आजचा तरुण आणि आजच्या तरुणी ह्या कांदबरी, नाटक आणि सिनेमामध्ये आनंद शोधतात ते भाषण, सभा आणि संम्मेलनात सहभागी होतात. तसेच एखाद्या समारंभामध्ये सहभागी होण्यासाठी धडपड करतात. अशा प्रकारामध्ये मूल त्यांना वारंवार अडचणीचे ठरते.



## दुर्दैवी आई-वडिलांची दुर्दैवी मुले

आई-वडिलांनाही स्वतंत्र जीवन असते यात शंका नाही. त्यांचे जीवन प्रेममय असलेच पाहिजे, पण या प्रेमी जीवनाचे केंद्रस्थान मूल आहे. मूल हे या जीवनाचे काव्य आहे, ते या जीवनाचा सुगंध आणि सौंदर्य आहे. या जीवनाचे सुख सुद्धा मूल आहे. आपल्या जीवनातील सर्व अपेक्षा आई-वडिलांना आपल्या मुलातच पाहायच्या आहेत. मुलांवर केलेले प्रेम ही जीवनाची संपत्ती आहे. त्याचे स्वरुप शुद्ध आणि सात्त्विक आहे. कारण यामध्ये त्यागाचे सुख असते.

परंतु अशा जीवनाकरिता तयारी करणे आवश्यक आहे. ही तयारी स्त्री अथवा पुरुषाने करावी. विवाह संस्थेचे सदस्यत्त्व स्वीकारणारे याची अवहेलना करु शकणार नाहीत. बाह्यतः अवहेलना करून शेवटी वैवाहिक जीवनात प्रवेश करणारे लोक चूक तर करतातच पण त्याबरोबर पाप सुद्धा करतात. मनामध्ये संततीहीन राहण्याची अभिलाषा ठेवतात आणि कृत्रिमपणे गृहस्थाश्रम चालवणारांना लहान मुलांसाठी तडफडावे लागते. तसेच कृत्रिमतेची शिक्षा म्हणून वांझोटेपणा पण त्यांना येईल. त्याच वेळी ते स्वतःला दोषी समजू लागतील.

या स्थितीला येण्यापूर्वीच प्रत्येक तरुण आणि तरुणीने शरीरशास्त्र, इतिहास, भूगोल, पाकशास्त्र आणि सौंदर्य इत्यादींची ओळख करुन घेतली पाहिजे. त्याच प्रमाणे त्यांनी लहान मुलांच्या पालन पोषणाची पद्धत आणि त्यांचे शिक्षण याचेही ज्ञान प्राप्त करुन घ्यावे.

कित्येक लोकांना यामध्ये लाज वाटते परंतु ही लाज खोटी आहे. ज्याप्रमाणे पुढे कोणीतरी आजारी पडेल हे लक्षात घेऊन परिचारिकेचे काम शिकण्यात लाज नाही, ज्याप्रमाणे पुढे कधी उपयोगी पडणारी विद्या शिकण्यात लाज नाही त्याप्रमाणे लहान मुलांच्या संगोपनाची विद्या शिकण्यात कोणतीच लाज नसावी.

आता आपण तरुण अथवा तरुणींचे आई-वडील बनण्यासाठी काय तयारी करावी याच्याबद्दल विचार करू. काय काय वाचावे लागेल? घर कसे तयार करावे लागेल? स्वतःला, आपल्या शरीराला आणि आपल्या मनाला कशा रीतीने तयार करावे लागेल? आणि शेवटी आपल्या आसपासचे वातावरण कसे बनवावे लागेल?

जेव्हा आपल्या घरी एखादा पाहुणा येतो, तेव्हा आपण त्याच्यासाठी

थोडीफार तयारी करतो. ही तयारी तात्पुरती असते. याच्यात कोणतीही अडचण नसते. परंतु आपल्या घरात जो कायमचा पाहुणा येणार आहे, त्याच्यासाठी आपणाला मोठी आणि कायमची तयारी करणे आवश्यक आहे. ही तयारी आपण विचारपूर्वक आणि आदरपूर्वक केली पाहिजे. हा पाहुणा आपले एक अंग असतो, आपल्या वंशाचा वेल वाढवणारा असतो, आपला कुलदीपक असतो. हा पाहुणा मानवजातीच्या पवित्र पाऊल खुणांच्या विकासाच्या दिशेकडे नेणारा असतो. आपणाला यासर्व गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. यासाठी आपली तयारीसुद्धा भव्य असली पाहिजे.

प्रत्येक तरुण अथवा तरुणी हे कोणी वेगळे नाहीत. त्यांनी कमित कमी एवढातरी विचार करावा की, आपण आपले शरीर स्वस्थ आणि सशक्त बनविले पाहिजे. कारण हेच शरीर पुन्हा आपल्या घरात जन्म घेणारे आहे. ज्याप्रमाणे आई वडिलांची शरीराकृती असेल त्याचप्रमाणे बालकसुद्धा जन्मेल. एवढेच नव्हेतर शारीरिक दृष्टीने सुखी आणि संपन्न असेच आई वडील आपल्या मुलांना चांगल्या रीतीने सांभाळू शकतील आणि स्वतःही मुलांचा आनंद लुटू शकतील. शारीरिक दृष्टीने दुर्बल आणि अस्वस्थ असणाऱ्या आईला लहान मूल हे दुःखद ओझे वाटते. भले आपण या दुःखाने दुःखी नसू परंतु या दुःखाला आई-वडीलच जबाबदार आहेत.

आपले वैवाहिक जीवन सुरु केल्यानंतरसुद्धा आई-वडिलांनी आपले शरीर सांभाळून शारीरिक सुखाचा उपभोग घेतला तर ते त्या बालकांसाठी आशीर्वाद ठरतील. जे आपली शक्ती अविचाराने अधिक खर्च करतील किंवा बरबाद करतील त्यांना आपले आनंदी दिवस कमी करावे लागतील. सुखाचा उपभोग घेण्यासाठी त्याच्या उपभोगावर संयम राखणे आवश्यक आहे.

छोट्या बाळाच्या स्वरुपात येणाऱ्या पाहुण्याचे स्वागत करण्यासाठी आपण आपल्या मनाने तयार राहिले पाहिजे. याचा अर्थ असा आहे की छोट्या मुलाचे अन्न काय आहे हे आपण माहीत करून घेतले पाहिजे. त्याचे दात येऊ लागले किंवा तो आजारी पडला तर आपण तात्पुरता उपाय कोणता केला पाहिजे? लहान मुलाने बोलायला शिकायची वेळ केव्हा येते? त्यावेळी आपण त्याला कोणती मदत करु शकतो? स्वतःचा विकास करुन घेण्याची त्याची पद्धती कोणती आहे? आपण त्याला त्या पद्धतीत किती प्रमाणात संरक्षण देऊ शकतो? आपण त्याला



कोणत्या मर्यादेपर्यंत मदत करु शकतो? इत्यादी. त्या लहान मुलाची स्वतःची शक्तीकोणती आहे? त्याला कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता आहे? तो आपल्या मनाचा विकास कसा करु इच्छितो? या गोष्टी आपण जाणून घेतल्या पाहिजेत. आपण त्या मुलाची कल्पनाशक्ती, क्रियाशक्ती, प्रेरणा इत्यादींची स्थिती काय आणि कशी आहे? हे सुद्धा जाणून घ्यावे. यालाच लोक मानसशास्त्र असे म्हणतात. या मानसशास्त्राच्या बालकाच्या शिक्षणाबद्दलच्या सामान्य सिद्धांताचे ज्ञान आई-वडिलांनी करुन घेणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी प्रत्येक विषयाची पुस्तके वाचावीत. लहान मुलांचे पालन पोषण करणाऱ्या संस्था आणि परिवारात जाऊन सर्व काही समजून घेतले पाहिजे.

मुलांच्या बाबतीत पसरलेल्या गैरसमजुती आई-वडिलांनी प्रथम दूर केल्या पाहिजेत, जर नवीन पिढीतील तरुण आणि तरुणींनी सुद्धा जुन्या अंधविश्वास आणि चालीरीतीनुसारच आपल्या बालकाचे पालन-पोषण केले तर या जगात त्या मुलांना पुढे जाण्याची आशा ठेवता येणार नाही. जर काही तरुण आणि तरुणी आपल्याला प्रगतीशील समजत असतील तर त्यांचा हा समज जास्तकाळ टिकणार नाही.

लहान मुलांचे पालन-पोषण आणि शिक्षण या बद्दलही अनेक चुकीच्याधारणा अस्तित्त्वात आहेत. आजचे आपले तरुण आणि तरुणी देवी आणि देवतांच्या नवसापासून वाचलेले असतील परंतु मुलांच्या पालन पोषणाच्या रानटी पद्धती आणि रुढीपासून त्यांचे वाचणे कठीण आहे. नवे आई-वडीलसुद्धा आपल्या लहान मुलांचे पालन-पोषण त्याच चुकीच्या रुढी व पद्धतीनुसार करु इच्छितील. म्हणून अशी वेळ येण्यापूर्वीच त्यांनी जाणून घ्यावे की मुले ही आपला स्वतःचा विकास करत राहण्यासाठी समर्थ असतात.

मुलाचा आत्मा स्वतंत्र असतो आणि तो निश्चित अशा ध्येयाच्या दिशेने पुढे जात असतो. त्याच्या या प्रयत्नाला आपण अनुकूल वातावरण तयार करावे आणि त्याच्या मार्गात कोणताही अडथळा आणू नये अशी त्याची अपेक्षा असते.

मूल हा मातीचा गोळा आहे किंवा मेणाचा लगदा आहे. आपण आपणाला हवा तसा आकार त्याला देऊ शकू, आपणाला पाहिजे त्याप्रमाणे आपण त्याला घडवू शकू अशी समजूत नवीन आई-वडिलांनी करुन घेऊ नये. लहान मुलांचे व्यक्तिमत्त्व एक चेतनायुक्त व्यक्तिमत्त्व असते. ते मूल आपल्या स्वतःच्याच रूपात

गढून जाते. आपल्या शारीरिक गुणधार्मनुसार ते आपल्यातच मग्न होते. त्याच्या या कार्यात आई-वडिलांनी बाधा आणू नये. परंतु बालकाच्या सर्व हालचालींचे बारीक निरीक्षण करावे आणि जेथे त्यांना गरज असेल तेथेच मदत करावी.

तरुण आई-वडिलांनी ही गोष्ट लक्षात घ्यावी की, मारझोड करण्याने अथवा बक्षीस देण्याने मुले सुधारत नसतात. उलट ती बिघडतात. मुलांना मारहाण केल्याने त्यांच्यात गुंडगिरीची प्रवृत्ती निर्माण होते. तर बक्षिसामुळे मुले व्यभिचारी बनतात. या दोन्ही कारणांनी मूल गुलाम बनते.

ज्याप्रमाणे तरूण आई-वडील आपल्यासाठी खऱ्या स्वातंत्र्याची अपेक्षा ठेवतात त्याचप्रमाणे मूलसुद्धा आपल्यासाठी स्वातंत्र्याची अपेक्षा ठेवते. तसेच ते स्वातंत्र्याची मागणी करते.

मूलसुद्धा आई-वडील, त्यांचे आचार-विचार आणि त्यांची कुलमर्यादा यांच्या बंधनापासून सुटकेची अपेक्षा धरते. आई-वडिलांनी त्याला या बंधनामधून मुक्तता द्यावी.

थोडक्यात मूल हा एक आपला लाडका आणि महत्त्वाचा पाहुणा आहे. तो आपणाकडून खरे स्वातंत्र्य, सहानुभूतीयुक्त मदत आणि त्याच्या विकासासंबंधी असणाऱ्या ज्ञानाची अपेक्षा करतो. यासाठी आपण स्वतःला तयार ठेवले पाहिजे.

ज्यावेळी आपण अशा तयारीनिशी बाळाच्या आगमनाबद्दल लायक बनू, त्याच्या स्वागतासाठी त्याच्या येण्याची वाट पहात उभे राहू, तेव्हा निश्चितच आपल्या घरी थोरव्यक्ती जन्म घेईल. आपल्या वातावरणात आपला अद्‌भूत विकास साधेल. आपले आणि आपल्या बरोबर जगाचेही कल्याण करेल. तेव्हा आपण आपल्या तारुण्याची, आपल्या गृहस्थी जीवनाची, आपल्या कुटुंबातील सुखाची धन्यता समजू शकलो असे म्हणता येईल.

***

*   *   *   *

*   *   *   *



# २. बाल - महिमा

- मूल ही ईश्वराची देणगी आहे.
- मूल ही निसर्गाची सुंदर कलाकृती आहे.
- मूल हे समाजाच्या प्रगतीचे पुढचे पाऊल आहे.
- मूल हा मानवी कुळाचा विसावा आहे.
- मूल हे प्रेमाचे प्रेषित आहे.
- मूल हे मानसशास्त्राचे मूळ आहे.
- मूल ईश्वराची पूजा आहे.
- आपण मुलाला प्रेम देऊन जगाला प्रेम देऊ शकू.
- मुलाला प्रेम देण्याने आपल्याला प्रेमाचे रहस्य समजेल.
- ईश्वरप्राप्तीसाठी लहान मुलाची पूजा करा.
- जर ईश्वराने कोणती सर्वात निर्दोष वस्तू निर्माण केली असेल तर ती म्हणजे लहान मूल होय.
- मुलाजवळ राहणे याचा अर्थ निर्दोषाबरोबर राहणे होय.

**आयांनो आणि वडिलांनो !**

- आपण कधी मुलाचे सुंदर आणि निष्पाप हसणे पाहिले आहे का? आपण कधी आपले दुःख त्याच्या हसण्यामध्ये विलीन होताना पाहिले आहे काय?
- आपणाला हे माहीत आहे का? की मूल खळखळून हसताना त्याच्या मुखातून इवली इवलीशी फुले टपकतात.
- आपल्या हे लक्षात आहे का? की मुलाला भरवताना आपण स्वतः कशा प्रकारच्या बाललीला करत असता?
- मोठ्यात मोठी किंमत मिळूनसुद्धा आपण कधी अशी बाललीला करणे पसंत कराल का?
- जर कधी आपण स्वर्गीय वेडेपणाचा विचार करायला बसाल तर थोडा विचार करा की आपणाला स्वतःबद्दल काय वाटेल?

- ❖ आपले दुःख कोण विसरायला लावतो?
- ❖ आपला थकवा कोण घालवतो?
- ❖ आपणाला वांझोटेपणाच्या डागापासून कोण वाचवतो?
- ❖ आपले घर किलकिलाटाने कोण भरवतो?
- ❖ आईला गृहिणी कोण बनवतो?
- ❖ जीवनाच्या युद्धात वडिलांना युद्धवीर कोण बनवतो?
- ❖ कधी कोणत्या आई-वडिलांनी आपल्या मुलाला कुरूप म्हटले आहे काय?
- ❖ जेव्हा मूल हे मूल न राहता त्याचा माणूस होतो तेव्हाच तो कुरुप बनतो. कुरुप माणूस किंवा कुरुप स्त्री याचा अर्थच विकृत मूल होय.
- ❖ जो माणूस मुलाबरोबर खेळू शकत नाही तो कधी प्रेमळपणाचा दावा करु शकेल का?
- ❖ मुलाला पाहताच जर आपण त्याला उचलून कुशीत घेतले नाही तर आपण मुलावर प्रेम करता हे आपले ढोंग आहे. मूल आपणासमोर क्षणभरही उभा राहणार नाही.
- ❖ प्रेमाच्या संदर्भात अन्य कोठेही देखावा चालू शकतो पण तो मुलाजवळ कधीही चालू शकणार नाही.
- ❖ मूल हा प्रेमाचा आरसा आहे.
- ❖ राजा असो अथवा भिकारी, मूर्ख असो अथवा विद्वान, गरीब असो अथवा श्रीमंत मुलापुढे कोण वाकलेला नाही?
- ❖ कोण आहे की जो लहान मुलाचे प्रेम मिळविण्यासाठी त्यापुढे वाकला नाही?
- ❖ ज्यावेळी लहान मूल त्याचे दात येण्यापूर्वी तोंड उघडते तेव्हा असे वाटते की जणू गुलाबाचे फूलच उमलते आहे.
- ❖ जेव्हा लहान मूल सकाळी उठते तेव्हा त्याला हे सर्व जग नवे नवे वाटते.
- ❖ जगासाठी लहान मूल दररोज नवे दिसते.
- ❖ रोज सकाळ होते आणि रोज आईच्या कुशीत एक नवीन कमळ खुलते.
- ❖ थंडीच्या दिवसात संपूर्ण रात्र आईला बिलगून आणि आईच्या कुशीत घुसमटून झोपणारे आणि बसणारे मूल आईला किती गोड वाटत असेल?
- ❖ मूल आईच्या प्रेमामुळेच जिवंत राहते किंवा आई सुद्धा मुलाच्या गोडीमुळेच जिवंत राहते.
- ❖ ज्यावेळी लहान मूल आपले छोटे छोटे पाय हलवते त्यावेळी आपण ते



व्यायाम करत आहे असा विचार केला आहे काय? ते हवेमध्ये कितीवेळा चालते? आपण त्याची ही कृती पाहण्यात तल्लीन होऊन जातो का?

- ❖ गुडघ्यावर रांगण्याचा प्रयत्न करणारे लहान मूल आणि जगाचे साम्राज्य मिळविण्याचा प्रयत्न करणारा एखादा सम्राट या दोघामध्ये आपणाला काही फरक वाटतो का ?
- ❖ लहान मुलाचा प्रयत्न अगदी किती सहज आणि निर्दोष असतो तर सम्राटाचा प्रयत्न कितीतरी दोषी आणि भयंकर असतो?
- ❖ नागांची पूजा करण्याचे युग संपून गेले आहे.
- ❖ प्रेतांची पूजा करण्याचे युग संपून गेले आहे.
- ❖ दगडांची पूजा करण्याचेही युग संपून गेले आहे.
- ❖ विभूती पूजा करण्याचेही युग संपून गेले आहे.

**आता**

- ❖ लहान मुलांची पूजा करण्याचे युग आले आहे.
- ❖ मुलांची सेवा हीच त्यांची पूजा आहे.
- ❖ नवीन युग कोण निर्माण करेल?
- ❖ मानवी जीवनाच्या प्रवाहाला अधिक प्रवाही कोण बनवेल ?
- ❖ येणाऱ्या युगाचा स्वामी कोण बनेल?
- ❖ भूतकाळाचे वैभव आणि वर्तमानकाळातील विभूतींना भविष्याच्या कुशीत कोण ठेवेल?
- ❖ बालकाच्या शब्द कोशात 'निराशा' हा शब्द नाहीच.
- ❖ चालायला शिकण्याचा प्रयत्न करणाऱ्या लहान मुलाकडे पहा.
- ❖ तो कधी थकतो का?
- ❖ त्याचा उद्योग आणि त्याची तन्मयता कोणाला अनुकरणीय वाटणार नाही?
- ❖ ज्यावेळी लहान मूल चालण्याचा प्रयत्न करताना पडते तेव्हा त्याला कोणी मारत का नाही?
- ❖ त्याला हारताना पाहूनही आपणाला हसू का येते?
- ❖ कोणत्याही प्रकारे बक्षीस किंवा आमिष दाखवून आपण लहान मुलाला हसवू शकतो का?
- ❖ हास्य हा मुलांचा मोठ्यात मोठा आनंद आहे.
- ❖ मुलाचे हसणे हे घराला आणि मनाला प्रकाशाने उजळून टाकते.

- ❖ झोपलेल्या मुलाचे हसणे पऱ्यांच्या पंखांच्या प्रकाशासारखे चमकणारे असते.
- ❖ दोन ओठ खुलवून मुलाचे गोड हसणे संपूर्ण विश्वात पसरते.
- ❖ गडद अंधाऱ्या रात्रीसुद्धा लहान मुलाच्या हसण्याने आईची सगळी भीती निघून जाते.
- ❖ लहान मुलाच्या हसण्यातच अमृत भरलेले आहे.
- ❖ असे वाटते की या अमृतानेच आई नेहमी तृप्त राहते.
- ❖ जेव्हा मूल अर्ध्यारात्री जागे होते; तेव्हा त्याच्या बरोबर घरातील सर्व लोक जागे होतात.
- ❖ ज्यावेळी झोपेतून उठलेले लहान मूल खेळू लागते; तेव्हा घरातील सर्व लोक त्याच्या बरोबर खेळण्यात गुंग होतात.
- ❖ मुलाबरोबर म्हातारी माणसेसुद्धा हसण्याचा आनंद लुटतात.
- ❖ मोठे मूल लहान मुलाबरोबर हसून आपल्या बालपणीच्या आठवणींना ताजे करते.
- ❖ तरुण लोक लहान मुलाच्या हसण्यात न्हाऊन आपल्या प्रेमी जीवनाची तयारी करतात.
- ❖ आई-वडील तर लहान मुलाच्या हसण्यात आपल्या नवीन जीवनाचा आनंद लुटतात.
- ❖ मूल हा देव लोकातील भरकटलेला प्रवासी असतो.
- ❖ मूल हा कुटुंबातील अनमोल पाहुणा आहे.
- ❖ ज्यावेळी मुलाची योग्य सेवा शुश्रुषा होत नाही तेव्हा संपूर्ण कुटुंब विस्कळीत होते.
- ❖ मुलाला लावलेल्या कुंकवाच्या टिळयामधील लालीच्या लाल पावलांना लक्ष्मी बिलगून राहते.
- ❖ मुलाच्या हसऱ्या चेहऱ्यावर सतत प्रेम असते.
- ❖ झोपलेल्या लहान मुलाच्या हास्यामध्ये शांती आणि गंभीरता असते.
- ❖ लहान मुलाच्या बोबडे बोलण्यातून कविता वाहते.
- ❖ वाईट याचे वाटते की, ती दिव्य कविता मानवी दुनियेत जास्त काळ टिकत नाही.
- ❖ कधी आपण ऐकले आहे का, की मुलाच्या बोलण्यामधील व्याकरणाच्या चुका कोणी शोधल्या आहेत.
- ❖ मुलाबरोबर गप्पागोष्टी करत असताना मोठे लोक सुद्धा व्याकरणांच्या



नियमांचा त्याग आनंदाने करतात आणि नेहमी व्याकरणरहित भाषा बोलण्याचा असफल प्रयत्न करतात.

- ❖ ज्यावेळी मूल व्याकरण दृष्टीने बोलू लागते त्यावेळी त्याच्या बोलण्यातील गोडी घटू लागते.
- ❖ ज्याला मूल आवडत नाही तो ईश्वराचा शत्रू असतो.
- ❖ मुलाला घाणेरडा म्हणून त्याच्याकडे पाहणारे लोक दुर्दैवी नाहीत तर काय?
- ❖ मूल दुर्दैवी व्यक्तीकडेही आपला हात पसरते.
- ❖ कैद्याला सुद्धा आपली मुले प्रिय असतात. जो ईश्वरावर प्रेम करतो तो कैद्यांच्याही मुलावर प्रेम करतो.
- ❖ काही लोक मुलापासून दूर राहू इच्छितात. अशा लोकांना पामर म्हणावे नाहीतर अजून काय?
- ❖ मूल हा आईवडिलांचा आत्मा आहे.
- ❖ मूल हा घराचा दागिना आहे.
- ❖ मूल ही घराच्या अंगणाची शोभा आहे.
- ❖ मूल कुलदीपक आहे.
- ❖ मूल हे आमच्या जीवनातील सुखाची, आनंदी आणि खुलणारी कळी आहे.
- ❖ जर आपण शिक्षक होऊ इच्छित असाल; तर आपण मुलांचेच अनुकरण करा.
- ❖ जर आपण मानसशास्त्रज्ञ होऊ इच्छित असाल तर आपण बालकांचेच निरीक्षण करा.
- ❖ मुले क्षणोक्षणी जीवनशास्त्र आणि मानसशास्त्राचे सिद्धांत व्यक्त करतात.
- ❖ तत्वज्ञानी लोकसुद्धा मुलांच्या ब्रह्मांडाचे दर्शन करू शकतात.
- ❖ ज्यावेळी मूल आपल्या इवल्याशा डोळयांनी आपल्याकडे पाहते म्हणजे शेवटी ते काय पाहते ?
- ❖ काय त्याच्या डोळयातील प्रकाश आमच्यात कोणता प्रकाश पाडणार आहे?
- ❖ आपण मुलाजवळ अर्धा तासच रहा आणि अगदी ताजेतवाने बना.
- ❖ असे वाटते की मूल हे आराम आणि विश्रांती यांचा बगीचा आहे.

✱✱✱

## ३. आपल्या मुलांच्या कल्याणासाठी

आपल्या मुलांच्या कल्याणासाठी आम्ही काय करणार आहोत?

हा एक नवा प्रश्न आहे. आधी आपण मुलांच्यासाठी काय करत नाही की आम्हाला असा प्रश्न विचारला जातो?

आपण आपल्या मुलांना भरवतो आणि खेळवतो. आपण त्यांना कपडे घालतो. शाळेत पाठवून त्यांना शिकवतो त्यांच्यासाठी आपण पैसा साठवतो. एवढे करुन सुद्धा आम्हाला असा प्रश्न का विचारला जातो?

या अशा प्रश्नाबद्दल आपण थोडा गांभीर्याने विचार करूया.

आपल्या मुलांकरिता आपण एवढी कामे तर करत असतोच.

मुलांना आपण बेढब कपडे घालू नका. त्याला दागिन्यांनी सजवू नका, पण आपण त्यांना नीटनेटके ठेऊ या.

आपल्या मुलांना आपण वाईट पुस्तके आणि वाईट सवयी पासून वाचवा. आपण त्याला प्राणघातक शाळेतून काढा.

कोणत्याही परिस्थितीत आपल्या मुलांना कोणत्याही प्रकारची शिक्षा देऊ नका. काय आपण मुलांच्या कल्याणासाठी एवढे काम करणार नाही काय ?

क्लबमध्ये जाणे सोडून आपण त्यांना बागेत फिरायला नेणार नाही का?

आपल्या मित्रांच्या गाठीभेटी सोडून आपण आपल्या मुलांना प्रदर्शनस्थळ आणि बाजार दाखवायला नेणार नाही का?

काही वेळेसाठी वर्तमानपत्र वाचणे सोडून आपण आपल्या मुलांच्या प्रेममय गोष्टी ऐकणार नाही का?

काही वेळेसाठी आपण आपल्या व्यवसायाच्या गोष्टी विसरुन आणि आपला अभ्यास एका बाजूला ठेवून आपण मुलांना गोडगोड गोष्टी ऐकवून झोपविणे पसंत करणार नाही का?

काही क्षणासाठी आपल्या मनातील असलेले विचार आणि आपल्या विश्रांतीचा त्याग करुन आपण मुलांना छोटेसे गाणे ऐकवणार नाही का?

जर आपणाला मुले खरच आवडत असतील तर खाली सांगितलेल्या



गोष्टी अजिबात करु नका.

आपण मुलांना टोचून बोलू नका. 'त्यांचा अपमान करु नका.' 'जेवणाच्या वेळीतर त्यांच्यावर अजिबात नाराज होऊ नका.' कोणत्याही परिस्थितीत मुलांना झोपायच्या वेळी रडवू नका.

मुलांच्या जेवणाच्या वेळी त्याच्या आनंदाचाच विचार करावा. झोपायच्या वेळी आपण त्याच्या सुखी स्वप्नांच्याच गोष्टी कराव्यात. घरात जे काही बनवले असेल आणि मुलाला जे काही आवडते तेच त्याला पाहिजे तेवढे खाऊ द्या.

मुलाला हे सांगण्याचा काय फायदा आहे की त्याने हा पदार्थ खावा आणि तो पदार्थ खावा?

रात्री आपण मुलाला थप्पड मारुन झोपवण्याने कोणती मोठी गोष्ट मिळवता?

आपल्या चैनीसाठी आपले पापयुक्त जागरण महत्त्वाचे आहे. की आपल्या मुलाच्या निखळ आनंदासाठी केलेले जागरण महत्त्वाचे आहे?

झोपेच्या गोळया देऊन आपण आपल्या मुलाला का झोपवता? यासाठी की, ते आपल्या 'आनंदात' बाधा आणते म्हणून?

जर आपणाला आराम आणि चैनीचे सुख घ्यायचे होते तर आपण कोणालातरी त्या मुलाला त्यांच्यात बोलावून घ्यायला का सांगत नाही?

काय आपल्यामध्ये मुलांचे येणे ही आकस्मिक घटना आहे काय?

मुलाने रात्री जागणे काही आई वडिलांना चांगले वाटत नाही काय? का या कारणाने त्यांना रात्री खूप जागावे लागते का? नाटक, सिनेमा, बुद्धिबळ किंवा पत्ते खेळण्याच्या कारणाने होणाऱ्या जागरणाचा हिशेब कोणाला विचारावा?

परंतु कोणाला माहीत आहे की लहान मूल हे अनंत विश्वात रमणारे असते? मुलाच्या आनंदासाठी दिवस काय आणि रात्र काय, सकाळ काय, दुपार काय आणि संध्याकाळ काय? सगळे काही समानच असते. ज्या दिवसापासून आपण मूल राहिलो नाही त्याच दिवसापासून आपल्या जीवनात रात्रीचा दाट अंधार सुरु झाला.

मुलाला गडद अंधाऱ्या रात्रीत सुद्धा उजेड दिसतो. या व्यतिरिक्त अज्ञानी आणि पापी मनात दिवसाच्या उजेडातही दाट अंधार पसरलेला असतो.

निर्दोष मनच अंधारातही प्रकाशाचे दर्शन करु शकते.

आपल्या बालकांचे हित लक्षात घेऊन आपण खालील कामे अजिबात करु नका.

आपण आपल्या शेजाऱ्याची भांडू नका. खोट्या स्वभावाच्या शेजाऱ्यांपासून आपण हजार हात दूर रहावे. कद्रू स्वभावाच्या आपल्या मित्रांची संगत सोडा. वाईट स्वभावाचे आपले भाऊ-बहीण अथवा असे दुसरे नातेवाईक यांना आपण दुरुनच नमस्कार करा.

आपल्या कुटुंबातील दुर्गुण काढून टाकण्यासाठी त्या दुर्गुणांचा प्रतिकार न घाबरता करा.

आपण आपल्यामधील दोष दूर करण्याचा निश्चय करा. लहान मुलाला इजा पोहचविणाऱ्या त्याच्या आईचा त्याग करावा लागला तरी तो अधर्म मानू नका. आपल्या घरात मुलांसाठी स्वर्ग बनवायचा असेल तर त्यांच्यासाठी आपण अवघडात अवघड असा आपला बळी देण्याससुद्धा मागेपुढे पाहू नका.

आपणाला आपली मुले आवडतात तर कोणत्याही परिस्थितीत आपण त्यांना बिघडू देऊ नका. घरात नोकर ठेऊन आपल्या मुलांना बिघडवू नका. परदेशी खेळण्यांच्या झगमगाटाने आपण मुलांना बिघडवू नका. सुरवातीपासूनच हिंसेचा धडा देऊन आपण आपल्या मुलांना पशू बनवू नका.

काय आपण आपल्या मुलांना मुक्त करणार नाही का? आपल्या विश्वासाची बेडी, आपला एकांगी आदर्श; आपणाला आवडणारा अभ्यास, आपण आपल्या गळयात आनंदाने घालून घेतलेली रुढींची बंधने, शिष्टाचाराचा अतिरेक आणि पारतंत्र्याचा पाश या गोष्टीपासून मुलांना मुक्तता हवी असते.

एकदा आपण समाजाच्या अत्याचारी अशा गुलामीपासून मुक्त व्हा आणि नंतर आपल्या लहान मुलांना त्या गुलामीपासून मुक्त करा. आपणाला हे माहीत आहे की गुलाम व्यक्तींची मुले शेवटी गुलामच बनतील.

या, आपण पुन्हा विचार करु की मुलांच्या कल्याणासाठी आपण काय काय करावे?

जी आज मुलगी आहे, उद्या तीच गृहिणी बनेल. जो आज लहान मुलगा आहे उद्या तोच नागरिक बनेल.

## यांच्यासाठी आपण काय करावे ?

आज ते आपल्याकडून जे काही शिकतील, उद्या ते तसेच वागतील.

आज आपण जे करणार नाही, येणाऱ्या काळात ते त्याच्याकडून होणार नाही. आज आपण ज्या गोष्टीचा त्याग करु, त्याचा त्याग करण्याचे ते नक्की



शिकतील. या आपण पुन्हा विचार करु की आपल्या मुलांच्या कल्याणासाठी आपणाला अजून काय काय करायचे आहे?

मुले आमचे भावी नागरिक आहेत. भावी नागरिकांचे बीज लहान मुलातच असते. जशी आमची मुले असतील तसेच आमचे भावी नागरिक बनतील.

या, आपण विचार करू की अशा मुलांच्याकरिता आपणाला काय करायचे आहे ?

मूल हे भावी कुलदीपक आहे.

मूल हा पुढील पिढीचा प्रकाश आहे.

मूल हा पुढील काळातील जनतेचा प्रेषित आहे.

आपल्या अशा मुलांच्या करिता आपण काय करावे?

ईश्वराने आम्हाला मूल याच्यासाठी दिले आहे की त्याच्या मिळण्याने आपण आपले भावी जीवन प्रकाशमान करु शकू.

नवे जीवन जगण्यासाठी ईश्वराने आपल्याला मूल दिले आहे.

आपल्यामध्ये नवीन चैतन्य जागवण्यासाठी ईश्वराने आपणास मूल दिले आहे.

कल्याणाच्या मार्गावर पुढे जाण्यासाठी ईश्वराने आपणास मूल दिले आहे.

स्वतः ईश्वराने आपणास जे मूल दिले आहे त्या मुलांसाठी आपणास काय काय केले पाहिजे?

मुलाचे सुख कशात आहे? याचा आपण विचार करावा.

आपण जरुर लक्षात घ्यावे की, मुलाचे सुख आपण त्याला त्याच्या हाताने खावू देण्यात आहे, कोणी त्याला खायला घालावे यामध्ये नाही.

मुलाचे सुख हे त्याला स्वतःला चालू देण्यात आहे. त्याला कुशीत उचलून घेण्यात अजिबात नाही.

मुलाचे सुख त्याला स्वतःला खेळू देण्यात आहे. त्याला खेळवण्यात अजिबात नाही.

मुलाचे सुख त्याला स्वतःला गाणे गाऊ देण्यात आहे. याच्यात नाही की कोणी त्याच्यासमोर गाणे म्हणावे आणि त्याला गायला सांगावे.

मुलाचे खरे सुख सगळे काही त्याने स्वतः करण्यात आहे. याच्यात नाही की कोणी त्याचा हा सहज असणारा अधिकार त्याच्याकडून काढून घ्यावा.

✻✻✻

# ४. मुलाचे घरामधील स्थान कोणते ?

घरामध्ये दररोज स्वयंपाक कोणाला विचारुन केला जातो?

किती माता स्वयंपाक करताना विचार करतात की त्यांनी तयार केलेले पदार्थ मुलांना आवडतील की नाही? ते त्यांना पचतील की नाही?

जर मुलाला एखादा पदार्थ आवडत नसेल तर आपण मुलाला खायचे कळत नाही असे म्हणतो. शिवाय त्याला चव कळत नाही असेही म्हणतो.

जर मुलाला एखादा पदार्थ बेचव वाटतो आणि तो पदार्थ खाण्याला मुलगा नकार देतो, तर आपण त्याला असे पदार्थ खाण्याची सवय लावली पाहिजे असे म्हणतो.

आपणाला खारट आणि आंबट पदार्थ चांगले लागतात. त्यामुळे आपणालाही मुलाने खारट आणि आंबट पदार्थ खावेत असे वाटते. आपणाला भात चांगला लागतो किंवा भात आणि सार चांगला लागतो. तर आपण सारभाताचे समर्थन करतो.

मुलाने आपला हुकूम मानलाच पाहिजे कारण आपले शरीर मुलाच्या शरीरापेक्षा मोठे आहे. परंतु आम्हाला याच्यापासूनही आनंद कोठे होतो? आम्हाला वाटते की मुलाने आमच्या सवयी, आमची आवड आणि आमची पसंत स्वतः स्वीकारावी.

आपण ज्या पद्धतीने बसतो ती पद्धत मुलाने शिकावी. अशी अपेक्षा आपण धरतो. आम्ही जसे बोलतो तसेच मुलाने बोलावे असे वाटते. तरच त्या मुलाला बोलता येते असे मानले जाते. आम्ही जे खातो ते मुलाने खाल्ले नाहीतर कसे मानता की मुलाला खायला येते?

आम्हाला असे वाटते की, आमच्या मुलांनी आमच्या सारखे बनावे. आम्ही स्वतःच ठरवलेले असते की मुलांसाठी आपला आदर्श पुरेसा आहे. कधी आम्ही याचा विचार केला आहे का? की आमची मुले आमच्या पेक्षाही मोठी आवड, मोठी वृत्ती आणि शक्ती असणारे बनू इच्छितात.

आपणाला हा इतिहास माहीत आहे का? आपल्या पूर्वजांच्या तुलनेत



आपण कोणकोणत्या गोष्टीत प्रगती केली आहे?

जग पुढे जाते की मागे हटते? आमच्या मनामध्ये आमच्या मुलांकरिता किती जागा आहे? जर आपल्या मुलांनी परदेशी कपड्यांच्या ऐवजी स्वदेशी कपडे वापरावेत असे वाटते तर आपले अर्थशास्त्र त्यात अडसर ठरत नाही का? ही गोष्ट खरी आहे की खोटी? आपण आपल्या मुलांना नवीन युगाच्या नवीन कल्पना स्वीकारायला संधी देतो का?

काही मुलांना डोक्यावर टोपी घालणे आणि पायात चपला घालणे चांगले वाटत नाही. परंतु मुलांनी टोपी न घालणे आणि अनवाणी फिरणे यामध्ये वडिलांची प्रतिष्ठा जात असेल तर याच्यावर उपाय कोणता?

शर्टाला खिसा कोठे लावावा हे वडील ठरवणार असतील तर या बाबतीतील मुलाची सोय कशी लक्षात घ्यावी?

मुलीचा घागरा आणि तिचे पोलके याचा प्रकार आईनेच ठरवायचाना? मुलामध्ये आपली पसंती आपण ठरविण्याची शक्ती असते. याचा विचार कोणी करत नाही. आमच्या बालपणी आम्ही आमच्या पसंतीच्या वस्तू कधी वापरल्या? कारण आम्ही त्या दिवसात गुलाम राहिलो म्हणून आमच्या मुलांनीही त्या गुलामीचे प्रायश्चित्त घ्यायचे का?

आपल्या मुलांनी कोणत्यावेळी, कोणत्या दिवशी, कसे कपडे वापरावेत याचा निर्णय अनुभवी आई करु शकेल का? जे काही आईच्या नजरेला चांगले वाटते तेचसर्वांना आवडते. जर मुलाने बाहेर किंवा सभेला शोभतील असे कपडे वापरले नसतील तर आईची अब्रू जाते काय? लहान मुलांना आपली स्वतःची प्रतिष्ठा असते का?

मूल हे आई-वडिलांची प्रतिष्ठा राखण्याचे एक साधन आहे काय?

मूल हे आई वडिलांचा अभिमान आणि दांभिकता यांना समाधानी करण्याचे उपकरण आहे काय ?

म्हातारी आई स्वतः जी वस्तू आपण वापरु शकत नाही ती वस्तू आपल्या मुलावर लादते. भले जेव्हा आई दुःखात बुडालेली असेल तेव्हा तिच्या मुलाने मौज मजा कशी करावी?

मुलांची स्वतःची क्षमता ती किती? त्यांना रंगाचा विचार असतो का? त्या बिचाऱ्यांना कलेतील काही समजतेका? संदर्भ म्हणजे काय ते जाणतात का? ते

तर आपल्या आई-वडिलांचे बाहुला आणि बाहुली असतात. आई वडील आपल्या इच्छेनुसार आपल्या मुलांना सजवतात आणि त्यांना पाहून खुष होतात. ते मुलांना खेळवतात आणि भरवतात. हेच सगळे त्या मुलाच्या नशिबी असते आणि त्याचेच आई वडील खूच चांगले मानले जातात.

मुलाला खूप वाटते की आपण विवस्त्र राहूनच खेळावे-बागडावे परंतु त्याच्या त्या स्थितीमध्ये आपल्या शिष्टाचाराचे काय होईल? स्वतः आई-वडील शिष्टाचाराच्या गुलामीमधून सुटून आपल्या मुलाची त्या गुलामगिरीतून सुटका करु शकतील ना?

जरी उकाडा भरपूर असला आणि शरीरातून घामाच्या धारा निघत असल्या तरीही मुलाला कपडे घालावे लागतीलच. जरी मुलाला हिंडण्या फिरण्याचे स्वातंत्र्य मिळाले नाही तरी त्याला कपडे तर घालावेच लागतील. विवस्त्र मूल किती वाईट वाटते ना? मुलाच्या सुंदर शरीराला नकली कपड्यांनी झाकल्यानंतरच आपणाला समाधान मिळते आणि त्याच वेळेला आपल्या कलेचे आणि रसिकतेचे दिवाळे सुद्धा निघते.

परंतु मूल एक सामाजिक प्राणी सुद्धा आहे ना? समाजाचे सर्व नियम त्याला जाणून घ्यावे लागतील ना? परंतु तो लहान पणापासून कपडे घालणे शिकला नाही आणि मोठा झाल्यावर तो विवस्त्र राहू लागला तर, विचार करा तो कसा दिसेल?

मूल हे निसर्गाचे 'मूल' आहे. मोकळी हवा आणि उगवणाऱ्या सूर्याचे ऊन या दोन्ही गोष्टी त्याचे मित्र आहेत. मुलांना भूमातेची कूस आपल्या आईच्या कुशीपेक्षा अधिक प्रिय वाटते. धरती तर मुलाच्या आईची आई असते ना?

जर मुलाला मोकळया हवेत हिंडूफिरु दिले तर त्याला पडसे येणार नाही का? सूर्याचे ऊन लागण्याने मुलाला ताप तर येणार नाही ना? मूल जमिनीवर चालेल-फिरेल, तर त्याचे कपडे आणि त्याचे शरीर घाण होईल. हा आपला एक विचार आहे.

झोपण्याने अंथरुण घाण होते म्हणून अंथरुणावर झोपायचे नाही. खेळण्याने कपडे घाण होतात म्हणून खेळायचे नाही. हा आपला न्याय आहे. आपल्या स्वतःसाठी एक नियम आणि मुलांसाठी दुसरा नियम असतो.

जर कोणी कधी कोणत्या मुलाला विचारले,''बाळा! तुला खेळायला



पाहिजे की कपड्यांची राखण करायला पाहिजे?'' तर विचार करा की कशी आपल्या थोबाडीत बसल्यासारखे उत्तर मिळेल.

निसर्गाची साथ आणि सहवास बालकाच्या जीवनात संचार करत असतो. कोणाला काय माहीत की पृथ्वीच्या साध्या स्पर्शात मुलाचा किती आणि कसा आनंद लपलेला असेल?

मुलाला मोकळे राहून किती चांगले वाटत असेल? हे आपणाला तेव्हा समजेल की, जेव्हा मूल आपल्या पुढे पुढे पळत राहील आणि आपण त्याच्या मागे मागे पळत राहू.

कोणाला असा कोणता अंदाज आहे का की, मुलाच्या दृष्टीमध्ये सृष्टीतील सारे जीवन विविध चमत्कारांनी भरले आहे.

जमिनीवरील धूळ मुलाला आपल्या चंदनापेक्षाही अधिक प्रिय वाटते.

हवेची गोड लहर मुलाला आपल्या वासनायुक्त चुंबनापेक्षा अधिक गोड वाटते.

उगवत्या सूर्याची कोमल किरणे मुलाला आमच्या खरबरीत हातापेक्षा मऊ वाटतात.

जेथे आम्हाला काहीच दिसत नाही तेथे मुलाला चमत्कार दिसतात.

छोट्याशा फुलपाखराला पाहून मूल वेडे बनते. ते फुलपाखराबरोबर स्वतः फुलपाखरु बनते. बेडकाला पाहून ते उसळते आणि उड्या मारू लागते. घोड्याला पाहून ते खिदळायला लागते आणि गाईला पाहून तिला चुचकारायला लागते.

गवताचे एक छोटेशे पाते मुलाला एक मोठी संग्रह करण्याची वस्तू वाटते.

जर कधी आपण आपल्या मुलाचा खिसा पाहिला तर त्या मध्ये आपणाला गवताच्या काड्या, फुले आणि पाने भरलेली दिसतील.

निसर्गाबरोबर समरस झाल्याशिवाय मुलाला निसर्गाचे रहस्य कसे समजेल?

चंद्राची चांदणी, छोटीशी नदी, शेतातील माती, वाडीतील घर, टेकडीवरील खडे, मोकळया मैदानातील हवा आणि आकाशाचा रंग यासर्व भेटवस्तू आहेत. ज्या मुलाला निसर्गापासून मिळाल्या आहेत.

याचा भरपूर उपयोग करत राहण्यापासून आपण मुलाला का अडवावे ?

जरी मुलाला उघड्या आकाशाखाली आणि मोकळया जमिनीवर दिवसरात्र

ठेवले तरी तो कधी घरामध्ये येण्याची गोष्ट करणार नाही.

फुले ही मुलाचे जिवलग मित्र आहेत. फुलांना पाहून मूल वेड्यासारखे बनते. फुलांना दुरूनच पाहून त्यांचे नाक आपले काम सुरू करते. त्यांच्या चेहऱ्यावर एक चमक येते. त्यांच्या दातांच्या कळया खुलतात. त्यांच्या गालावर दोन छोट्या खळया पडतात.

मूल फुलावर असे लुब्ध होते की ज्याप्रमाणे आई आपल्या मुलावर लुब्ध होते.

पहिल्यांदा मुलाला निसर्गाची गोडी समजते आणि नंतर त्याला आमची गोडी समजते.

खाली धुळीत झोपून जेव्हा मूल वर आकाशाकडे पाहते तेव्हा ते काय करते? तेव्हा ते साऱ्या निसर्गाला पीत असते. ते सगळया जगावर प्रभाव पाडते.

चंद्र हा मुलाला रोज नवा आनंद देतो.

चंद्र रात्रीच दिसतो म्हणून मूल बरोबर विचार करते की दिवसा चंद्र कोठे लपत असेल? कदाचित लपालपीचा खेळ मुलांनी चंद्रापासून शिकला असावा.

तुपाने भिजलेल्या भाकरीचा अर्थ आपण आवडीनुसार लावतो. हे काम कला साहित्य जाणकारांचे आहे. आपण रडणाऱ्या मुलाला शांत करण्यासाठी तूप रोटीचा खेळ खेळलो तरी मुलाला वाटते की त्याला चंद्राची चांदणी खाऊ घातली जात आहे.

चंद्रप्रकाश आणि त्याची शीतलता कोणाला चांगली वाटणार नाही? मुलाचा आनंद तर चंद्राचा रंग पाहण्यामध्ये आहे. चंद्रप्रकाशात न्हाण्यात आहे. चंद्रप्रकाश आपल्या डोळयात साठवण्यात आहे.

चंद्रावर एक हरिण आणि एक म्हातारी बसली आहे ही गोष्ट मूल लगेच मान्य करते. हा मुलाचा भोळेपणा नाही. हा तर त्याचा वेडेपणा आहे. निसर्गाबरोबर मुलाचा असाच लळा लागलेला असतो. मुलाच्या बुद्धीला विज्ञानाचा कर्कश पणा चांगला वाटत नाही. याच कारणाने मुलाला पऱ्यांच्या गोष्टी आवडतात. अद्‌भुतपणा हा मुलाचा स्वभाव आहे आणि याच अद्‌भुतपणामध्ये त्याचा आनंद समाविष्ट झाला आहे.

परंतु मुलाबरोबर चंद्राच्या चांदण्यामध्ये फिरायला आम्हाला वेळ कोठे आहे? काय आम्हाला चांदणीवर कविता लिहायची आहे? आम्हाला हरिण



आणि म्हातारी या लोककथेच्या मुळाचा शोध घ्यायचा आहे का? चंद्रावर जिवंत प्राणी राहतात की नाही, याचा शोध आम्हाला घ्यायचा आहे की नाही?

परंतु या सर्व कामासाठी आज मोकळा वेळ कोणाजवळ आहे?

मनुष्य खरा कवी कसा बनेल?

मनुष्याला चित्रकलेतील चमत्काराचे दर्शन कसे होईल?

निसर्गाला जाणल्याशिवाय मनुष्य निसर्गाला कसा चित्रित करेल? तो त्याचे गाणे कसे म्हणेल? तो त्याच्यावर कविता कशा लिहील?

जेवणाशिवाय पोट कधी भरेल का? आपल्या मुलाला निसर्गापासून दूर ठेऊन आपण त्याला काय बनवणार आहात? देव की दानव?

आता मी पुन्हा तोच प्रश्न विचारतो, घरामध्ये मुलाचे स्थान काय आहे ?

आपल्यासाठी भाड्याचे घर पसंत करताना आपण मुलांसाठी कोणती जागा आहे की नाही? याचा विचार करत नाही. पण आपण घर मालकाला हे मात्र निश्चित विचारतो की घरात मोरी आहे की नाही? स्वयंपाक घरात उजेड येतो की नाही? झोपण्याच्या खोलीत हवा येते की नाही? स्नानाकरिता नळ आणि मलमूत्र विसर्जनासाठी संडास आहे की नाही? गाद्या आणि उशांना ऊन देण्यासाठी वर गच्ची आहे की नाही? परंतु अजून पर्यंत घरामध्ये जाऊन मुलांच्यासाठी खेळण्याकरिता जागा आहे की नाही हे कोणीही विचारलेले नाही. भाड्याने घर घेताना आपणाला आपली मुले आठवतील कशी? मुलांच्यासाठी वेगळया जागेची गरजच काय? आम्हाला हा विचारच नवीन आणि वेगळा वाटतो. मुलांऐवजी छोट्या-छोट्या प्राण्यांकरिता आजपासूनच वेगळया हक्काचा विचार कसा? त्यांच्यासाठी आजपासूनच ही सारी खटपट कशी हे सारे घर त्यांचेच असते. इथेच राहून त्यांनी खावे, प्यावे आणि मजा करावी. यासाऱ्या घरामध्ये हिंडणे, फिरणे आणि खेळण्यापासून त्यांना कोणी अडवावे?

परंतु मुलांनी गाणे कोठे म्हणावे?

त्यांनी गोष्टी कोठे कराव्यात?

त्यांनी कोठे खेळावे?

त्यांना नाचावे, उड्या माराव्या वाटले तर त्यांनी कोठे नाचावे? आणि कोठे उड्या माराव्यात?

मुले स्वयंपाक घरात जातात तेव्हा तेथे आईला त्रास वाटतो. आईची सर्व

व्यवस्था कोलमडून पडते. स्वयंपाक घर घाण होते. ती पूजा करत असेल तर अडथळा येतो.

मुलाने दिवाणखान्यात जावे तर तेथे वडील वर्तमानपत्र वाचत असतात किंवा आपल्या पक्षकारांसाठी दावा तयार करत असतात किंवा गावात होणाऱ्या आपल्या भाषणाचे टिपण काढत असतात, तेथे मुलाला गडबड करण्याची परवानगी कोण देणार?

इकडे व्हरांड्यामध्ये मोठा भाऊ आणि मोठी बहीण दोघेही आपल्या कामात मग्न असतात. तेथे मुलाने कसे जावे? कसे खेळावे? कसे गावे?

याप्रमाणे आपल्याच घरात मुलाला जेथे जावे तेथून रिकाम्या हाताने परतावे लागते.

कधी चुकून मुलाला घरामध्ये एखादा कोपरा मिळाला तर तो तेथे आपली कल्पना लढवून बाहुला बाहुलीचा खेळ खेळणार असतो किंवा त्याला खोटा खोटा स्वयंपाक करणे आणि खोटे खोटे खाण्याचा खेळ खेळावा लागतो.

परंतु जरा विचार करा की आमच्या मुलांच्या कल्पना शक्तीचा खरा खरा विकास कसा होईल?

आपल्या घरात आमच्यासाठी आणि आमच्या पाहुण्यासाठी टेबल असते, खुर्ची असते, चटई असते आणि गालिचा इत्यादी वस्तू अंथरलेल्या असतात. परंतु त्याच घरात आपण आपल्या मुलांसाठी साधा तरटाचा तुकडा सांभाळून ठेवतो का?

जरी आमच्या मुलांना त्याचे मित्र भेटायला आले तर त्यांना आपण कोठे बसवतो? परंतु आपण हे जाणण्याचा कधी प्रयत्न करतो का की लहान मुलांना सुद्धा त्यांचे मित्र असतात.

आपल्याजवळ आपले कपडे आणि दागिने ठेवण्यासाठी कपाट किंवा पेटी असते. परंतु आपल्या मुलांनी आपले शंख आणि शिंपले कोठे ठेवावीत?

काय आपल्या घरात आपल्या मुलांनी एकत्र केलेले पंख आणि बाहुल्या, बाहुलीचे कपडे ठेवण्यासाठी कोठे जागा आहे का? आमची कोणती वस्तू चोरीला गेली तर मुलाचे तिच्याकडे लक्ष जात नाही; पण त्याने एकत्र केलेले पंख किंवा फुटलेल्या कवड्या कोणी घेऊन गेले तर त्याला काय वाटेल? तो असे मानेल की त्याचे सर्व काही संपून गेले. परंतु आपल्या मुलांच्या अशा मूल्यवान वस्तू सांभाळून



ठेवण्यासाठी आपण त्याला एखादी पेटी किंवा डबा सुद्धा देत नाही. आपल्या मुलाबरोबर आपला हा कसा विचित्र व्यवहार आहे?

खरेतर आज आपल्या घरात मुलांची पर्वा कोण करतो?

आपल्या घरात आपल्या मुलांचा हात पोहोचू शकेल अशा खुंट्या कोठे आहेत? अशी कपाटे कोठे आहेत? आपल्या घरात लावलेली मोठी मोठी चित्रे खूप उंचावर लटकवलेली असतात. त्यांच्याकडे आपले लक्ष खूप कमी जाते. अशा स्थितीत मुलांच्यासाठी त्यांचा काय उपयोग होतो?

आपल्या मुलाचे कपडे आपण अडकवून ठेवतो.

वर ठेवलेले तांबे आणि पेले त्यांना आपण काढून देतो.

मोठ्या मोठ्या पट्ट्या किंवा आसने आपण अंथरतो.

थाळयासुद्धा आम्ही लावतो.

बिचाऱ्या मुलाने काय करावे? यासर्व मोठ्यामोठ्या वस्तू त्याने कशा उचलाव्यात? कशा हलवाव्यात? कशा पकडाव्यात? मुलाला आपली सर्व कामे आपण स्वतः करावीत असे वाटते. परंतु तो ती करू शकत नाही. तो ही कामे कशी करू शकेल?

आम्हीतर असे मानतो की आमचा मुलगा आपली कामे स्वतः करण्याला पात्र नाही. म्हणून त्याची सर्व कामे आपणच करावीत. आपली मुले प्रिय असणारे आईवडील ही सर्व कामे करून असे मानतात की त्यांनी आपल्या मुलांना सुखी ठेवले आहे.

आपल्या मुलांचे महत्त्व समजल्याचा दावा करणारे आई-वडील असे मानतात की आपल्या मुलांसाठी आपण काहीही करू शकतो. म्हणून सर्वांनी त्यांना आदर दाखवावा. सर्वांनी त्यांचा सन्मान करावा. परंतु प्रत्यक्षात हे लोक आपल्या मुलांना क्षणाक्षणाने अपंग बनवतात आणि त्यांना आपले गुलाम करतात. आम्ही ज्यांचे गुलाम बनायला हवे तोच आमचा मोठा गुलाम बनतो.

आम्ही आपल्या मुलावर विश्वास ठेवतो का? त्याच्या कामाची भांडी त्याला उचलू देतो का? कोणाचे जेवण वाढण्याची संधी त्यांना केव्हा देतो? काय आपण त्यांना दिवाबत्ती करू देतो का? काय आपण कधी त्यांना चूल पेटवू देतो का? त्यांचे छोटे छोटे रुमाल आणि कपडे त्यांना धुवू देतो का?

आपण तर म्हणतो की मूल त्याची कामे स्वतः करू शकत नाही. आम्ही

मानतो की त्याच्यामध्ये ही व्यवस्था करण्याची शक्ती नसते. परंतु आमच्याजवळ मुलाला पाहणे समजून घेणे याबद्दलची नजर कोठे असते?

अज्ञानाच्या घोर अंधाराने आम्हाला सर्व बाजूंनी घेरले आहे.

आपल्या मुलावर विश्वास ठेवून आम्ही कधी त्याला एखादे काम करण्याची संधी दिली आहे का?

मुलाऐवजी आम्ही कधी खात पीत नाही. मुला ऐवजी आम्ही कधी हिंडत फिरत नाही. मुलाऐवजी कधी आम्ही खेळत अथवा उड्या मारत नाही.

परंतु आम्ही आपल्या मुलाऐवजी त्याची भांडी घासतो. त्याला कपडे सुद्धा आपणच घालतो. जेवणाच्या वेळी त्याच्यासाठी पाट सुद्धा आपणच मांडतो.

जर कोणी आम्हाला आमच्यासाठी योग्य असणारी कामे करताना अडवले तर त्याचे हे वागणे आपणास कसे वाटेल? या स्थितीमध्ये आमची अवस्था गुलामासारखी होईल की मालकासारखी?

काय असे मालकपण आपण मान्य करु का?

हे मालकपण असेल की मुडदेपणा?

खरेतर मूल सर्वकाही करू शकते, ते आपली छोटी छोटी भांडी स्वतः घासू शकते. छोट्या झाडूने खोलीची साफसफाई करू शकते. ते आपल्या छोट्या बहिणीला झोका देऊ शकते.

पण या सर्व गोष्टी आम्हाला सुचतात कोठे?

जर मुलाला आपण आपल्या घरात वरिष्ठ स्थान दिले तर आपल्या या पृथ्वीवर स्वर्गाचे राज्य स्थापन केल्यासारखे होईल, आपल्या घरात खेळायला ईश्वर येईल. ईश्वराला या मृत्युलोकात जन्म घ्यावा लागेल.

मुलाच्या सुखातच स्वर्ग आहे.

मुलाच्या स्वास्थ्यातच स्वर्ग आहे. मुलाच्या आनंदात स्वर्ग आहे.

मुलाच्या निष्पाप खोडीमध्ये सर्व आहे.

मुलाच्या गाणे म्हणण्यात आणि गुणगुणण्यात स्वर्ग आहे.

***



# ५. मुलाने घरात काय करावे ?

नेहमी विचारले जाते की, आमचा मुलगा शिशु शाळेत किंवा शाळेत शिकायला जातो. तो तेथे कामात असतो. परंतु घरी आल्यानंतर त्याने काय करावे? आम्हाला माहीत नसते की घरात त्याला करण्याजोगी काही कामे असू शकतात. घरात काम मिळत नाही म्हणून मुलगा आळशी बनतो किंवा उंडगा बनून इकडे तिकडे भटकतो किंवा अडचणीत सापडून ठेचा खातो. आम्ही जाणू इच्छितो की मुलाने घरात काय करावे? आम्हाला मुलाने सुखी आणि कामात गुंतलेले पाहायचे असते. म्हणून या बाबतीत आपण आम्हाला मार्गदर्शन करावे.

या प्रश्नाचे उत्तर म्हणून खाली काही कामांची माहिती देत आहोत जी कामे मुले घरात करू शकतील.

घर म्हणजे मुलासाठी कोणते छोटे-मोठे जग नव्हे. तेथे त्याला योग्य अशी काही कामे आहेत. आपले लक्ष त्या कामाकडे गेलेले नाही आणि ती कामे आम्ही मुलांना सुचवलेली नाहीत. मूल जेव्हा जेव्हा स्वतः आपल्या आवडीचे काम शोधते तेव्हा तेव्हा आपण त्याला अजाणतेपणी विरोध केलेला असतो. त्याची कित्येक चांगली कामे दाबून टाकण्यासाठी आपण त्याला दम दिलेला असतो आणि शिक्षा सुद्धा दिलेली असते. परंतु आता यागोष्टी आपण विसरुन जाऊ आणि नवीन पद्धतीने नवीन शृंखला सुरू करू.

आपण थोडा खोल विचार करून पाहूया. आम्हाला समजेल की मूल काहीना काही करु शकते. आम्ही काही अधिक वेळ पर्यंत उभा राहून मुलाला काम करताना पाहिले तर आम्हाला समजेल की जे काम करत आहे ते एक ठरलेले काम आहे. त्याच्यामागे त्याचा कोणता ना कोणातातरी निश्चित हेतू आहे. तो हेतू साध्य करण्यासाठी त्याच्या मनात एक विशिष्ट कल्पना असते. आपल्या छोट्या परंतु प्रबळ क्रिया शक्तीच्या मदतीने तो त्या कामात यशस्वी होण्यासाठी अखंड परिश्रम करतो आहे. आपल्या सौजन्यशील आणि कल्पनाशील बुद्धीच्या मदतीने त्याने नेहमी उपयोगी वस्तू आणि साधने शोधली आहेत. तो आपल्या कामात अगदी असाधारण रुपाने मग्न झाला आहे.

या प्रकारचे काम मुलाचे खरे काम आहे. ही कामे पाहून मुलाच्या आवडीच्या कामांची एक यादी आम्हाला तयार करावी लागेल. मुलाच्या आवडीची अशी कामे आपण त्याला करु दिली तर तो लगेच ती कामे करेल. त्या कामात तो गुंगून जाईल. ती कामे करून त्याला आनंद आणि सुख मिळेल.

अलिकडे आपल्या घरामध्ये कधी काही कामे मुलांच्या हाती अचानक लागतात. अशी कामे आपण दिवा घेऊन शोधत राहिलो तर ती आपणास सापडत नाहीत. परंतु जेव्हा अशी काही कामे मुलांना मिळत नाहीत तेव्हा ती इकडे तिकडे भटकत राहतात. ज्याला आम्ही वैताग देणे असे म्हणतो तसे ते आपणाला वैताग देत राहतात. मुलांकरिता आपणाला कोणतीही नवीन कामे शोधायची नाहीत की उभा करायची नाहीत. जी कामे त्यांच्या आवडीची आहेत त्यांची आपणास व्यवस्था करायची आहे. दुसरा अर्थ असा झाला की आम्ही त्या कामाकरिता आवश्यक असणाऱ्या साधनांची व्यवस्था करावी. त्या कामासाठी जागा निश्चित करावी. आम्ही त्यांच्या कामात अडथळा बनू नये. आम्ही त्यांच्याकडून काम करून घेऊ नये किंवा त्यांच्या कामाचे प्रदर्शन करु नये. आपण त्यांना त्यांच्या आवडीचे काम करण्यासाठी मोकळे सोडावे. इथे काही अशा कामांची माहिती दिली जात आहे.

## १) कागद आणि कात्री

बसल्या बसल्या कागद कापण्याचे काम मुलांना चांगले वाटते. या कामावरून ते कात्रीचा उपयोग करायला शिकतात. यामुळे त्यांची बोटे आणि हाताचे स्नायू मजबूत बनतात. हळूहळू ते निश्चित आकार कापू लागतात. कापण्याच्या संदर्भात त्यांचे कौशल्य वाढत जाते.

दुसरे काम कागद कोरण्याचे आहे. कागदाच्या दोन किंवा चार घड्या घालून वेगवेगळया बाजूने कापून त्याच्या काही आकृत्या तयार होतात. नंतर जेव्हा कागदाच्या घड्या उकलल्या जातात तेव्हा मोठ्या कला कुसरीची नमुना समोर येतो. तसे पाहिले तर खूप चांगले नमुने अचानक बनतात. याचा अर्थ असा आहे की मुलाने या बद्दलची योजना बनवलेली नसते. हे सगळे अचानक होते. पण अशा अनेक प्रकारच्या आकृत्यांचे नमुने, नक्षीचे सुंदर प्रदर्शन करतात. ही नक्षी पाहून मुलांना नवीनवी नक्षी तयार करण्याचा मार्ग सापडतो. ही नक्षी स्वतःच कलाकृतीचे एक वातावरण बनते. पुढे जेव्हा मूल या आकृतींच्याबद्दल तयार



करण्याचे नियम जाणून घेईल तेव्हा नवीन नवीन आकृत्या सुद्धा तयार करु शकेल. अशा आकृत्यांचा एखादा संग्रह सुद्धा तयार केला जाऊ शकतो. अशा आकृत्या कागदावर चिकटावून ठेवता येतात.

याच्याशिवाय कात्रीच्या मदतीने मूल घरात असणारे निरुपयोगी वर्तमान पत्रातून चित्रे कापू शकते. चित्रामध्ये कडेची नक्षी किंवा वेगवेगळया अक्षरांचा सुद्धा समावेश केला जाऊ शकतो. हे सगळे एकत्र करून मूल त्यांचा संग्रह तयार करु शकते. प्रत्येक महिन्याला एक संग्रह ठरवला तर मुलांचे एक चित्रसंग्रहालय तयार होऊ शकते. या कामासाठी मुलाला कात्री, डिंकाची एक बाटली, एखादा ब्रश, कागद आणि वर्तमान पत्र दिले जावे. याशिवाय कागदाचे कपटे टाकण्यासाठी एखादी टोपली आणि हात पुसण्यासाठी एखादा कापडाचा तुकडा अवश्य द्यावा.

## २) काड्याची पेटी - रिकामी आणि भरलेली

मुले दोन्ही प्रकारच्या काड्याच्या पेट्यांचा उपयोग करतात. लहान मूल भरलेल्या काड्याच्या पेटीतून काड्या बाहेर काढील आणि पुन्हा भरेल. हे काम ते पुन्हा पुन्हा करेल याचा खेळ खूप वेळ चालत राहील. लहान मुलाला या खेळातून चांगले शिक्षण मिळते. यामधून नजर स्थिर होते. हातावर नियंत्रण येते आणि एकाग्रता वाढते. रिकाम्या काड्यांच्या पेटीच्या खेळामध्ये पेटी उघडणे आणि पेटी बंद करणे हा एक खेळ बनतो. यामुळे डोळे आणि हाताच्या स्नायूंना व्यायामाचा फायदा मिळतो.

याशिवाय या पेट्यांच्या मदतीने बंगले बनवले जाऊ शकतात. बंगल्यांचा अर्थ वेगवेगळया रचना असा आहे. यामध्ये भिंत, कठडा, विहीर, तळे, आगगाडी इत्यादींचा समावेश आहे. भिंती अनेक प्रकारच्या बनू शकतात. अशा पेट्या घरामध्ये मिळतात किंवा सहज एकत्र केल्या जाऊ शकतात. काड्याच्या पेट्या ठेवण्यासाठी मुलाला एक छोटीसी पेटी द्या आणि बसून बंगला इत्यादी तयार करण्यासाठी एक आसन सुद्धा द्या. ही साधने मिळाल्यावर मूल सतत कामात राहील.

## ३) लाकडी विटा आणि घन

ही साधने खूप महत्त्वाची आहेत. लाकडी विटा आणि घनाच्या मदतीने मुलगा मिनार, भिंत, घर, विहीर, तळे आणि विविध प्रकारचे आकार निर्माण करु शकतो. एक भिंत तयार करताना त्याचे वेगवेगळे प्रकार तयार करता येतात. त्याच्याशिवाय विटा आणि घन जमिनीवर अंथरून त्याच्या वेगवेगळया प्रकारच्या

आकृत्या बनतात.

या पेटीचा उपयोग करताना मुलाला खूप आनंद वाटतो. तो त्याच्या कल्पनेनुसार नवीन नवीन रचना रचतो. कलेच्या विकासासाठी हे काम सुंदर आणि उपकारक आहे. एक किंवा दोन किंवा दोन पेक्षा अधिक मुलांनी एकत्र येऊन ही साधने वापरावीत. मुलाला विटा आणि घनांच्या एक एक पेटी बरोबर बसण्याकरिता एक सतरंजी किंवा चटई द्या.

### ४) चित्र पाहणे आणि चित्र काढणे

मुलांना खूप वेळ गुंतवून ठेवण्याच्या कामात चित्र पाहणे आणि चित्र काढण्याच्या कामाचे खूप महत्त्व आहे. प्रत्येक घरात काही चित्रांचा संग्रह आवश्यक आहे. यामध्ये विशेष करून पोस्टकार्ड आकाराचे चित्र असावे. या चित्रामधून मुलांना चांगल्या वाटणाऱ्या विषयांची चित्रे त्यांना पसंत करता येतील. जसे पशुपक्ष्यांचे कार्ड, फुलपाखरांचे कार्ड, बाजार - हाटाचे कार्ड, तसेच नेहमी आसपास घडणाऱ्या घटनांची कार्डे, आई वडील चित्र विकत घेऊ शकत नसतील तर इकडे तिकडे पडलेली वर्तमान पत्रे, पत्र, पत्रिकामधील छापलेल्या वेगवेगळया चित्रांचे संग्रह तयार करता येतील. ही चित्रे केवळ चांगलीच नव्हे तर खरी असावीत. पण अशा चित्रांमुळे मुलांचे काम चालू राहते. चित्रांचा संग्रह करण्यामध्ये आपण आपली नजर व्यवस्थित ठेवली तर आपणालाही खूप काही मिळू शकेल, जाहिरातींचे कागद कापून सुद्धा चित्रे एकत्र करता येतात. अधिक चांगले हे होईल की या चित्रांचे अलबम बनवावेत. मुले चित्र पाहून इकडेतिकडे टाकून देतात किंवा उडवतात. यापेक्षा त्यांनी चित्र न पाहिलेले बरे. कलेचा अपमान करून माणसाला कलेची गोडी मिळत नसते. मुलांच्या ताब्यात चित्र दिल्यानंतर आपण त्यांना त्या चित्रांची निगा कशी राखावी? आणि ती चित्रे कशी सांभाळून ठेवावीत? हे सुद्धा समजून द्यावे. ही चित्रे सुरक्षित ठेवण्यासाठी एका निश्चित जागेची सोय करावी. जरी चित्रे फुकट मिळाली असली तरी त्याची निगा राखावी. रस्त्यावर पडलेल्या कागदामधून आपण चित्र मिळवलेले असले तरीही त्याच्याकडे एक कलाकृती याच भावनेने पहावे. कलेबद्दलची आपली वागणूक पाहून लोकांचा आणि मुलांचा नेहमीच हा विचार बनतो की आपणाला यासाठी किंमत द्यावी लागते. ही एक कला आहे आणि जी वस्तू फुकट मिळते. ती किंमत नसणारी असते. या पद्धतीने कलेची हत्या होते म्हणून असे विचार सोडून द्यावेत.



आपण आपल्या ऐपतीनुसार चित्रे एकत्रित करावी. परंतु आपण सगळाच चित्र संग्रह मुलाला एकदम देऊ नये. तो थोडा थोडा द्यावा. जशी जशी त्याची आवड वाढेल तशी तशी चित्रे त्याला पुन्हा पुन्हा द्यावीत. मूल वेगवेगळया वेळी त्यांच्याकडे आपल्या वेगवेगळया नजरेने पाहील.

ज्याप्रमाणे चित्र पाहणे हे आनंद दायक आणि विकासाचे काम आहे त्याप्रमाणे चित्र काढणे हे ही एक काम आहे. मूल सुद्धा चित्र काढू शकते; पण ते चित्र त्याने आपल्या हिशोबानुसार काढलेले चित्र असेल. हे चित्र मोठ्या चित्रकारासारखे निश्चित नसेल. परंतु मुलांनी बनवलेली चित्रे जर त्यांना कामात गुंतवून ठेवत असतील, त्यांना आनंद देत असतील. तर ती चित्रे त्यांना एक पाऊल पुढे टाकायला लावतात. त्यामुळे या कलाकृती खूप मूल्यवान ठरतात. आपल्या विकासाच्या मर्यादेत राहून मनुष्य जे काही वर्तन करतो तेच त्याचे अद्‌भूत, भव्य, संपूर्ण आणि सुंदर वर्तन असते. मुलांनी काढलेल्या रेघोट्यासुद्धा चित्र असते. दोन वेड्या वाकड्या रेघा आणि काही ठिपक्यांच्या मदतीने मुलांनी बनवलेले कावळयाचे किंवा गाईचे चित्र हे सुद्धा चित्रच असते.

चित्र बनविण्यासाठी मुलांना एक काळा चौरंग आणि एक चांगल्या प्रकारचा पांढरा किंवा रंगीत खडू द्यावा. पुढे त्यांना रंगीत पेन्सिली आणि कागदाचे तुकडे द्यावेत.

जेथे खडू, चौरंग, कागद किंवा पेन्सिली सारख्या वस्तू मिळणार नाहीत तेथे आपल्या मुलांना अंगणातील धुळीवर रेघोट्या ओढून चित्र बनवण्याची संधी द्या. गावामध्ये धुळीवर रेघोट्या ओढून वेगवेगळी चित्रे बनवली जातात. उदाहरणार्थ - स्वस्तिक इ.

**चित्र बनविण्याचे साहित्य मुलांच्या ताब्यात द्या. त्यांना जशी चित्रे बनवायची असतील तशी बनवू द्या. त्यांची चूक काढू नका. त्यांनी काढलेली चित्रे एकत्र करून आपसपासचे चित्रकला विद्यालय अथवा एखाद्या संस्थेमध्ये पाठवून त्या चित्राबद्दलचे मत आणि सूचना मिळवा. मिळालेल्या सूचना लक्षात ठेऊन त्याचे काम पुढे चालू ठेवा.**

### ५) मातीची खेळणी

मुलांना मातीची खेळणी बनविण्याची परवानगी द्या. पावसाळयाच्या दिवसात भरपूर चिंखल असतो. इतर ऋतूमध्ये मुलांना शेतामधील, गल्लीमधील

किंवा अंगणातील मातीच्या चिखलाचा उपयोग करु द्या. थोडा खर्च करुन या कामासाठी लाल-पिवळया मातीचा सुद्धा उपयोग केला जाऊ शकतो.

जे लोक खर्च करु शकतात त्यांनी या कामासाठी क्ले किंवा प्लेस्टिसिन नावाची माती मागवावी.

मातीचा संग्रह करण्याकरिता मुलांना एक भांडे द्या. खेळणी बनविण्यासाठी एक पाटी, हाथ धुण्यासाठी पाण्याने भरलेली एक बादली आणि कापडाचा तुकडा त्यांना द्या.

मुलांना प्रथम समजावून सांगा. स्वतःकरून सुद्धा दाखवा. तसेच त्यांनी आपल्या शर्टच्या बाह्या कशा वर चढवाव्यात? कसे बसावे? हात कसे स्वच्छ करावेत? हेही करुन दाखवा.

मुलाला जशी खेळणी बनवायची असतील तशी बनवू द्या. ते वेगवेगळया प्रकारांचे आकार बनवतील. ते आपल्या आवडीच्या वस्तू बनवतील ते चिखलात काही वस्तूंचे छापसुद्धा तयार करतील.

चिखलापासून विटा बनविण्याचे काम मुलांना सर्वात प्रथम सुचवा. सुताराकडून एक लाकडी साचा तयार करुन घेता येईल. ज्या घराभोवती मोठे अंगण असेल तेथे मुले विटा बनविण्याचे काम करु शकतील.

एखादी भट्टी तयार करुन चिखलाच्या बनवलेल्या सर्व वस्तू आपण कधीकधी भाजू शकतो.

मुलांनी बनवलेली चिखलाची साधी खेळणी सुद्धा आपण अगदी काळजीने बालसंग्रहालयात ठेवावीत. मातीचे काम हे कलाकुसरीचे काम असते. या कामामुळे हाताच्या स्नायूंचा विशेष रूपाने विकास होतो. बालकाच्या निरीक्षणाचे विषय कोणकोणते आहेत याची आपणास माहिती असते. आपली कलाकृती आणि आपल्या खेळाच्या माध्यमातून मूल आपली मनोवृत्ती प्रकट करते. याचा आपणाला या कामात अनुभव येईल.

### ६) टाचणी आणि कागद

टाचणीच्या मदतीने मुले वेगवेगळी कामे करतात. सर्वात लहान मुले टाचणी खोचण्याची गादी म्हणजे पिनकुशन मधून टाचण्या काढणे आणि पुन्हा त्या गादीमध्ये खोचण्याच्या कामात विशेष आवड घेतात. थोडी मोठ्या वयाची मुले टाचणीच्या मदतीने कागदाचे तुकडे करुन अनेक प्रकारच्या आकृत्या तयार



करतात. टाचण्या मोजण्याचे सुद्धा काम असते. टाचण्या वेगवेगळया प्रकारे मांडून त्यांचे वेगवेगळे आकार करता येतात या कामासाठी आपण मुलांना एक पेला, एक पिन कुशन आणि थोडा मोठा कागद द्यावा.

### ७) कापडाचे तुकडे

खास करुन लहान मुलांना कापडाचे छोटे छोटे तुकडे दिले गेले तर रुमाला प्रमाणे त्यांच्या घड्या घालण्याचे काम ते खूपवेळ करत बसतात. हाथाने केल्या जाणाऱ्या इतर कृती प्रमाणेच त्यांना या कृतीचासुद्धा फायदा होतो. कापडाचे काही तुकडे एखाद्या पेटीत किंवा टोपलीत ठेऊन मुलांना द्या. हे तुकडे रंगीबेरंगी असतील तर अधिक चांगले. तुकड्यांचा आकार रुमालाएवढा असावा. हे तुकडे अस्वच्छ अजिबात नसावे. अस्वच्छ असतील तर ते धुतले पाहिजेत.

### ८) मंदिराची पेटी किंवा देवघर

मुलांना घराचा खेळ खेळायला आवडतो असे सर्वसाधारण पणे आढळते. या खेळात आजच्या सामाजिक वाईट प्रथा घुसतात-जसे रडणे, डोके बडवणे, प्रापंचिक जीवन इत्यादी म्हणून या खेळामधून त्यांची खेळाची हौस ही भागावी आणि त्यांना काम सुद्धा मिळावे. याहेतूने त्यांना मंदिराची एक पेटी द्या, मंदिराची पेटी याचा अर्थ म्हणजे सुंदर, कलापूर्ण रचनेसाठी आवश्यक ते सर्व साहित्य. जशी तांब्या पितळेची छोटी छोटी भांडी, फोटो, गाद्या, लाकडी वस्तू, हस्तिदंतापासून बनवलेली खेळणी इत्यादी. मुलांनी यासर्व वस्तू सजवून ठेवाव्यात. त्यांना आवडले आणि योग्य वाटले तर मधेच एखादी वस्तू देव म्हणून ठेवावी. तेथे ते उदबत्ती, लावतील, दिवा लावतील, फुलांची सजावट करतील. स्वतः शांत बसतील. इतरांना बोलावून बसवतील, प्रार्थना म्हणतील आणि म्हणायला लावतील. एका दृष्टीने या खेळाला देवघराचा खेळ असेही म्हणता येते. परंतु याचा हेतू धार्मिकता वाढविणे हा नसावा. मुले अशी रचना सहजासहजी करत असतील तर आई वडिलांनी त्यामध्ये बाधा आणू नये. त्यांना कोणत्याही सूचना देऊ नयेत. मुलांना वाटले तर त्यांनी प्रार्थना म्हणावी. मुलांना जे चांगले वाटेल ते आनंदाने करत रहा. पण त्यांनी इथे घराचा खेळ किंवा बाहुला बाहुलीचा खेळ खेळायचा ठरवले तर आईवडिलांनी त्यांना समजवावे. एखादी पेटी किंवा डब्यामध्ये सर्व वस्तू ठेवाव्यात. एक अथवा अधिक मुले मिळून हा खेळ खेळू शकतात.

## ९) बागकाम

झाडे आणि रोपांचा सांभाळ करण्याचे काम मुलांना महत्त्वाचे वाटते. ते आपल्या छोट्या वयात कुंडीतील झाडांना पाणी घालतात. अंगणामध्ये वाफे बनवून दिले तर बी रुजवण्यापासून रोपांची काळजी घेण्यापर्यंत सर्व कामे ती करु शकतात. ते मोठ्या झाडांना पाणी देऊ शकतात.

मुलांना झाडास पाणी देणे आणि माती खोदणे यासाठी ते सहज आणि सरळ वापर करु शकतील अशी साधने आणि हत्यारे द्या. त्यांना घराच्या अंगणात थोडी रिकामी जागा द्या. गहू - ज्वारीचे काही दाणे आणि सहज शक्य असेल तर फुलांच्या रोपांच्या काही बिया द्या. त्यांना त्यांच्या सोईनुसार बाकीची रचना करु द्या. बी कसे पेरावे? बी कसे पेरले? तर ते उगवेल अन्यथा उगवणार नाही याची कल्पना देऊ नका. आपण या भानगडीत न पडलेले बरे. आपल्या दृष्टीने थोडेफार बी बरबाद झाले तरी होऊ द्या. मुलांना जसे जसे अनुभव येतील तसे तसे त्यांचे डोळे उघडतील. त्यांनी पेरलेले एक जरी बी उगवले तरी त्यांच्यासाठी ते उत्सवाचे वातावरण ठरेल.

जेव्हा ते उत्साहाने या कामात लागतील तेव्हा त्यांना खूप मजा वाटेल. छोटे छोटे हात छोट्या छोट्या कामात पूर्ण गंभीर पणे आपली सगळी ताकद लावून काम करत राहतील. त्यांच्या चेहऱ्यावर घामाचे थेंब दिसू लागतील. ते एकाग्र आणि प्रसन्न होतील. आपल्या आवडीनुसार एखाद्या कामात तल्लीन झाल्यावर जसे आपण दिसतो तसेच ते पण दिसतील. आपण मुलांना सुरवातीलाच अवजारांचा वापर कसा करावा हे समजावून सांगावे. अवजारे कोठे ठेवावीत? त्यांची व्यवस्था आणि स्वच्छता कशी ठेवावी? यासाठी काय काय करावे? ते सांगावे.

## १०) प्राण्यांचे पालन पोषण

प्राण्यांचे पालन पोषण हे मुलांच्यासाठी एक मोठे काम आहे. आपण जाणतो की मुले कुत्रा आणि त्यांच्या पिलांबरोबर खेळतात. आपणाला असा अनुभव आहे की या कामात मुलांना मजा वाटते. कुत्र्याची पिले, लहान मुले आणि आपले छोटे भाऊ बहीण या सारख्या आपल्या मित्रांच्यासाठी मुलांना मनात मोठे प्रेम असते. ते त्यांना खाऊ घालतात, त्यांच्याशी खेळतात, त्यांना आपल्या जवळ घेतात, आपल्या जवळ झोपवतात, त्यांच्याबरोबर हसतात, बोलतात आणि त्यांच्या सुखात सुखी तर दुःखात दुःखी होतात. मुलांची आपली ही एक दुनिया



असते. मुले त्यांच्याबरोबर वाढतात. त्यांच्यात राहून आपल्या मनाचा विकास करतात. यासर्वांच्या परिचयाने त्यांना अनेक प्रकारचे अनुभव मिळतात. मुले स्वतः त्यांना खायला प्यायला घालतात. आपल्या विकासासाठी मुलांना अशा सजीवांच्या वातावरणात जरुर मिसळू द्या.

जर आम्ही मुलांना गाय, खोंड आणि कालवडीच्या मित्रत्वाचा लाभ दिला तर ही गोष्ट प्राण्यांच्या परिचयाच्या दृष्टीने सर्वात लाभदायक ठरेल, यांचा अभाव असेल तर आपण कुत्रा किंवा मांजर पाळावे. जर घरात एखादा पक्षी ठेवता आला तर अधिक चांगले. थोडक्यात असे की मुलांच्यासाठी प्राण्यांचा परिचय लाभदायक असतो आणि हे आपल्यासाठी एक मोठे काम आहे. या प्राण्यांची जबाबदारी सांभाळण्यामध्ये आणि त्यांना खाऊ पिऊ घालण्यामध्ये मुलांचा बराचसा वेळ आनंदात जातो.

## ११) नाटक खेळणे

बहुतेक आपल्यातील अनेकांनी बालपणी नाटक केले असेल. आपल्यापैकी काही जणांनी हे काम कायमचे स्वीकारलेले आहे. कोणी नाटक कंपनीचा मॅनेजर, कोणी अभिनेता, कोणी गायक, कोणी लेखक, कोणी विवेचक, कोणी चित्रपट अभिनेता तर कोणी चित्रपट बनवणारा असेल. थोडक्यात मुलांना नाटक करणे चांगले वाटते. नाटक करुन मुले मुख्यतः आपल्या अभिनय करण्याच्या इच्छेची तृप्ती करतात. अभिनय ही एक कला आहे. यामधून माणसाचा कलाप्रिय स्वभाव स्पष्ट होतो. अभिनय ही एक सहज प्रवृत्ती असते आणि मुलाच्या विकासामध्ये या वृत्तीचे स्थान महत्त्वाचे असते.

मुलांचे नाटक म्हणजे त्यांनी जे काही पाहिले ते खेळाच्या स्वरूपात दाखवणे. बरीच छोटी छोटी मुले घराचा खेळ खेळताखेळता एक प्रकारचे नाटकच करतात. परंतु या खेळाबरोबर काही वाईट गोष्टी करण्यात आल्यातर आम्हाला अशा खेळावर बंधन घालावे लागते. मुलांनी जे नाटक स्वतः पाहिले असेल तसेच नाटक ते करु इच्छितात. नंतर ते वाचलेले नाटक करु इच्छितात. आपण त्यांना निर्देश करा. नाटक खेळण्याची त्यांनी वृत्ती जोपासली जाईल. या कामासाठी त्यांना अनुकूलता मिळेल.

आपण आपल्या घरात नाटक करण्यावर बंदी घालतो. कारण काही लोक नाटकाचा खेळ हा एक वाईट खेळ मानतात. नाटकात कोणता वाईटपणा

नाही. जगामध्ये नाटक करणारे वाईट असू शकतात आणि नाटकाची कथासुद्धा वाईट असू शकते. नाटक पाहणारेही नाटकाचा वाईट उपयोग करतात परंतु जसे वर सांगितले आहे, तसे आपल्यात नाटक ही एक कला आहे आणि याच कारणाने ते निर्मळ आहे आणि ते माणसाला योग्य गती देणारे आहे. परंतु जेव्हा नाटक हलक्या किंवा नीच लोकांच्या हाती लागते तेव्हा ते निश्चितच त्याज्य ठरते आणि हाच नियम सर्व चांगल्या वस्तूंनाही लागू पडतो. म्हणून आपण नाटक करण्यावर बंदी घालू नये. उलट आपण स्वतः त्यामध्ये भाग घेऊन मुलांना दाखवावे की निर्दोष आणि प्रभावी किंवा शक्तिशाली नाटक कसे असते? मूल नाटक करू इच्छित असेल तर त्याला ते जरुर करु द्या. आपण त्यांच्या नाटकाची कथा पहा. आपण हे पाहिले पाहिजे की त्यांच्या विनोदामध्ये हुल्लडबाजी आणि गावंढळपणा येणार नाही. त्यांच्यातील अभिनयाने गुंडगिरीचे किंवा हाणामारीचे रुप घेऊ नये हे आपण पाहिले पाहिजे. त्याचप्रमाणे अभिनयापेक्षा देखाव्यांना अधिक महत्त्व येणार नाही हे ही पहावे. म्हणून त्यांना एखादी चांगली कथा सुचवावी. चांगल्या कथेला महत्त्व द्यावे. वाईट कथेचा अभाव निर्माण करावा.

घरामध्ये नाटक करण्याकरिता ओसरी किंवा वऱ्हांड्याचा उपयोग रंगमंच म्हणून केला जाऊ शकतो. दिवसा ऊन आणि रात्री चंद्र प्रकाश उजेडाचे काम करेल. अंधाऱ्यारात्री एक चिमणी किंवा दिवा सुद्धा पेट्रोमॅक्स दिव्याचे किंवा विजेचे काम करेल. घराचा दरवाजा पडद्याचे काम करेल. घरातून बाहेर जावे आणि बाहेरुन घरात यावे किंवा छतावरून बैठकीत यावे किंवा बैठकीतून छतावर जावे. घरात रोजच्या वापराचे जे कपडे असतात. तोच त्या पात्रांचा पोशाख होईल. आईची साडी कधी शालीचे तर कधी दुपट्ट्याचे तर कधी कमरपट्ट्याचे रूप घेईल. वडिलांची छडी कधी सावकाराची छडी, कधी शिपायाची बंदूक, कधी शिक्षकाचा दंडुका, तर कधी तलवार बनेल. आपले कपडे वेगवेगळया प्रकाराने वापरुन नवनवीन वेशभूषा दाखवता येईल.

चुकीच्या पद्धतीने कपडे घालून 'वेडा' दाखवता येईल. फाटके-जुने आणि चिंध्याचे कपडे घालून भिकाऱ्याचा वेश दाखवता येईल. चांगले कपडे वापरुन नखरेबाजपणा दाखवता येईल. याशिवाय स्वयंपाक घरातील भांडी आणि दुसऱ्या काही वस्तू असतात की ज्यांचा उपयोग आपण वेगवेगळी साधने म्हणून करु शकतो. शरीराच्या कातडीचा रंग बदलण्यासाठी थोडीफार राख वापरुन



वेगवेगळया प्रकारची पावडर तयार केली जाऊ शकते.

या पद्धतीने काम करणे शिकल्यावर ही गोष्ट लक्षात येते की नाटकात दृश्य देखावा हे गौण असते. जे कोणते साधन हाती लागेल त्याचा उपयोग देखाव्यासाठी करण्याने बुद्धीच्या कौशल्याचा विकास होतो. यामध्ये हजरजबाबीपणा आहे. खरी गोष्ट म्हणजे अभिनय. जर अभिनय ९९% चांगला असेल तर त्याच्या बळावर वेशभूषा इत्यादी गोष्टी अनुकूल बनवता येतात. याच्याशिवाय नाटकांचे मूल्यमापन आम्हाला आत्मबळावर करता येते. म्हणून बाहेरचा देखावा (सीन-सिनरी) दाखवण्याची गरज नाही. नाटक घरातच करावे त्याच्यासाठी नवीन वस्त्र खरेदी करु नये. कोणती खास व्यवस्था करण्याची गरज नाही. नाटक करायची इच्छा झाली की नाटक सुरू करावे. कोणते नाटक करायचे आहे. हे मुलांनीच ठरवावे. नाटकाची कथा सर्वांच्या लक्षात राहतेच. मुलांनी नाटकाचे संवाद बुद्धीला ताण देवून आठवू नयेत. ज्यावेळी बुद्धीला ताण न देता नाटक केले जाईल त्यावेळी मुलांना खूप मजा वाटेल. सगळी डोकेदुखी दूर होईल. नाटक चालू असताना जी स्थिती असेल ती तशीच राहील. पडद्यामागून संवाद सांगण्याची तसेच तालमीची आवश्यकता राहणार नाही. ज्यावेळी जशी गरज असेल, त्यावेळेला जे काही सुचले असेल, ते बोलून काम भागविण्याची आणि समयसूचकतेची तयारी होईल. नाटकामधील पाठ केलेल्या संवादांच्या चौकटीत अडकल्यामुळे जो अडथळा निर्माण होतो. तो होणार नाही.

याप्रमाणे घरामध्ये मुले नाटक खेळत राहतील. त्यांचे नाटक पाहिले पाहिजे, त्यांचे संवाद ऐकले पाहिजेत याची आवश्यकता नाही. असे वाटू देऊ नका. हे नाटक पाहिले पाहिजे त्याचा संवाद ऐकला पाहिजे. घरामध्ये करण्यासारखे हे एक मजेचे काम आहे.

## १२) फुले आणि पाने एकत्र करणे

मुलांना एखाद्या गोष्टीचा शोध घेणे, गोळा करणे आणि एकत्र करणे चांगले आवडते. याचा अर्थ असा आहे की, मुलांमध्ये संग्रह करणे आणि संचय करणे या चांगल्या वृत्ती असतात. मूल स्वतः आपल्या आसपासच्या जगामधून आणि वस्तूमधून ज्ञान प्राप्त करते. त्या ज्ञानाचे प्रकटीकरण करण्यासाठी मुले संग्रह करतात. असे म्हटले जाते की यामधून मूल आपली परिग्रह वृत्ती किंवा सदुगती स्पष्ट करते.

आपल्या आसपासच्या जगात पाहिलेल्या पैकी त्याला जे चांगले वाटते ते एकत्र करण्यासाठी मुलाला मोकळे सोडले पाहिजे. तो जे काही एकत्र करेल त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. त्यांनी एकत्र केलेल्या वस्तूमध्ये शेळीच्या लेंढ्या किंवा काचेचे तुकडे सुद्धा असू शकतील. आज ज्या वस्तू पाहून आपणाला हसू येते. त्याच वस्तू आपण लहानपणी टक लावून पाहिलेल्या असतात. त्या वस्तूचे स्वरूप जाणून घेण्यासाठी आपण आपल्या सर्व इंद्रियांना कष्ट दिलेले असतात. त्याच्यावर वेळ खर्च करुन त्याबद्दलची माहिती मिळाल्यानंतर आज आपणाला त्या वस्तू बेकार वाटतात. जसे जसे आपण पुढे पुढे जातो तसे तसे निरूपयोगी वस्तूंना आपण मागे सोडतो. हा अनुभव जमेला धरता आपल्यानंतर येणारेही त्यांना निरूपयोगी वाटणाऱ्या वस्तू मागे सोडत जातील. आपण मुलांना त्यांच्या आवडीनुसार पाहिजे ते हुडकणे आणि त्याचा संग्रह करण्याची संधी दिली पाहिजे.

आपण एकत्र केलेल्या वस्तूंना चांगल्याप्रकारे सजवून मूल आपली कला विषयक दृष्टी विकसित करेल. त्याने एकत्र केलेल्या वस्तू सांभाळून ठेवण्याची अनुकूलता आपण अवश्य दाखवावी.

फुले आणि पाने कोणत्या पद्धतीने एकत्र करावीत आणि कशी सांभाळावीत हे आपण मुलांना समजून सांगावे. जर मुलाने फुले आणि पाने तोडून आणली आणि त्यांना आपल्या पुस्तकात दाबून ठेवले तर त्यांना वनस्पतीची ओळख होईल. पुढे हे नमुने चित्र बनविण्यासाठी उपयोगी पडतील. सजावटीच्या कामात सुद्धा यांचा उपयोग केला जाऊ शकेल.

### १३) मातीचा ढीग

घरासमोरच्या अंगणात केलेला मातीचा ढीग हे मुलांच्या वेगवेगळया कामांचे केंद्र असते. मुलांना या ढिगाजवळ पोहोचू द्या. तेथे त्यांना त्याच्या आवडीनुसार विहीर, बाग, रस्ता, किल्ला, टेकडी बनवू द्या. आपण आपल्या डोक्यात माती घालू नये हे त्यांना समजून सांगा. मातीने बरबटलेले हात धुण्यासाठी त्यांना पाण्याची जागा ठरवून द्या. मातीमध्ये खेळण्याने कपडे घाण होतात म्हणून अशावेळी केवळ चड्डीवर खेळायला सांगा. मातीत बसून मुले बरीच कामे करतात. आपण त्यांना प्रत्यक्ष काम करताना पाहिले तर हा अनुभव आपणाला येईल. घराच्या समोर अंगण असेल आणि त्या अंगणात मातीची व्यवस्था करणे शक्य असेल तर ती अवश्य करावी. दोन गाड्या माती भरपूर होईल. परंतु



शहरात अशी व्यवस्था करणे अवघड होईल.

वर ज्या ज्या कामाची चर्चा केली अशी दुसरीपण कामे आहेत. रांगोळी काढणे, टकळी चालवणे, पैसे मोजणे, झाडलोट, भांडी घासणे, कपडे धुणे, वाचणे, लिहिणे इत्यादी घरात ही सर्व कामे केली जाऊ शकतात.

कामांची ही यादी वाचून याप्रमाणे झटपट यांची व्यवस्था करण्याने प्रश्न सुटणार नाही. याबद्दल थोडासा विचार करावा लागेल. आपण मुलांचा खेळ आणि मुलांचे काम या गोष्टी वेगवेगळया मानल्या पाहिजेत. मुले घरात राहून सुद्धा कित्येक प्रकारचे खेळ खेळू शकतात. मूल एकटेही खेळते आणि ते इतरांच्या बरोबरही खेळते. सर्व खेळ आनंदासाठी असतात. खेळाचा मुख्य हेतू आनंद हाच असतो. पण वर जी काही कामे स्पष्ट केली आहेत त्यांचे स्वरूप व त्यांचा हेतू सृजनशीलता हा आहे. मुलांच्याकरिता काम सुद्धा खेळासारखे असते. परंतु काम म्हणजे प्रत्यक्षात खेळ नव्हे. खेळामध्ये काही करावे लागते. खेळात एखादी क्रिया असते. उदाहरणार्थ लपंडावामध्ये पळावे लागते. परंतु लपंडावाचा हेतू पळणे हा नाही. लपंडावाचा हेतू न दिसणे, न सापडणे हा आहे. या प्रकारे खेळामध्ये एखादी क्रिया समाविष्ट असते. झाडाला पाणी देणे ही एक क्रिया आहे. याचा हेतू झाडाला पाणी देण्याची क्रिया होय. येथे पाणी देणे हे एक काम मानले आहे. म्हणजे खेळ आणि काम यामध्ये फरक असतो. 'घरामधील खेळ' या विषयावरील एक वेगळा लेख लिहिला जाऊ शकेल. हा भेद लक्षात घेऊनच घरामध्ये वेगवेगळया कामाची सोय करावी लागते.

समजण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे मुलांच्या करिता प्रत्येक घरात अशा सर्व कामांची व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही. सर्व घरामध्ये सर्व कामे करायला लावणे शक्य नाही. यासाठी साधने, पैसा, सोय इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन जितक्या कामांची व्यवस्था सहज केली जाईल तेवढीच केली जावी. श्रीमंताच्या घरामध्ये सर्व प्रकारच्या कामांची व्यवस्था केली जाऊ शकते. परंतु अशी व्यवस्था केल्यानंतर मुलाला सर्वच कामे करावी लागतील अशा भ्रमात राहू नका. श्रीमंताच्या घरात खाण्यापिण्याचे पदार्थ ढिगाने असतात. म्हणून ते सर्वच पदार्थ मुलाने खाल्लेच पाहिजेत असा अर्थ होत नाही. हीच गोष्ट कामाबद्दलही असते. आता कामे खूप वाढलेली असल्याने त्या कामांचे अपचन मुलांना होवू नये. काम हे मुलांसाठी आहे पण मूल हे कामासाठी नव्हे. मूल कामाशिवाय राहू

शकत नाही. त्याला खूप काही करायचे असते. म्हणून यासर्व कामापैकी अशीच कामे मुलाने करावी की, जी कामे करताना आपणाला मुलाची काळजी वाटणार नाही. थोडक्यात याचा अर्थ असा की, आपण मुलांच्या करिता कामाचे अनुकूल वातावरण तयार करावे पण आपण त्यांच्या कामात अडथळा बनू नये. मुलाला जे काम करायचे आहे ते त्याच्या आवडीने करता आले पाहिजे.

मुलासाठी आपण ज्या ज्या कामांची व्यवस्था केलेली आहे ती कामे मुलांना शांतचित्ताने करता आली पाहिजेत. त्या कामात कोणाचाही हस्तक्षेप होणार नाही. याची काळजी अवश्य घेतली पाहिजे. याकरिता मुलांना वेगळी जागा दिल्यास अधिक चांगले. एकाच वेळी अनेक कामे सुरू केल्यानंतर एकाही कामाची व्यवस्था नीट होत नाही. म्हणून एकावेळी एकाच कामाची चांगली सोय करुन देऊन ते काम पार पाडणे हे अधिक लाभदायक ठरते.

कामाच्या व्यवस्थेच्या संदर्भात वर दिलेल्या सूचना मार्गदर्शक आहेत. जे लोक विज्ञान आणि वनस्पतीबद्दल जाणकार आहेत. त्यांनी वर दिलेल्या मर्यादा लक्षात घेऊन त्या त्या विषयाच्या कामाची सोय करावी. आपला थोडासा अनुभव आणि थोडेसे ज्ञान याच्या आधारावर वरील माहिती दिलेली आहे.

जेव्हा जेव्हा मूल कोणते काम करत असेल तेव्हा तेव्हा त्याच्या कामाचे आपण निरीक्षण केले तर मुलांचा आणि आपलाही फायदा होईल.

घरामध्ये कोणकोणत्या कामांची व्यवस्था केलेली आहे? त्या कामापैकी कोणती कामे मूल स्वीकारते? कोणती कामे स्वीकारत नाही? त्याला कोणती कामे अधिक चांगली वाटतात? त्याला कोणती कामे अजिबात आवडत नाहीत? याच्या अभ्यासाने आपण आपल्या मुलाचा कल कोणीकडे आहे याचा शोध घेवू शकतो.

जे काम मुलाला एकाग्र करु शकत नाही, ज्या कामामुळे मुलाच्या मनाला उबग येतो, जे काम करताना मुलामुलामध्ये भांडणे होतात, जे काम करताना मुलांना आपली मदत वारंवार घ्यावी लागते, अशा कामासाठी ते मूल लायक नसून ते काम याक्षणी मुलासाठी उपयोगी नाही हे लक्षात घ्यावे. असे काम सोडून द्यावे. ज्या कामात मूल गुंतून राहते, आनंदी राहते, एकाग्र राहते, जे काम करताना मूल हसते, गाते व इतरांना समाविष्ट करून घेते तेच काम चांगले मानावे.

नेहमी मूल ज्या कामामुळे थकते ते काम त्याच्यासाठी उपकारक नाही. जे



काम मुलांसाठी खूप आवडीचे आणि एकाग्रता वाढवणारे असते. परंतु त्या कामासाठी जर मुलाला झगडावे लागले, चिडावे लागले, आई वडिलांची मदत घ्यावी लागली तर त्या कामामुळे मूल थकले आहे हे लक्षात घ्यावे. जेव्हा एखाद्या कामामुळे मुलाला सुख आणि आराम मिळणार नाही अशा कामामधून मुलाचे मन न दुखवता त्याला बाजूला केले पाहिजे. त्यांनी या परिस्थितीचा अनुभव घेतला आहे ते म्हणतील की, ''होय, ही गोष्ट अगदी बरोबर आहे. थकलेल्या मुलाला हळूच बाजूला काढून झोपवले तर त्याला लगेच गाढ झोप लागते.''

नेहमी दोन-चार मुले एकत्र येऊन एखादे काम सुरू करतात. अशावेळी काही वेळेला काम अगदी चांगले चाललेले असते. पण त्यातच काही वेळेला अडचणी उभ्या राहतात. काम चांगल्या प्रकारे चालत नाही. त्यामुळे त्यापासून कोणालाच आनंद होत नाही. कधी कधी मुले आपापसात भांडतात. याची कारणे ही वेगवेगळी असू शकतात. या सर्वांची सखोल चर्चा इथे करणे आवश्यक नाही. परंतु ते कारण शोधून त्याच्यावर उपाय करावा. मुलांनी आपापसात मतभेद मिटवणे अधिक चांगले. ज्या ठिकाणी हे होणे शक्य नाही. त्या ठिकाणी मध्यस्थी करुन आपण निर्णय द्यावा. निर्णयसुद्धा असा दिला पाहिजे की, तो बहुतेकांना बरोबर आणि आनंददायक वाटावा.

जेव्हा मूल आजारी असते किंवा आम्ही त्याला धाकदपटशा केलेला असतो. तेव्हा त्याची मनःस्थिती योग्य नसते. अशा परिस्थितीत काम व्यवस्थितपणे होत नसते. कामामुळे त्यांना वैताग येतो आणि ते आपणाला वैताग आणतात म्हणून आपण त्या कामाला बेकार समजू लागतो. त्यामुळे अशा कारणामुळे आपल्या नजरेतून त्या कामाचे शैक्षणिक मूल्य कमी होऊ लागते. अशा वेळी आपण सावध होऊन या कामाची निंदा अथवा त्या कामाला विरोध न करता यामध्ये असणाऱ्या दोषांचा शोध घ्यावा.

✻✻✻

✻ ✻ ✻ ✻

✻ ✻ ✻ ✻

# ६. आई-वडिलांनी काय करावे ? (एक पत्र)

आपल्या मुलाला शिशु विद्यालयमध्ये घालण्याबद्दल आपणाला वाटणाऱ्या उत्साहाचे मी प्रेमाने स्वागत करतो. मला माहीत आहे की, दुसऱ्या शाळांच्या तुलनेत ही शाळा आपणाला अधिक चांगली वाटते. आपल्या मुलाने बराच काळ या शाळेत राहून सर्वांग सुंदर शिक्षण घ्यावे असेही मला वाटते.

तरीही मी आपणाला काही गोष्टींची माहिती देतो आहे. मी आपणाला शाळेतून आपल्या मुलाला कोणते आणि कसे लाभ होतील हे ही सांगेन. थोडक्यात आपले मुलाबद्दल, आपल्याबद्दल आणि शाळेबद्दल कोणते कर्तव्य आहे याची कल्पना देतो आहे. आमच्यावर आणि आमच्या कार्य पद्धतीवर पूर्ण विश्वास ठेवून आपण आपल्या मुलाला शाळेत घालत असता. पण आपल्या मुलांना शाळेत घालणारे आई-वडील नेहमी म्हणतात, 'आम्ही मुलाला इथेच ठेवू इच्छितो. आम्हाला मुलगा इथे शिकेल किंवा नाही याची काळजी नाही. आपल्यासारख्या शिक्षकांच्या चांगल्या संगतीमध्ये आणि अशा सुंदर सोयी असणाऱ्या वातावरणात ठेवल्यानंतर आम्हाला अजून कोणत्याही गोष्टीचा विचार करावयाचा नाही. आम्ही आमचा मुलगा आपल्या हाती सोपवला आहे हे आमच्यासाठी भरपूर आहे. मुलाचे खरे आई वडील आपणच आहात.' परंतु काही दिवसानंतर मुलाला इथे पाठविण्याची अजून इतरही कारणे आहेत हे आमच्या लक्षात येते. काही आई-वडील आपल्या मुलांच्या उपद्रवाला वैतागून त्यांना आपल्यापासून दूर ठेवण्याच्या इराद्यानेही शाळेत पाठवतात. हे समजते. काही आई-वडील आपल्या मुलांना काही दिवस टांगा किंवा घोडागाडीचा आनंद लुटता यावा म्हणून इथे भरती करतात. काही आईवडील आपल्या उद्धट आणि उपद्रवी मुलाला सरळ आणि चांगला बनवून योग्य मार्गावर आणण्यासाठी इथे पाठवतात. जो मुलगा जुन्या पद्धतीच्या शाळेत जायला घाबरतो, जो इकडे तिकडे भटकत राहतो, जो भांडून तंडून आई-वडील आणि शिक्षकांना हैराण आणि त्रस्त करतो. त्यांनाही इथे पाठविले जाते. काही आई-वडील मुलाला शाळेत घालताना असे म्हणतात की, 'आता काही वेळासाठी हा इथे नुसता राहिला तरी चालेल. त्याला शिकविण्याची



गडबड कशासाठी? अजून हा अगदी लहान आहे. ज्यावेळी हा शिकण्याला लायक होईल तेव्हा त्याला दुसऱ्या शाळेत घालता येईल. काही आईवडील असा विचार करून मुलाला पाठवतात की, या शाळेत अशी काही जादू आहे की, कष्टाशिवाय, अगदी लहान वयातच सगळे काही शिकवले जाईल. ज्यानंतर मुलाला लगेचच पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेत घालता येईल. काही आईवडील असे म्हणतात की, 'या शाळेत मुलींना प्रवेश घेणे आहे. कारण इथे त्यांना संगीत, चित्रकला इत्यादी विषय शिकवले जातात आणि गणित मात्र नाही. कारण गणित मुलांनी शिकायचे असते. या सर्वांशिवाय असे ही आईवडील आहेत की, जे आपल्या मुलांना खऱ्या विश्वासाने समजूतदारपणे आणि दुसऱ्या शाळेतील वाईट गोष्टींनी वैतागून इथे पाठवतात.' मी निःसंशयपणे असे म्हणेन की, 'अशाही मुलांना शिशु शाळेचा पूर्णपणे फायदा मिळाला आहे.'

या गोष्टीचा विचार आपणालाच करावयाचा आहे. की, आपण आपल्या मुलांना कोणत्या कारणासाठी शिशु शाळेत पाठवतो. जर आपण आपला हेतू लपवत असाल तर नंतर आपल्याला पश्चात्ताप होईल आणि आपल्या मुलाचा वेळ आणि आपले कष्ट बेकार जातील. जे आईवडील घरातील कटकट दूर करण्यासाठी मुलांना शिशु शाळेत पाठवतात, त्यांच्यासाठी मनामध्ये तिरस्कार निर्माण होतो. जर अशा आई वडिलांच्या मुलांना आम्ही आमच्या इथे आश्रय दिला नाही तर खरोखरच आम्ही मूर्ख आणि पापी समजले जाऊ. अशा आईवडिलांना आम्ही हे सांगू इच्छितो की भावी काळात त्यांनी संतती निपजण्याच्या संदर्भात संयम राखला पाहिजे. जे लोक आपल्या बिघडलेल्या किंवा उंडग्या मुलांना सुधारण्यासाठी आमच्याकडे पाठवतात त्यांच्याबद्दल आम्हाला दया येते. जे मूल आपल्या घरात बिघडते आणि उंडगे बनते. त्याला सुधारण्याकरिता आपण आमच्याकडे पाठवता याच्यासारखी विचित्र आणि हास्यास्पद दुसरी गोष्ट नाही. अशा आईवडिलांनी निश्चितपणे हे लक्षात घ्यावे की जो पर्यंत ते स्वतः या गोष्टी बद्दल आमच्यासारखी काळजी करणार नाहीत तोपर्यंत आमच्या प्रयत्नांना यश येणार नाही. शिशु शाळाही बिघडलेल्या मुलांना अचानकपणे सुधरविणारी एक जादू आहे. असे मानण्याची चूक कोणत्याही आई वडिलांनी करु नये. यामध्ये अजिबात शंका नाही. कारण मूल हे चांगल्यात चांगले व्हावे असा प्रयत्न आम्ही करत आहोत. जे आई वडील बिघडलेल्या मुलांना आमच्या इथे पाठवतात त्यांना आमची एक

अट मान्य करावी लागेल. जर आम्ही त्यांच्या अशा मुलाला त्यांच्याकडे परत पाठवले तर त्यांनी आमची किंवा आमच्या पद्धतीची निंदा करण्याऐवजी आम्ही त्या मुलांना तीन वर्षे सांभाळून त्याला दिलेल्या शिक्षणाबद्दल आमचे उपकार मानावेत. तरीही जोपर्यंत दुसऱ्या मुलांचे नुकसान होणार नाही तो पर्यंत बिघडलेल्या मुलांना सुधारण्याचा प्रयत्न आम्ही करत राहू. न सुधारणाऱ्या मुलांना आम्ही तुमच्यापर्यंत परत पाठवलेतर असे समजावे की या मुलासाठी दुसऱ्या शाळेची गरज आहे. निःसंशयपणे बिघडलेल्या मुलांना निरोप देण्याने आमच्या शाळेचे प्रश्न सोपे होतात. पण त्या मुलाचा प्रश्न सुटत नाही. याबद्दल आमच्या मनाला खूप वाईट वाटते. आम्ही हे सुचवू शकतो की त्याला लायक असणारी शाळा कोणती? परंतु आम्ही त्याची कोणतीही व्यावहारिक सोय करु शकत नाही. याहीपेक्षा जे आईवडील विनयशीलतेने आमच्यावर पूर्ण विश्वास ठेऊन आणि एखाद्याच्या बाबतीत निश्चिंत राहून आपल्या बिघडलेल्या मुलांना इथेच ठेवण्याचा आग्रह करून ठेवतील तर आम्हाला असा विश्वास आहे की, त्यांची मुले निश्चितपणे चांगली बनतील.

जे आईवडील आपला मुलगा शिकण्याला लायक होईपर्यंत त्याला आराम करणे किंवा हवा खाण्यासाठी म्हणून आमच्याकडे पाठवतात त्यांच्यासारखा असमजूतदार दुसरा कोणी नाही. शिक्षण काय चीज आहे. हे जे जाणत नाहीत, जे आई वडील आपल्या मुलाला दुसऱ्या शाळेत जाण्यायोग्य बनविण्यासाठी इथे पाठवतात, त्यांना माझी विनंती आहे की, आपल्या मुलाला इथे त्यांनी मुळीच पाठवू नये. जे आईवडील आपल्या मुलाला इथे पाठवतात त्यांनी दुसऱ्या शाळेची गोष्ट करणे हे पाप मानले जावे. जे आजच्या प्राणघातक शिक्षणापासून आपल्या मुलाला वाचवतात त्यानीच मुलाला आमच्या इथे पाठवावे. मुलाला इथे पाठवून थोड्या वेळासाठी इथे असलेल्या स्वराज्य आणि येथील स्वातंत्र्याचे सुख देऊ इच्छितात. नंतर त्याला पुन्हा तुरुंगातच पाठवायचे असेल तर त्यांनी इथली सोय अनुभवू नये. त्यांनी या दिशेला पाहूसुद्धा नये. आपल्या लहान मुलाला थोडा मोठा करण्याच्या विचाराने आणि जेव्हा तो स्वतः सांगणार नाही; त्याला दुसऱ्या शाळेत खेळण्यासाठी पाठवण्याच्या विचारात छळ आणि पाप असते. जो मुलगा छळ आणि पापाच्या सावलीत राहून इथे शिकायला येतो तो विद्या प्राप्त करु शकणार नाही. तो येथून अशिक्षितपणा घेवूनच बाहेर पडेल. जो निश्चित रुपाने दुसरी शाळा



खराब आहे असेच मानेल. यासाठी त्यांच्या मुलांना यामध्ये भरती करणे चुकीचे आहे. त्यांनीही आपल्या मुलांना आमच्या शिशु शाळेत पाठवावे ज्यांची बुद्धी स्थिर नाही, ज्यांची मनोवृत्ती डळमळीत आहे त्यांच्यासाठी सद्याच्या शाळा लखलाभ आहेत. आम्ही खूप घातक जखमा सहन केल्याने आम्हाला अशी कटू गोष्ट लिहावी लागली.

मुलाचे शिशु शाळेत येणे होताच आम्ही लगेचच त्यांची देखरेख सुरू करतो. सर्वप्रथम मुलाच्या घाणेरड्या, बेढब आणि समाजाला अयोग्य अशा सवई सुधारण्याचे काम हाती घेतो. काही वेळातच मूल स्वतः हे समजू लागते की ते किती घाणेरडे राहात होते आणि त्याच्या कपड्यांची अवस्था काय होती? हळूहळू ते चांगल्या प्रकारे चालणे, उठणे, बसणे, हळू आवाजात बोलणे, अंथरुण टाकणे. झाडून काढणे, जेवायला वाढणे, वस्तू चांगल्या पद्धतीने ठेवणे. आपल्या कपड्यांची बटने लावणे व काढणे, बुटाची लेस बांधणे आणि सोडणे. तसेच पाणी पिणे अशी कामे करु लागते. शिशु शाळेत नवीन आलेल्या मुलाला आणि काही दिवसापूर्वी आलेल्या मुलाला पाहिले तर दोघामध्ये असणारा फरक लगेच लक्षात येतो. शिशु शाळेत आलेला नवीन मुलगा काही काळ गेल्यावर शिशुशाळेतील वातावरणात राहून दुसऱ्या मुलांच्या बरोबर मिसळणे, एकत्र राहून बरोबर काम करणे आणि आपल्यामुळे इतरांना त्रास न होणे अशा गोष्टी शिकतो. काही दिवसातच त्याचा मिजासी स्वभाव बदलतो. तो मिळून मिसळून राहतो. भांडण तंटा विसरुन प्रेम करु लागतो. आरडा ओरडा करणे आणि दंगा करण्याच्या ऐवजी तो खूप शांत आणि स्थिर बनतो. जो आपल्या स्वतःला जाणत नव्हता तोच आता स्वतःला ओळखू लागतो. दुसऱ्यांच्या भरवशावर राहत होता, रडत होता, तो आता आपले काम स्वतः करण्यात आनंदी राहतो आहे. जो एक कोपरा पकडून एकटा बसत होता तो आता अनेकांचा मित्र बनतो आहे. एवढेच नाहीतर तो हळूहळू घर आणि शिशु शाळेतील फरक समजू लागतो आहे. शिशु शाळेच्या सामाजिक वातावरणाचा एवढा प्रभाव त्याच्यावर पडतो.

मूल शिशु शाळेच्या मुक्त वातावरणात आणि तेथील विशाल मैदानावर राहून आपले शरीर भरपूर मजबूत करते. जो मुलगा सुरवातीला चपळतेने हिंडू फिरु शकत नव्हता तो काही दिवसातच संपूर्ण मैदानावर वेगाने पळतो आहे. उन्हात किंवा वादळात बराच वेळ रममाण होऊन फिरतो आहे. निर्भय होऊन दूर

दूर पर्यंत आपल्या लाकडी घोड्याला पळवतो आहे. आणि शेजारच्या गॅलरीच्या कठड्यावर चढून आपला तोल सांभाळत त्याच्यावर चालणे शिकतो आहे. इथे तो आपला प्रत्येक श्वास स्वस्थपणे घेतो आहे. इथे सारा वेळ तो शहरातील गोंधळ, घाण, धावपळ आणि दगदगी पासून दूर राहतो. तो शहरातील लहान लहान घरे आणि गलिच्छ वातावरणापासून वाचतो. शहरातील घाण आणि स्वार्थी वातावरणापासून वाचून तो एक स्वच्छ, परस्पर सहकार्य करणाऱ्या आणि आनंदी वातावरणात राहतो. त्याच्यासाठी हे सर्व एक नवे शिक्षणच आहे. त्याचा हा सगळा वेळ कधीच वाया जात नाही. या काळातच मुलाच्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक विकासाचे बी रुजवले जाते.

या विकासाच्या बरोबरच आपल्या पद्धतीनुसार आम्ही मुलांना इंद्रियांचे शिक्षण देतो. इंद्रिय शिक्षणाची सोय हा मॉन्टेसरी शिक्षणाचा आत्मा आहे. हेच मॉन्टेसरी पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. इंद्रियांचे शिक्षण हे मन आणि आत्म्याच्या शिक्षणाचा पाया आहे. आजपर्यंत अशा प्रकारच्या शिक्षणाची आपण कधी काळजी केलेली नाही याच कारणाने आपण आयुष्यभर अपंगासारखे राहिलो. यानंतर याची कमतरता कधीही भरुन काढली जाऊ शकत नाही. सुरवातीला इंद्रिय शिक्षण न होण्याने पुढील सर्व शिक्षण बेकार बनते. शिशु शाळेत प्रवेश घेणारा नवीन मुलगा मोठ्या आणि छोट्या पदार्थातील फरक ओळखू शकत नाही त्यावेळी त्याला लांबी आणि रूंदी किंवा लहान आणि मोठा असा कोणता विचार नसतो. वस्तूच्या स्पर्शाने इंद्रियांना मऊ अथवा खरबरीत यातील फरक लक्षात येत नाही. रंगांची ओळख तर त्याला नसतेच. आकाशाबद्दल त्याला माहिती खूप कमी असते. त्याच्या कानाला गोंधळ आणि सुंदर-गोड स्वर दोन्हीही जवळ जवळ सारखा असतो. त्याच्या सर्व बाजूंना रुपरंगाने भरलेली सगळी दुनिया असते पण तिच्यात त्याला काही दिसत नाही. या सगळयामध्ये त्याला कोणता रस नसतो. परंतु जेव्हा त्याच्या इंद्रियांचा विकास होतो तेव्हा तो आपल्या डोळयांनी सृष्टीची सुंदरता, कानांनी संगीताची मधुरता आणि स्पर्शाने वस्तूंची कोमलता अनुभवायला लागतो. तो आपल्या आनंदात बुडून जातो. मुलाच्या जीवनाची जी दिशा आतापर्यंत बंद पडली होती ती उघडली जाते आणि त्याचे जीवनसुख आकाशापासून पाताळापर्यंत विशाल बनते. इथे मूल खेळता खेळताच आपल्या इंद्रियांचा विकास अशा प्रकारे करुन घेते की त्याचा त्यालाच पत्ता लागत नाही. हे त्याचे दुसरे आणि खरे



अध्ययन आहे.

हे दुसरे अध्ययन पूर्ण झाल्यावरच आम्ही आमच्या आपल्या शाळेत मुलाला आपले शिक्षण देणे सुरु करतो. कारण हे की सुरुवातीचा दोन प्रकारचा अभ्यास हा आपण मूलभूत अभ्यास मानतो. यासाठी जेव्हा मूल आमच्या शाळेत प्रवेश करते तेव्हा आम्ही त्याला उजळणी शिकवत नाही आणि बाराखडीही शिकवत नाही. परंतु जे आईवडील आपल्या मुलाला मोठ्या वयाचे मूल बनविण्यासाठी आमच्या इथे पाठवतात, ते जेव्हा आमच्या शाळेत अभ्यासाची खरी वेळ आलेली असेल तेव्हा आपल्या मुलाला आमच्या शिशु शाळेतून काढून घेऊन जातात. त्यांचे हे वागणे आम्हाला खूप दुःखी बनवते. अभ्यासाच्या पहिल्या तयारीनंतरच आम्ही मुलांना अंकांचे आणि अक्षरांचे ज्ञान देतो. खूप काळजी पूर्वक आम्ही खत, पाणी, बी आणि हवा यांची योग्य व्यवस्था करुन अशी परिस्थिती निर्माण करतो की बी मधून अंकुर फुटू लागतो आणि अगदी याचवेळी त्या अंकुराला त्याच्या मुळापासून उखडून घेऊन जातात. एवढेच नाहीतर ते आमच्या माथी असा दोष मारतात की त्यांचा मुलगा इथे एवढा वेळ राहिला पण उजळणी सुद्धा शिकला नाही. त्याचा वेळ वायाच गेला. आता आम्हाला त्याच्या अभ्यासाची व्यवस्था करावी लागेल ना?

अशा स्थितीमध्ये आमच्या दुःखाला कोणतीच सीमा राहात नाही. सुरवातीला आई-वडील म्हणतात, 'आम्हाला शिकवायची घाई नाही' परंतु काही वेळेनंतर जेव्हा मुलाला उजळणी सुद्धा येत नाही तेव्हा म्हणतात की, 'चला घरी चला.' अशा प्रकारे मुलाला परत घरी नेतेवेळी आईवडील आमच्याशी फार बोलले की, शिशु शाळेत मुलगा काय शिकला? काय समजला? याची माहिती आमच्या कडून घेत असतील तर आमच्या मनात अशा आई-वडिलांना स्थायी आणि कृतघ्न म्हणण्याचे विचार येणार नाहीत. मुलाला प्रवेश घ्यायच्यावेळी जे आईवडील आमची स्तुती करतात, ते मुलाला काढून घ्यायच्या वेळी आम्हाला तोंडसुद्धा दाखवत नाहीत. अशा आईवडिलांना काय म्हणून बोलावे?

इथे सर्व काही झटपट आणि अगदी जादूच्या पद्धतीने शिकवले जाते. असे मानून जे आई वडील आपल्या मुलाला शिशु शाळेत पावठतात त्यांच्यासाठी काही स्पष्ट लिहणे आवश्यक आहे. कोणताच अभ्यास हा जादूसारखा शिकवला जात नाही. शिशु शाळेत अशा काही गोष्टी आहेत की ज्यांचा प्रभाव मुलावर

जादूसारखा पडतो. आमच्या शिशु शाळेतील मुलांची काळजी नेहमी शाळेतच घेतली जाते. जेव्हा आम्ही त्यांना शिशु शाळेतून सोडतो तेव्हा त्यांना घरी जाणे चांगले वाटत नाही. आम्ही शिशु शाळेस सुटी देतो तेव्हा मुले आमच्यावर नाराज होतात आणि जर आम्ही त्यांना शिशु शाळेतून काढून टाकत असू तर याला ते कठोरातील कठोर शिक्षा समजतात. या जादूचे कारण हे आहे की आम्ही त्यांना स्वतंत्रपणे राहू देतो, आम्ही त्यांना भीती आणि शिक्षेपासून मुक्त ठेवतो, त्यांना जे काही शिकायचे आहे किंवा जे कोणते निर्दोष काम करायचे आहे ते आम्ही त्यांना करु देतो. आम्ही त्यांना कोणत्या जादूने शिकवत नाही आणि शिकू देऊ शकत नाही. येथील स्वतंत्र आणि पोषक वातावरणात मूल आपल्या क्षमतेनुसार कमी अधिक शिकते. आम्ही मानतो की प्रत्येक मूल आपल्या क्षमतेनुसार ओझे उचलते. तर या पासून त्याचा फायदाच होतो. यामुळे कधी काही काही मुले लवकर लवकर शिकून आम्हाला आश्चर्य चकित आणि आनंदी सुद्धा बनवतात. या उलट जेव्हा एखादे मूल खूप संथ गतीने प्रगती करत खूप मागे राहते, तेव्हा ते आमची काळजी वाढवते. परंतु जर मुलाला बराच वेळ राहू दिले तर प्रत्येक मुलगा निश्चितपणे शिकतो. तसे मूल शिकत तर असतेच. कोणी संथ गतीने शिकतो तर कोणी जलद गतीने शिकतो. एखादे मूल एखाद्या विषयात पुढे जाते तर एखाद्या विषयात मागे सुद्धा राहते. सर्व मुले एकाच वातावरणात राहतात तरीही त्यांच्या नैसर्गिक शक्तीमध्ये फरक राहतोच. आम्हाला त्यांच्या घरातील संस्कार आणि संपन्न वातावरणाची माहिती मिळते. त्याच्या घरातील रीतीरिवाज इथे शिशु शाळेत लपून राहात नाहीत. शाळेत प्रत्येक मुलाला एकाच दंडुक्यावर वागवता येत नाही. आम्हाला असा कोणी आग्रह धरत नाही की बागेतील झाडाप्रमाणे सर्व बाजूंनी एक सारखे कापून सर्वांना एकाच आकाराचे बनवा. सर्वांना एकाच साचात घालून एकसारखे बनवणे हे आम्हालाही मान्य नाही. आम्ही हे मानतो की जी वस्तू बीज रुपात त्याच्यात दडलेली आहे ती चांगल्याप्रकारे फुलावी-फळावी याची खबरदारी आम्हालाच घ्यावी लागेल. आपल्या बाजूने त्यांना खतपाणी द्यायचे आहे, दिशा दाखवायची आहे. याप्रकारे मुलाच्या आतून जे काही प्रकट होते त्याला पाहून आम्हाला आनंद वाटतो. परंतु आई वडिलांची वृत्ती अशी नसते. हुशार मुलांच्या आईवडिलांचे लक्ष फायद्यावर असते. ते विचार करतात की त्यांचा मुलगा जास्त शिकला आहे, लवकर शिकला आहे, वेळ वाचला आहे,



कष्ट सुद्धा वाचले आहेत. म्हणून त्याला पुढे लवकर शिकवून हुशार बनवण्याच्या विचाराने आणि या हुशारीच्या जोरावर त्याला बक्षीस पात्र बनविण्याच्या लोभाने ते मुलाला दुसऱ्या शाळेत घालतात आणि या प्रकारे आमच्या सर्व उज्वल आशेवर पाणी फेरतात. हुशार मुलांच्या आई वडिलांकडून आम्हाला असा उपदेश केला जातो की, आमच्या शिशु शाळेने त्यांच्या मुलाला चांगला बनवून कोणतातरी अपराध केला आहे. जे मूल मागे पडते त्यांच्या आई वडिलांना त्या मुलाला काढून घेण्याचे हे कारणच असते पण ते आपले मूल या शिशु शाळेत शिकत होते आणि ते केवळ शिकण्याच्या कमी गतीने मागे पडले. याचा विचार ते करत नाहीत. आम्ही हे सिद्ध करु शकतो की या कारणाने ज्या मुलांना काढून घेण्यात आले ती मुले दुसऱ्या शाळेत जाऊन सुधारणा करु शकली नाहीत. त्यांचे स्वातंत्र्य त्यांच्याकडून हिरावून घेतले गेले पण त्याच्या मोबदल्यात दुसऱ्या शाळेने त्यांना पुढे येण्याची शक्ती दिली नाही. नेहमी जेव्हा धान्य परिपक्व होण्यास सुरू होते तेव्हाच मूल अभ्यासात मागे पडले आहे याचे कारण दाखवून त्याला शाळेतून काढून टाकले जाते, त्यावेळी आम्हाला अतिशय दुःख होते तसेच या विचाराने मन पीडेने भरुन येते. दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतल्यावर सुरवाती सुरवातीला तेथील वातावरणात आणि व्यवहारात मुलाला खूप बरे वाटते. याच बरोबर आम्हाला या गोष्टीचा आनंद वाटतो की जेवढा काळ मूल आमच्या सहवासात राहिले तेवढ्या काळात त्याचा विकास होत गेला आणि ते सुखी राहिले.

जे मूल एकाच विषयात पुढे जाते आणि दुसऱ्या विषयात पुढे जाण्याला नकार देते. अशा मुलाच्या आई-वडिलांना समाधानी करणे आम्हाला खूप कठीण जाते. परंतु आईवडील आमच्या बरोबर असतील तर त्यांनाही हा अनुभव येईल की ज्या कामामध्ये मूल स्वर्ग सुखाचा आनंद घेते, जे काम करताना ते दिवसभर थकत नाही, ज्यासाठी नकार दिल्यावर त्याचे डोळे पाण्याने डबडबतात, ते काम त्याच्याकडून काढून घेऊ नये. जरी ते मूल अजून काही न का शिकेना. आम्ही असे मानतो की, जे मूल एकाच विषयात खूप काही शिकले जर ते नंतर का होईना पण दुसऱ्या विषयाबद्दल जरुर शिकेल. कारण हे आहे की एकदा एक विषय शिकण्याची क्षमता त्याच्यामध्ये आली की नंतर दुसरा विषय शिकणे त्याला अवघड जात नाही.

आमच्या शिशु शाळेत आलेल्या काही मुलांचे उदाहरण देऊन मी माझे

म्हणणे समजाऊन सांगतो. एका मुलीला भूमितीच्या आकृत्या काढण्याची खूप आवड होती. शिशु शाळेत येताच ती कोणाच्याही संगतीत राहात नसे, वाचत नसे, लिहीत नसे, खेळत नसे, हिंडत फिरत नसे; ती आपल्याबरोबर भूमितीच्या आकृत्या घेऊन त्यांच्या मदतीने चित्र बनवायला बसत असे. भरपूर चित्रे बनवत असे. नवीन नवीन आणि सुंदर सुंदर भूमितीच्या आकृतींची रचना करत राहण्यातच तिचे मन रमत असे. ती वाचणे लिहिणे जाणत होती. पण ती वाचू लिहू लागली की तिचे चित्र बनवण्याचे काम थांबत असे. मुलीच्या आई वडिलांना वाटले की आपली मुलगी एकही पुस्तक वाचत नाही. अभ्यासामध्ये हिची आवड नाही. ज्यावेळी तिच्या आईवडीलांनी त्या मुलीला शाळेतून काढले त्याच दिवशी त्यांच्या हातून त्या मुलीच्या सुंदर कलाकृतीची हत्या घाली. तिला चार पुस्तके शिकवून, लिहायला वाचायला शिकवून आणि बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादी प्रकारचे थोडे गणित शिकवून तिचे आई वडील तिला कोणते सामर्थ्य देणार होते? तिचे मन तर भूमितीच्या आकृतींच्या चित्रात रमलेले असायचे. या कामामध्ये ती आपल्या आसपासच्या साऱ्या जगाला विसरत होती. आज जेव्हा केव्हा ती रस्त्यात भेटते तेव्हा लाजेने मान खाली घालते. एकदा ती शिशु शाळेत आली आणि तेथील जुने सुख आठवून रडू लागली.

एका मुलाची गोष्ट. या मुलाच्या वडिलांची श्रद्धा चांगली असावी. ते नेहमी म्हणायचे, 'बारा वर्षांचा झाला तरीही मी याला येथून काढणार नाही. भले हा शिको अथवा न शिको.' आमच्या शाळेत तर स्वातंत्र्य होते. मुलाचा स्वभाव थोडा विचित्र होता. मुलगा चांगला, बालभावनेने भरलेला, अगदी स्वच्छ मनाचा आणि पारदर्शी हृदयाचा होता. बाहेर हिंडणे फिरणे आणि खेळणे त्याला चांगले वाटत असे. त्याचे मित्राशिवाय काम चालत नव्हते. बाहेर एखादी झोपडी बनवणे, बाग बनवणे, नटण्या सजण्याच्या वस्तू एकत्र करणे, रामायणातील गोष्टी ऐकणे आणि मस्त होऊन फिरत राहणे. हीच त्याची आवडीची कामे होती. प्रयोग म्हणून आम्ही त्याला शाळेत ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु तो बाहेर जाण्यासाठी कारणे शोधत राहिला. आमच्या दबावामुळे लघवीचे कारण खोटे सांगत राहिला. आम्ही त्याच्या बरोबर बाहेर गेलो तर तो लघवी कुठली करतो? मग तो पाणी मागे. त्याला पाणी दिले जाई त्यानंतर तो शौचाला जायचे म्हणे. आम्ही त्याच्या बरोबर जात असू व परत येत असू. नंतर आम्ही त्याला कोठेही जाण्याची परवानगी हसून



देतो. या व्यतिरिक्त कधीकधी तो बाहेरुन हिंडत-फिरत आत येई आणि तेथे बसून खूप काही कामे करत असे. चित्र बनवत असे. अक्षरे लिही. तसेच गोष्ट किंवा लोकगीताचे नाव ऐकताच तो तेथे ताबडतोब हजर होत असे. हा मुलगा आपल्या स्वभावाच्या सौंदर्याचा विकास करत होता आणि त्याच्या या कामात आम्ही त्याला मदत करत होतो. परंतु शेवटी या मुलाच्या वडिलांचे धैर्य खचले आणि त्यांनी त्याला शाळेतून काढले. आम्ही एका आनंदी, प्रेमळ आणि मित्रासारख्या मुलाला हरवून बसलो. आम्ही याची तक्रार कोणाकडे करावी? आजचा अभ्यासाचा मोह काही कमी आहे का? परंतु या घटनेने आमच्या मनात आग लावली. ही आग तेव्हाच खरी शांत होईल की ज्या दिवशी आम्ही अभ्यासाचा हा मोह जाळून टाकू.

अजून एका मुलीची घटना सांगतो. मुलगी खूप हुशार होती. काही दिवसातच ती चांगल्या प्रकारे लिहायला आणि वाचायला शिकली. एका वर्षाच्या आत ती बुद्धाच्या जातक कथा वाचू लागली. चांगली चित्रे काढत होती. नाचायला शिकली होती आणि रासक्रीडेमध्ये भाग घेत होती. मुलगी सर्व दृष्टींनी हुशार होती. परंतु इथे शिशु शाळेत तिची कदर कोण करणार? शिशु शाळेत तिला पहिला नंबर देण्याची व्यवस्था कशी केली जाणार? मुलीच्या आईवडिलांनी विचार केला की, इथे त्यांच्या मुलीच्या हुशारीचा उपयोग होत नाही. त्यांनी तिला शाळेतून काढून एका दुसऱ्या शाळेत घातले. आम्ही मुलीला विचारले, 'ताई, तू का निघून गेलीस?' तिने सांगितले, 'दुसऱ्या शाळेत घाघरा आणि पोलके मिळते. मी तेथेच शिकणार, जिथे माझ्या आईला बरे वाटते.' बक्षिसाच्या लोभाने आपल्या मुलांना शाळेतून काढणारे आई वडील मुलांना बक्षिसाचे विष कसे पाजतात याचा प्रत्यक्ष अनुभव आम्ही घेतला. ज्या बक्षिसांसाठी ती शाळा चांगली वाटते, उद्या तेच बक्षीस काय करणार नाही?

बक्षीस देणाऱ्या शाळांना त्या आगीने का जाळू नये?

आता एकाच मुलीची गोष्ट अजून ऐका. मुलगी कितीतरी सुंदर होती. तिचा जीव जणू काही तिच्या डोळयात उतरला होता. तिची स्वप्ने आणि विचार लहरी डोळयात तरळत होत्या. काही वेळेसाठी तिच्या बरोबर काव्याबद्दल जर बोललात तर आपण असे म्हणू शकू की तिचे काव्य चित्रात्मक आणि पऱ्यांच्या देशातील होते. ती दिवसभर चित्रच काढत बसत असे. फक्त चित्र, चित्र आणि चित्र. प्रत्येक चित्राबरोबर एक नवीन कल्पना, रंगाची नवीन रचना आणि रंगाची

वेगळी छटा. तिच्या प्रत्येक चित्रात स्वच्छता, कोमलता आणि सुरम्यतेच्या छटांचा वर्षाव होत होता. कधी कधी ती वाचन करणे पसंत करत होती. लिहीत सुद्धा होती. पण स,ख,प,ल,ब, यांच्या पुढे जात नव्हती. अभ्यासाचे नाव ऐकून उसळून उठत होती. परंतु जेव्हा ती सूत कातायला बसत असे तेव्हा ती आपल्या चित्राप्रमाणे, आपल्या शरीराच्या रचनेप्रमाणे, आणि आपल्या हास्याप्रमाणे सुंदर, मऊ आणि पांढरे सूत कातत होती. परंतु तिचे आई वडील म्हणाले, 'चित्र काढून काढून ही काय करेल? ती दुसरे कोणतेही काम शिकतच नाही.' त्यांनी तिला शाळेतून काढले. यावेळी आमची वकिलीसुद्धा चालू शकली नाही. बिचारी मुलगी आम्हाला म्हणते, 'लग्नापूवी मला घरातील कामकाज सुद्धा शिकले पाहिजे नं?' हे सांगून तिची आई तिला शाळेत येऊ देत नसे. 'आता मला काम शिकवले पाहिजे.' असे तिची आई म्हणत असे. ही किती दयनीय आणि भयंकर स्थिती आहे. आम्हाला असे वाटले की, आमचा एखादा प्रिय मुलगा हरवला आहे. आम्हाला आमच्या मनाला जागेवर ठेवावेच लागते. पण आता एक धगधगणारी आग जळते आहे. एकदा जेव्हा ही आग सगळीकडे पसरेल तेव्हा ती शिक्षणाचे जुने मापदंड, लग्नाच्या रूढी आणि आईवडिलांसह जाळून खाक करेल. आपल्या देशाच्या भावी चित्रकाराला हरवताना आमच्या मनाची स्थिती कशी झाली असेल? याचा कोणाला अंदाज आहे का की,या कारणाने देशाचे किती जबरदस्त नुकसान होते आहे? तरीही आमच्या हृदयातून हे उद्‌गार निघतात की, आई वडिलांनी आपल्या मुलांच्या भविष्याबद्दल कधी निराश होऊ नये. कारण जी मुले आम्हाला सोडून गेली आहेत, ती सुद्धा आमचीच मुले आहेत आणि आम्हीही त्यांचेच आहोत. त्यांनी आम्हाला वारंवार विश्वास दिलेला आहे की, ते आमचेच आहेत आणि आम्ही त्यांचेच आहोत.

जे आईवडील असे समजतात की, ही शाळा मुलींना जास्त चांगली आहे आणि मुलांना सुद्धा थोडे उपयोगी शिक्षण मिळते आहे, मुलांना न पाठवता इथे मुलींना पाठवावे अशांचा गैरसमज दूर झाला पाहिजे. आमच्यासाठी मुले आणि मुली दोन्ही समान आहेत. इथे जो ज्या कामासाठी योग्य असेल तो काम शिकेल. ज्याला भूक लागली आहे तो खाईल. इथे आम्ही हा निर्णय करण्याचा असा देखावा करणार नाही की, ही शाळा मुलींसाठी जास्त चांगली असून मुलांच्यासाठी चांगली नाही. अशी आपली वैचारिक धारणा बनवून समाज एका राक्षसाला उभा



करण्याचे दुःसाहस करत नाही काय? अशा मुलांना वाचवून समाज वाचेल की, त्याच्या बरोबर तो स्वतः सुद्धा नष्ट होईल.

अशा प्रकारे मुलांना मधेच काढून घेऊन आईवडील शाळा आणि मुलांची जी हत्या करतात त्या साठी एकदा का होईना उत्तर द्यावे लागेल. आमची ही व्यथा शाळेसाठी नसून मुलांच्यासाठी आहे. कोणी आई वडिलांना विचारेल काय? की आपल्या कोणत्या अधिकाराच्या जोरावर ते मुलावर असा अत्याचार करतात. ते आईवडील धन्य आहेत की त्यांची श्रद्धा अजून सुद्धा दृढ आहे. शाळेमध्ये अशा आईवडिलांची मुले केव्हाही पहायला मिळतात. कोणी एखादा मुलगा मोठा चित्रकार बनण्याची झलक दाखवतो तर कोणी संगीतामधील गुण प्रकट करतो. एखाद्या मुलाची आवड पाहून हा मुलगा साहित्य रसिक बनेल हे सांगता येते. दुसऱ्या एखाद्या मुलाला पाहून मनात अशी आशा प्रकट होते की हा मुलगा चांगला गणितज्ज्ञ होईल. प्रत्येक मुलगा कोणत्या ना कोणत्या विषयात आपली सुंदरता आणि विशेषता यांची ओळख देत असतो. कोणी पुढे असेल तर कोणी मागे. एखाद्याला एक वस्तू जास्त प्रिय असते. तर दुसरी वस्तू कमी प्रिय असते. परंतु प्रत्येकाचा शारीरिक आणि मानसिक विकास सतत होत असतो.

मुली काही विषयामध्ये योग्य बनतात. तर मुले काही खास विषयात योग्य बनतात. हा विचार आपण अमान्य करतो. ही तर एक अन्यायाची बाब आहे. अमुक विषयामध्ये मुलांनीच तयार व्हावे आणि अमुक विषयामध्ये मुलींनीच तयार व्हावे. आम्हीतर ही एकच गोष्टच मानतो. मुलीने युद्धामध्ये शौर्य दाखवावे आणि मुलाने स्वयंपाक बनविण्यात प्राविण्य दाखवावे. आम्ही याला आड येणार नाही. शाळेमध्ये मुलांच्या पेक्षा मुलींकरिता शिक्षणाची व्यवस्था चांगली आहे. असा आईवडिलांच्या मनातील भ्रम दूर केला पाहिजे. काय संगीत आणि चित्रकलेबरोबर मुलांचे शत्रुत्व आहे काय? हे विषय मानवी जीवनातील सौंदर्य आणि चांगलेपणा सिद्ध करण्याचे चांगल्यात चांगले साधन नाही का? जेव्हा पासून आम्ही संगीत आणि चित्रकलेशी शत्रुत्व सुरु केले त्यावेळेपासून आपण सर्वजण व्यवहारात बावळटच राहिलो. आपण कधी याचा विचार केला आहे का की त्याच वेळेपासून आमचे जीवन अधिक क्षुद्र आणि अरसिक बनले आहे. गणित हा विषय मुलींच्यासाठी उपयोग नाही का? ज्या ज्या विषयांचा संबंध जीवनाशी असतो ते सर्व विषय मुलाला प्रिय असतात. या संदर्भात मुलगा आणि मुलगी असा

भेदभाव राहू नये. जरी आमच्या शाळेमध्ये कोणत्याही विषयाचे ज्ञान अनिवार्य नसले तरीही अनिवार्य शिक्षण द्यायचे असेल तर गणित आणि इतिहास या विषयांच्या पेक्षा मी चित्रकला आणि संगीताला वरचे स्थान देईन. एवढेच काय तर पहिले स्थान देईन.

मनुष्य तो आहे की ज्याच्यामध्ये भावना असते. संगीत आणि चित्रकला हे भावनिक विषय आहेत. यामध्ये थंड बुद्धीचे व्यापारी-गणित नसते. मी आई-वडिलांना सल्ला देताना असे म्हणतो की, आपण काही चांगल्या विषयांना मुलींचे विषय मानून आपल्या मुलांना कमी प्रतीच्या विषयाचे शिक्षण देऊन त्यांना पामर बनवण्याचा प्रयत्न का करतो? आई वडील म्हणतात, 'आमच्या मुलाला चरखा चालवायला लाऊन आपण त्यांना मुलगी का बनवत आहात? चरखा चालवणे हे मुलीचे काम आहे?' काही लोक असेही मानतात की शाळेमध्ये मुलांना मुलगी बनण्याचे शिक्षण दिले जाते. काही आई वडील तक्रार करतात की मुलांना झाडावर चढवून आणि युद्धाचे शिक्षण देवून काय फायदा? परंतु चरखातर कलेचा विषय आहे. कला मुलीसाठीच सुरक्षित असेल तर मुलाला आत्महत्या करावी लागेल. कलाहीन प्राणी हा बिगरपानांच्या झाडासारखा असतो. मुले आपल्या स्वतःच्या रुपामुळे भीतीदायक वाटतील. जे स्वच्छता आणि झाडलोट करण्याच्या कामाला स्त्रीयांचे काम मानतात ते नामर्द असतात. मर्द लोक तलवार आणि झाडूला सारखे मानतात. खरी स्त्री झाडू एका बाजूला ठेवून तलवार हातात घेऊन रणांगणात उतरेल. एक हत्यार एक प्रकारचा कचरा साफ करण्यासाठी आहे तर दुसरे हत्यार दुसऱ्या प्रकारचा कचरा साफ करण्यासाठी आहे. जर मुली युद्धाच्या मैदानात उतरणार नसतील तर चांदबीबी (किंवा झाशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादी) आम्हाला कशी मिळेल? मुलांनी सूत कातायचे नसेल तर त्यांना घरामध्ये जेवण तयार करुन द्यावे लागेल आणि मुलींना लढाईसाठी जावे लागेल. जर आम्ही मुले आणि मुलींच्यामध्ये फरक करु तर असे विचित्र आणि सुंदर परिणाम आमच्यापुढे येतील असो. आपण पाहिले की आई वडील कोणकोणत्या कारणांनी आपल्या मुलांना इथे शाळेत पाठवतात. आणि ते कसे कसे फायदा घेतात किंवा त्यांचे नुकसान होते. आपल्या मुलाला आपण शाळेत पाठवण्यापूर्वी या गोष्टींचा विचार जरुर करा.

आता आम्ही आपले मुलाबद्दल काय कर्तव्य असेल याबद्दल थोडी



चर्चा करणार आहोत.

आईवडिलांचे मुलाबद्दलचे कर्तव्य इतके मोठे आणि गंभीर आहे की त्याच्यावर भागवत जरी लिहिला गेला तरी तो लहान वाटेल म्हणून इथे आम्ही त्याचा उल्लेख करत आहोत. मी पुढे एक यादी देतो आहे. त्यातील सूत्रे आपणाला लक्षात ठेवायची आहेत. ती सूत्रे कशी अमलात आणायची हे ही सांगणार आहे.

अ) आमची पहिली इच्छा ही आहे की आपण आपल्या मुलांना कधी कोणती शिक्षा देऊ नका. शिक्षेमुळे मुलाला शारीरिक त्रास होतो याची मला अजिबात काळजी नाही कारण मारण्याचा परिणाम थोडावेळच राहतो. मूल मिळालेला मार विसरते. परंतु शिक्षेच्या कारणाने मुलाच्या मनामध्ये जी भीती निर्माण होते ती भीती भयंकर, प्राणघातक आणि दुष्ट असते. या भीतीमुळे मूल घाबरट, खोटे बोलणारे आणि नामर्द बनते. पुढे भीतीच्या कारणाने मूल दुराचारी बनते. आज आपण धर्म, समाज, रुढी, जात आणि सत्ता यांना घाबरतो त्याचे कारण काय आहे? बालपणापासून आपल्याला भीती वाटण्याचे कारण हेच आहे. दुसऱ्याला घाबरल्यामुळे आपण खोटे बोलतो आणि नामर्दपणा दाखवतो. आज भीतीदाखवून आपण आपल्या मुलांना घाबरवतो. उद्या शिक्षक त्याला घाबरवतील आणि पुढे काही काळानंतर पोलीस त्याला घाबरतील. कसे का होईना आपण आपल्या मुलाला भीतीपासून जरुर वाचवा.

ब) मारहाण करुन आणि शिक्षा देऊन आपण आपल्या मुलांना घाबरट आणि खोटे बोलणारा बनवताल. परंतु लालुच दाखवून किंवा फूस लावून आपण त्याला नालायक बनवाल. जो मुलगा घरामधून पैसे घेऊन शाळेत शिकायला जाईल, तो न्यायाधीशाला लाच देवून खोटा निकाल लिहून घेईल आणि तोच मुलगा जमीन किंवा सत्ता हस्तगत करण्यासाठी खून सुद्धा करायला लावेल. खाण्याच्या वस्तू देवून ज्या मुलाकडून आपण आपले काम करुन घेतो त्याच मुलाला कपडे, हिरे, मोती आणि दागिने देवून आपण व्यभिचारी बनवतो. निर्भयता आणि मोह जिंकणे याचे शिक्षण हेच खरे शिक्षण आहे. भीती आणि लालुच या दोन्ही गोष्टी खाली घसरवणाऱ्या आहेत. भीतीमुळे नरक मिळतो आणि लालचेमुळे स्वर्ग दरवाजावर येऊन उभा राहतो. परंतु शेवटी या दोन्ही

जागेवरुन मनुष्य खाली पडतो. भीती आणि लालसा रहित प्रदेश हा वरचा प्रदेश आहे तो स्वर्ग आणि नरक यांच्यापेक्षा चांगला आहे.

क) तिसरी गोष्ट म्हणजे आपण आपल्या मुलाला स्पर्धेच्या विषापासून जरुर वाचवा. दोन मुलामध्ये स्पर्धा निर्माण करुन त्यांच्याकडून काम करुन घेणे हा एक हलका प्रकार आहे. आम्ही मुलांना रोजच सांगतो की, 'या, पहा सर्वात प्रथम कोण पळतो ? सर्वात प्रथम कोण शिकतो? सर्वात प्रथम कोण पाणी आणतो? या पद्धतीने आमचे काम होत असले तरी या सवयीने मुले बिघडतात. जेव्हा जेव्हा यश आपल्यासारखे मिळत नाही तेव्हा तेव्हा तो दुसऱ्याला हरवून, मारून, दुसऱ्यांच्या प्रेतावर चालून स्वतः विजयाचे सुख लुटण्याचा प्रयत्न प्रयत्न करतो. स्पर्धाही एक प्रकारची नशा आहे. ज्याप्रमाणे नशेतील मनुष्य नशेच्या परिस्थितीत आपला जोर दाखवतो त्याप्रमाणे जोपर्यंत माणसावर स्पर्धेची धुंदी असते तोपर्यंत तो काम करतो. आपण आपल्या मुलांना आपल्यातील स्पर्धेच्या रस्त्यावर कधी नेवू नका. स्पर्धेमध्ये कोणतीतरी एक व्यक्ती मागे राहाणारच. नि मागे राहतो तो निराश आणि निरुत्साही बनतो. या व्यतिरिक्त जो विजयी होतो तो घमेंडखोर आणि गर्विष्ट बनतो. स्पर्धा एक ठिगळ आहे तिच्यामध्ये खरी आवड निर्माण होत नाही. उलट स्पर्धेमुळे आत्मशक्तीला दूर लोटले जाते किंवा त्याला विकृत बनवले जाते.

ड) चौथी गोष्ट म्हणजे आपण मुलांना धार्मिक शिक्षण देण्याचा विचार मनातून काढून टाका. धर्माच्या गोष्टी सांगून, धर्माची कामे करायला लावून, धर्माच्या रुढीनुसार कपडे घालायला लावून आपण आपल्या मुलांना कधी धार्मिक बनवू शकत नाही. बहुतेक आईवडील आम्हाला म्हणतात की आपल्या शाळेत मुलांना नीतीचे शिक्षण दिलेतर चांगले होईल. सांगणारांचा आशय सुद्धा असाच असतो की आपण मुलांना पोपटासारखे नीति शिक्षण द्यावे. मुलाने धर्माच्या गोष्टी कराव्यात ही त्यांची इच्छा असते. मुलाने पुन्हा पुन्हा आईवडिलांच्या किंवा देवी देवतांच्या पुढे मान वाकवून त्यांना प्रणाम करावा आणि आई वडिलांची आज्ञाही ईश्वराची आज्ञा समजून त्याच्यापुढे मान वाकवावी. आपण आपल्या मुलांना असे शिक्षण कसे देऊ शकतो? जर आम्ही असे मानले की



उपदेशाने मिशा येतील, (शहाणपण येईल) आंधळा पाहू लागेल, लंगडा चालू लागेल. आम्ही मुलांना धर्म आणि नीतीच्या उपदेशाद्वारा धार्मिक किंवा नीतिवान बनविण्याचा प्रयत्न करणार का? हे पाहून आमच्या मनात खेद उत्पन्न होतो की ज्या आईवडिलांच्या आपल्या जीवनात अशी कोणतीही गोष्टच केलेली नसेल की जिच्यामुळे मुलाने त्यांच्या पाया पडावे. ते आईवडील नीतीच्या शिक्षणाच्या मदतीने आपला अधिकार स्थापन करण्याची इच्छा करतात. आपण स्वतः अशा लोभापासून दूर रहा. धर्म हा कोणत्याही पुस्तकात नाही. कोणत्याही उपदेशात नाही. कोणत्याही कर्मकांडात नाही. धर्म हा मानवाच्या जीवनामध्ये आहे. जर आपण आपल्या जीवनाला पूर्णपणे धार्मिक बनवून ठेवले तर समजावे की आपण आपल्या मुलाच्या धार्मिक शिक्षणासाठी सर्वकाही करुन ठेवले आहे की जे आपणाला करावयाचे होते. जर आपण दांभिक असाल आणि आपल्या मुलाला धार्मिक बनवणार असाल तर निश्चितपणे तोसुद्धा आपल्यासारखाच धर्माचा दांभिकपणा करणारा निघेल.

इ) आपणाला अजून एक-दोन गोष्टी सांगायच्या आहेत. कारण की आम्ही आपल्या मुलांना समजून घेत नाही म्हणून आम्हाला त्यांचा वैताग वाटतो आणि ते आमच्यापासून वैतागतात. मुलांच्याबद्दल आपल्या असणाऱ्या गैरसमजुतीमुळे आपण त्यांचा वारंवार अपमान करतो आणि त्यांना पुन्हा पुन्हा दुःखी बनवतो. मूल एक संपूर्ण मनुष्य आहे. त्याच्यामध्ये बुद्धी आहे, भावना आहे, भाव आहे, अभाव आहे, त्याचे स्वतःचे एक जीवन आहे. आपल्या अशा मूलरुपी माणसाला पूर्णपणे मान द्यावा. आपण उठता बसता मुलाला फटकारत असतो, डाफरतो, छोट्या छोट्या गोष्टीमधून त्यांचे मन दुखावतो, त्यांचा पाणउतारा करतो, त्याच्या काही त्रुटीबद्दल त्याला लाजिरवाणे बनवतो, हे सर्व त्याच्यासाठी दुःखदायक आणि अपमानकारक असते. आपण मुलाचे जग ओळखत नाही म्हणून आपण आपला हेका चालवतो, आपलेच म्हणणे जोर देवून खरे करतो. आम्ही असे मानतो की - आमचा विचार तोच मुलाचा विचार, आमची इच्छा तीच मुलाची इच्छा, जे आम्हाला पसंत आहे तेच मुलालाही पसंत आहे. आमची आवड निवड हीच मुलाची आवड निवड आहे. आमचा धर्म

तोच मुलाचाही धर्म आहे. अशा प्रकारे आपण आपले विचार मुलावर लादून फार मोठी चूक करत असतो.

फ) मुलांच्या भावना आणि विचार इतके बारीक असतात की, ते व्यक्त करणे त्यांना खूप अवघड जाते. मुले काही गोष्टीमुळे रडतात किंवा हातपाय आपटतात. परंतु हे आपल्याला सहसा काही कळत नाही किंवा आपण समजून घेण्याचा प्रयत्नही करत नाही. आम्ही त्यांना भांडखोर म्हणून दूर पळवून लावतो किंवा त्यांना मारहाण करतो. अशा वागण्याने आपण निश्चितपणे मुलाचे मन दुखवतो. आपल्यापैकी प्रत्येकाचा असा अनुभव आहे की कधीकधी मूल अशा वस्तू मागते की त्या आपल्या लक्षात येत नाहीत. मूल मात्र खाणाखुणा करत राहते आणि आपण मात्र त्याच्यावर नाराज होत राहतो. मूल आपल्या बोबड्या आणि तुटक्या फुटक्या भाषेमध्ये काहीतरी समजावून सांगणार असते पण त्याला उत्तर म्हणून आपण नाराजी व्यक्त करतो. जेव्हा मूल वेगवेगळे प्रयत्न करून आपल्या मनातील गोष्ट व्यक्त करू इच्छिते तेव्हा आपण त्याच्याकडे पहात सुद्धा नाही किंवा आपण त्याचे म्हणणे हसून टाळतो. अशा प्रकारे निराश झालेला मुलगा जास्त हट्ट करतो. तेव्हा त्याला जास्त मार खावा लागतो आणि तो रडून रडून झोपी जातो. शेवटी त्याला पाहिजे असणारी वस्तू कुठेतरी अचानक सापडते तेव्हा त्याच्या आनंदाला पारावार रहात नाही आणि तो संपूर्ण घराला आनंदाने उजळून टाकतो. तो खाणाखुणा करुन आपल्या बोबड्या बोलीत म्हणतो, 'मला याची आवश्यकता होती.' त्याला मूल्यवान वाटणारी ही वस्तू एखादा काचेचा तुकडा असतो किंवा फुटकी कवडी असते. आपणाला नंतर पश्चाताप वाटतो आणि आपण म्हणतो की आम्हाला एवढी किरकोळ गोष्ट समजली नाही आणि आम्ही यासाठी आमच्या मुलाला दोन तास रडवले. परंतु हे सर्व तर दररोज होत राहते. आम्ही एक समजतो आणि मुलाच्या मनात तर दुसरीच वस्तू असते. मूल आम्हाला एक वस्तू मागते आणि आम्ही त्याला दुसरी वस्तू देतो. मुलाच्या मनातील विचार जाणणे-समजणे यासाठी आम्हाला आवश्यक प्रयत्न करायचे असतात. जेव्हा आम्ही एकदा मुलाच्या नजरेने पाहणे सुरु करु तेव्हा आमच्यातील आणि मुलातील गैरसमजुती



दूर होतील आणि दोन्ही बाजू सुखी होतील.

आपणाला अजून एक गोष्ट सूचवू इच्छितो. आपण आपल्या मुलाला हट्टी आणि उद्धट कधी मानू नका. आपण असे मानून चाला की मूल कधी उद्धट नसतेच. मुलाला हट्टी आपणच बनवतो, जरी आम्ही आपल्या अनुभवावर नजर टाकली तर आम्हाला लक्षात येईल की मुलाला उद्धट आणि हट्टी बनवण्याचे काम आपणच करतो. जेव्हा मूल आम्हाला पाहिजे असणारे आणि आम्ही सांगितलेले काम करत नाही. तेव्हा ते मूल आम्हाला उद्धट आणि वादळी वाटते. जेव्हा मूल आमच्या घरी आलेल्या पाहुण्यांच्यासाठी पाणी आणत नाही, तेव्हा आपण त्याला उद्धट मानतो. जेव्हा मूल घरातील साहित्य तोडते, फोडते, दुसऱ्यांना त्रास देते किंवा कोठे भटकायला निघून जाते. तेव्हा आपण त्याला उपद्रवी म्हणतो. याप्रकारे जेव्हा मूल आपल्या आवडीचे काम करते आणि आपल्या मनातील गोष्ट सोडत नाही तेव्हा आम्ही त्याला हट्टी म्हणतो. जर अमुक एका वयामध्ये असे गुण मुलामध्ये नसतील तर त्याचा विकास होत नाही. परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे आपण याला दोष मानले आहे. मुलाला हुकुमाची सक्ती चांगली वाटत नाही. आपण कोणाचा मान राखावा? आणि कोणाचा मान राखू नये? हे मुलाला लगेच समजते. याच कारणाने ते आमच्या अयोग्य सत्तेला विरोध करते किंवा पाहुण्यांची पर्वा न करता आमच्या गोष्टीवर लक्ष देत नाही. जेव्हा मूल तोडफोड करते, त्यावेळी ते कोणता उद्धटपणा करत नाही. परंतु ते आपल्या क्रियाशील वृत्तीचे समाधान करुन घेते. ते आपल्या या वृत्तीच्या विकासाच्या शोधात राहते. इकडे तिकडे भटकण्याची इच्छा करणारे मूल आपल्या घराला पसंत करत नाही किंवा आपल्या शारीरिक कसरतींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इकडे तिकडे भटकत राहते. जो मुलगा बिघडलेला नाही, त्याच्याबद्दल आपण असा विचार करु शकतो की आपल्या पसंतीची कामे करणारा मुलगा कोणतेही चुकीचे काम करत नाही. जर तो कोणाला नुकसान पोहोचवत नसेल तर, कोणते वाईट काम करत नसेल तर, स्वतःला एखाद्या असाधारण संकटात ढकलत नसेल तर, तो आपल्या पसंतीचे काम करत असताना आपण त्याला अडथळा का बनावे? मुलाला

त्याच्या पसंतीचे काम करु न देणे आणि आपल्याच पसंतीचे काम करायला लावणे हे योग्य नव्हे.

मुलाने विचार करुन स्वतः काम करणे आणि ते काम आपल्याकडून करवून घेणे या दोन्हीमध्ये फरक आहे. मुलाला पाहिजे असणारे काम आपण केव्हा करावे? केव्हा करु देवू नये? याचा विचार आम्हाला करावा लागेल. आम्हाला मुलाला गुलाम करायचे नाही. त्याच्या विकासात आपल्या बाजूने कोणतीही अडचण निर्माण करायची नाही. हा विवेक बुद्धीचा प्रश्न आहे. याला प्रत्येक आईवडिलांच्या विवेक बुद्धीवर सोडून दिले पाहिजे. आपण आपल्या मुलाला स्वतंत्र अवश्य ठेवा. आपण मध्ये पडून त्याचे काम करु नये. मुलाला आपले मिळणारे प्रेम हे दुर्मिळ आहे. हे प्रेम त्याला अपंग बनवण्यासाठी नाही तो त्याच्या मर्जीने काम करेल. ते त्याला करु द्या. एवढेच नव्हे तर मूल काम स्वतः करु शकते आणि ते आपल्या कडून करुन घेणे सोडून देते. आपण त्याची व्यवस्था ताबडतोब करावी. आपल्या जीवनाबद्दल मुलाने आपल्यावर अजिबात अवलंबून राहू नये. याची काळजी आम्ही घेतली पाहिजे. आम्ही मुलाची आया बनून त्याची स्वाधीनता काढून घेवू नये. यासाठी आपण स्वतंत्रतेचा अर्थ समजून घेतला पाहिजे. स्वतंत्रता याचा अर्थ निरंकुशता असा नव्हे. आपण चुकूनही असे समजू नका की आपला मुलगा आपल्याला मारतो तरीही आपण त्याला स्वतंत्रता द्यावी असे नाही. मॉन्टेसरी पद्धती मध्ये मुलाला त्याने कोणालाही मारहाण करण्याचे स्वातंत्र्य दिलेले नाही. म्हणजे या पद्धतीमध्ये मूल शिवी देणे, चोरी करणे, इतरांना मारहाण करणे यासाठी स्वतंत्र नाही. असे काम मूल करु शकत नाही. या पद्धतीमध्ये अशा मुलाला नीचवृत्तीचा मानले जाते. त्याची वृत्ती अशी असेल तर आपण त्याचे अभिनंदन कधीच करु शकत नाही. स्वातंत्र्याच्या संदर्भात आपण आम्हाला वारंवार प्रश्न विचारता म्हणून आपणाला त्याचे योग्य स्पष्टीकरण देत आहे.

आपणाला एक युक्ती सुचवतो. मुलाबरोबर वागताना आपण एका गोष्टीची पूणपणे काळजी घ्यावी. मुलाला शेकडो वेळा 'होय' म्हणणे चांगले परंतु 'नाही' असे कधीही म्हणू नका. सध्या आपण म्हणीनुसारच व्यवहार करतो की, 'एक नकार शंभर दोषांना दूर करतो.' मूल जेव्हा स्वतः काही करु इच्छिते तेव्हा तेव्हा आपण त्याला होय म्हणा, मुलगा जेव्हा जेव्हा आपणाला काही सांगू



इच्छितो तेव्हा तेव्हा आपण त्याला होय असेच म्हणा. आपण कोणत्याही कारणाशिवाय काही निर्दोष कामामध्ये मुलाला नाही म्हणून अपमानित करत असतो. आपल्या मनामध्ये नेहमी अशी भीती असते की, आपण होय म्हटले तर आपणाला जे काम अपेक्षित नाही तेही काम मुलगा करेल म्हणून आपण होय म्हणा आणि एकदा मुलाला काम कसे करायचे आहे हे समजावून सांगा. मग तर मूल एखाद्या मोठ्या माणसासारखे आपले सर्व काम पूर्ण जबाबदारीने करते. आपणाला जर नकार द्यायचा असेल तर सखोल विचार केल्यानंतरच नकार द्या. ज्या कामासाठी नंतर परवानगी द्यावी लागेल त्यासाठी पहिल्यांदा नकार दिल्यानंतर पुन्हा होकार देवू नका. एकदा होकार देऊन पुन्हा नकार देण्यामध्ये जे नुकसान आहे त्यापेक्षा जास्त नुकसान प्रथम नकार देवून नंतर होकार देण्यामध्ये आहे. अशा स्थितीमध्ये नकाराला होकारात कसे रुपांतरित करता येते हे मूल शिकते. आपण रडलो, रुसलो किंवा हातपाय आपटले तर त्याचे काम होते हे त्याच्या लक्षात येते. ज्या वेळी स्वतः त्या मुलाचे, समाजाचे किंवा नीतीचे नुकसान होण्याची शक्यता असते त्याचेवळी आपण त्याला हातून एखादी वस्तू फुटेल, तो अमुक एक काम करु शकणार नाही किंवा काम करताना त्याला दुखापत होईल किंवा तो अमुक एक काम करु शकणारच नाही इत्यादी. आपल्या या विचाराने आपण मुलाला एखादे काम करु द्यायला कचरतो. कधी काम द्यावेच लागलेतर बरेच आढेवेढे घेवून अविश्वास व्यक्त करुन काम सोपवतो. या कारणामुळे मुलाच्या मनात आपल्याबद्दल अविश्वास निर्माण होतो. मूल आपली शक्ती हरवून बसते आणि पुढे ते नालायक बनते. दोन मुलापैकी एका मुलाचे कौतुक करणे आणि एका मुलाची निंदा करणे यामुळे एकाच्या मनात विश्वास आणि दुसऱ्याच्या मनात अविश्वास निर्माण केला जातो. निंदेमुळे मूल संकुचित बनते. तर स्तुतीमुळे उद्धट बनते. म्हणून आपणाला या दोन्ही गोष्टी सोडायला हव्यात.

इथे मी आई वडिलांच्या एका वाईट सवयीकडे त्यांचे लक्ष आकर्षित करणार आहे. नेहमी आईवडील आपल्या मुलांना घरी आलेल्या पाहुण्यासमोर बोलावतात आणि त्याला काही तरी बोलायला, गायला किंवा आपली कोणतीतरी कला दाखवायला सांगतात. असे करण्याने तुमचे पाहुणे किंवा मित्र खुष होतील पण त्यामुळे मुलाचे जास्त नुकसान होईल. यामुळे मुलाला देखावा करण्याची आवड जडते. त्यामुळे त्याला अशी सवय लागते की जेव्हा कोणी त्याचे कौतुक

करणारा असतो किंवा त्याला प्रोत्साहन देणारा असतो तेव्हाच त्याला चांगले वाटते. या प्रकारे तो नाटकी बनतो. आपल्या मुलांनी आपली कला दाखवून पाहुण्यांना खूष केले नाही किंवा कला दाखवण्याला नकार दिला तर बहुतेक आईवडील मुलावर रागावतात. कधी कधी ते आपल्या मुलाला बक्षीस देवून त्याच्याकडून काम करुन घेण्याचा प्रयत्न करतात किंवा नाराज होवून मुलांना मारहाण करतात. मूल हे आईवडील अथवा पाहुण्यांच्या करिता नसते. आपण आपल्या मुलांना त्यांच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्यांना खूष करण्यासाठी विवश का बनवता? असे करण्यासाठी आपण आपल्या मुलांना गुलामीची शिकवण का देता? आपण अशा प्रकारे स्वतःला समाधानी करण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न करता. शिशु शाळेत मुले यामुळे सुंदर आणि सुशील बनत नाहीत. मुलाची सर्व शक्ती सर्वप्रप्रथम त्याच्या आनंदासाठी असते. आपल्या मुलांना आपले खेळणे बनवू नका, आपण आपल्या मुलांचे खेळणे बनू नका.

आपणाला खूप त्रास दिला. शिकवण तर एवढी दिली की आपल्याला अपचन होईल. तरीही आम्ही अजून सांगण्याचे खूप काही आहे. परंतु आता मी आपणाला काही व्यावहारिक गोष्टी सांगतो. आपण आपल्या मुलाला अगदी नीटनेटका ठेवा. घाण आणि क्षयाच्या रोगाचा विचार बरोबरच करा. निर्भयता हा शिक्षणाचा आत्मा आहे. आपण आपल्या घरात हे सूत्र योग्य रीतीने पाळा. लहान मुलांची अनुपस्थिती चालू शकते हा विचार सोडून द्या. लहान मुलांची आपण अशी व्यवस्था करावी की ते दररोज शाळेत येईल. परंतु मुलाच्या इच्छे विरुद्ध त्याला शाळेत पाठवू नका. घरामध्ये दुसऱ्या बाळाचा जन्म होणे, एखाद्याचा मृत्यु होणे किंवा प्रपंचातील इतर कारणामुळे मुलांना १०-१० दिवस शाळेत जाण्यापासून थांबवू नका. आपण आपल्या मुलांना घरात काही शिकवू नका. एका म्यानात दोन तलवारी बसू शकत नाहीत. आमची पद्धत वेगळी आणि तुमची पद्धत वेगळी. आपण आपल्या मुलाला घरातच शिकवणार असाल तर त्याला शाळेतून काढून घ्या. आपण स्वतः डॉक्टर नसाल तरीही आपला इजाल करु शकत असाल, आपण वकील नसूनही आपली वकिली करत असाल, तशाच पद्धतीने आपण शिक्षक नसतानाही आपल्या मुलाला शिकवण्याचे धाडस करत असाल; आपण आपली नाव आमच्या हाती सोपवल्यावर निश्चिंत राहण्याचा विश्वास तुमच्यामध्ये नसेल, तर नाव डुबणारच. दोन घोड्यावरील प्रवासी बनू नका कारण आपण



दोन्ही बाजूंना लटकत रहाल. आपल्या मुलाला शाळेमध्ये घातल्यावर लगेच काही दिवसातच तो काय शिकला हे त्याला विचारणार असाल तर जमिनीमध्ये एखादे रोप लावल्याबरोबर काही दिवसातच त्याची मुळे पाहण्यासाठी उपटलेल्या रोपासारखी आपली परिस्थिती होईल. जेव्हा आपण आपला विश्वास आमच्यावर ठेवाल त्याच वेळेला आपणाला योग्य फळ मिळेल. आपण असमाधानापासून दूर रहा. स्वार्थी आणि आपमतलबी लोकांना ओळखा. जर आपल्यामध्ये श्रद्धा असेल तर आपण दुसऱ्या मुलांमध्ये जे काही चांगले पाहिले, ते आपण स्वतःच्या मुलामध्ये सुद्धा पाहू शकाल. आम्ही आपणाला अजून काही मागत नाही - एकच मागणे मागतो ते म्हणजे 'आमच्यावर आपली अढळ श्रद्धा हवी.' आपल्या कुटुंबातील स्त्रिया थकतील, दुसऱ्या शाळेतील शिक्षक आपल्याला डिवचतील, स्वार्थासाठी मुलाला शिकवणी लावा म्हणून आपल्याला गळ घालतील. म्हणून आपण सावध रहा.

आपण सवड काढून आमची शाळा पाहण्यासाठी आमच्याकडे वारंवार या. आमच्याकडून एखादी चूक होत असेल तर ती आमच्या नजरेला आणा. आपण आपल्या मुलाच्या संदर्भात आमच्याशी मनमोकळे पणाने चर्चा करा. आपल्या अडचणी आम्हाला सांगा. आमच्याशी निर्भयपणे बोला. आपल्या मुलाच्या संदर्भात आमच्यापासून काहीही लपवू नका. आपण जेवढी काळजी कराल तेवढा आपल्या मुलाला आणि शाळेला फायदा होईल. मुलाला शाळेमध्ये दाखल केल्यानंतर आपण निश्चिंतपणे झोपी जाण्याची पद्धत सोडा. आपण आपल्या कुटुंबातील सर्व लोकांची या संदर्भातील आवड वाढवा. म्हणजे आपण निश्चिंतपणे यशस्वी होवू शकू.

***

* * * *
* * * *

# ७. आईस.........

शाळेमध्ये येणाऱ्या मुलाच्या संदर्भात मी त्याच्या आईला काही गोष्टी सांगू इच्छितो. असे माना की, आपण झोपलो आहोत. आपल्याला त्या अवस्थेत कोणीतरी जादूने किंवा राक्षसी मायावीच्या प्रभावाने कोणत्यातरी अजाण अशा राक्षसाच्या प्रदेशात नेवून सोडले आहे. आता आपणाला तेथे जाग आल्यावर आपल्या लक्षात येईल की, आपण राक्षसाच्या देशात येवून पडलो आहोत. अशाच स्थितीमध्ये आपण किती भयभीत होवू किंवा आपणाला किती त्रास होईल. याचा विचार करा.

तेथे तर आपणाला आपल्या सर्व बाजूंनी मोठेमोठे राक्षसच दिसतील.

तेथे त्यांच्या घरात जिने सुद्धा मोठे असतील. त्यांची कपाटे मोठी असतील. त्यांची रांजणे मोठी असतील. तेथील डेरेसुद्धा मोठे मोठे असतील. आपण तर त्या राक्षसांच्या पायाच्या घोट्यापर्यंतसुद्धा पोहोचू शकणार नाही. आम्ही अशा एका परिस्थितीत अडकू की, राक्षस लोकांनी आपणाला तेथेच बंद केलेले असेल. तेथेच राहण्यासाठी आपणाला हतबल केलेले असेल, तर विचार करा की तेथे आपणाला कसा अनुभव येईल? तेथे तर आम्हाला मोठ मोठ्या जिन्यांच्या लांबलचक पायऱ्या असतील. राक्षस त्या पायऱ्यावरुन दणादणा चढतील आणि उतरतील, पण लांबलांब अंतर असणाऱ्या त्या पायऱ्यावर आपणाला चढता ही येणार नाही. तेथील थाळयाइतक्या मोठ्या असतील की आम्ही सर्वजण तिच्यामध्ये मावले जावू. रांजण तर इतके उंच असेल की त्यातील पाण्यापर्यंत आपणाला पोहोचता येणार नाही. अर्थ हा की आपण आपल्या मनासारखे कोणतेही काम करु शकणार नाही.

तुमच्या आमच्या घरातील मुलांनाही अशीच स्वप्ने वारंवार पडत असतील. परंतु त्यांच्या अशा स्वप्नाकडे आपले लक्ष जातच नाही. आपल्या घरातील मुलांच्या संदर्भात असेच काही घडत असते. भिंतीच्या खुंट्या उंच असतात. रांजण एवढे उंच आणि मोठे असते की मूल तिथपर्यंत पोहोचू शकत नाही. कपाटे एवढी मोठी असतात की त्यांचा उपयोग मुले करु शकत नाहीत. घराची व्यवस्था



आणि सर्व सजावट अशी असते की मुले असा विचार करु लागतात की हे माणसांचे जग आहे की राक्षसांचे?

अशा ठिकाणी मुलाला आपल्यासाठी काही ना काही मागावे लागते. त्याला पाणी प्यायचे असेल तर पाण्याचे भांडे खूप उंच असते. यासाठी त्याला पाणी मागावे लागते. पलंग एवढा उंच असतो की मुलाला त्याच्यावर झोपायचे असेल तर त्याला मोठ्या माणसांना सांगावे लागते. स्वयंपाक घरात जेवणाच्या वेळी मांडावे लागणारे पाट एवढे मोठे असतात की तो ते हलवू सुद्धा शकत नाही. जिन्याच्या पायऱ्या एवढ्या मोठ्या आणि उंचीच्या असतात की मूल सहजपणे त्या चढू-उतरु शकणार नाही. घरामध्ये लावण्यात आलेले सामान हे मूल वापरु शकणार नाही अशाच पद्धतीने लावलेले असते. अशा स्थितीमध्ये मुलाने काय करावे?

खरे हे आहे की काही घरामध्ये मुलांसाठी प्रेमाने आणि उदारतेने मूल खेळू शकेल अशी खेळणी आणलेली असतात. घराच्या एका कोपऱ्यात बसून त्यांनी त्या खेळणीशी खेळत बसावे असे मुलांना सांगण्यात आलेले असते. परंतु ही खेळणी मुलांना दीर्घकाळ पर्यंत आनंदी ठेवू शकत नाहीत. या खेळण्याबरोबर खेळता खेळता मुलांचे मन विटते म्हणून ती मुले खेळणी तोडतात फोडतात किंवा रागाला आल्यावर दाताने चावून फेकून देतात. असेही नेहमी पाहिले जाते.

जर आपण विचार केला तर, हे लक्षात येईल की मुलाला पाहिजे तसा कोणताही कोपरा घरामध्ये नसतो. घरामध्ये असणारी साज सजावट हे मुलांसाठी खूप मोठे ओझे असते. अशा वेळी आपणाला आपल्या घरातील व्यवस्था निश्चितच बदलावी लागेल. मूल स्वतः ज्याचा उपयोग सहज करु शकेल. अशी छोटी छोटी भांडी, छोट्या लोट्या, छोट्या थाळया, छोट्या वाट्या, छोटे झाडू, छोटे सूप, छोटी बादली इत्यादी सामान घरामध्ये त्यांच्यासाठी उपलब्ध करा. कारण आपल्या घरामध्ये आपण जी कामे करणार असतो तीच कामे करण्याची आपल्या घरातील मुलांची इच्छा असते. नेहमी आईच्या संदर्भात आपण असे पाहिले असेल की मूल पोळी लाटणे, कालवण हालवणे, भांडी घासणे, भांडी धुणे आणि झाडू मारणे अशी कामे मोठ्या तत्परतेने करु इच्छिते. परंतु घरातील सर्व कामांचे सर्व साहित्य मोठ्यांच्या लायकीचे असते. त्यामुळे ही कामे करताना मुलाला इजा होईल म्हणून जी करु दिली जात नाहीत. या नंतर आपण जेव्हा अशी

कामे करायला मुलांना सांगतो तेव्हा ती मुले उलट उत्तर देतात किंवा सांगितलेले काम करत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये मूल आपण सांगितलेले काम करायला टाळाटाळ करते. असा अनुभव येतो.

घरातील प्रत्येक काम करावे असे मुलाला मनापासून वाटते. झाडू मारणे, पाट मांडणे, आसन अंथरणे अशी कामे मुलांना आवडतात. पण हे काम करताना त्याला इजा होवू नये किंवा तोडफोड होवून नुकसान होवू नये म्हणून त्यांना अशी कामे करु दिली जात नाहीत. यामुळे नाराज होवून मूल लगेच रडू लागते आणि थोड्या वेळानंतर ते गप्प बसते. परंतु आपल्या या अनुभवानंतर जेव्हा आईवडील मुलाला एखादे काम करायला सांगतात किंवा एखादी वस्तू कोठून तरी आणायला सांगतात तेव्हा तो मुलगा सांगितलेले काम करतो आणि ती वस्तू शोधून मात्र आणत नाही. ज्यावेळी आपल्या प्रमाणेच मुलाला घरामध्ये एखादे काम करावेसे वाटते तेव्हा त्याला सर्व सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. मुलाला त्याच्या आवडीनुसार काम करता यावे म्हणून त्याला उपयोगी पडणाऱ्या छोट्या छोट्या वस्तू घरात उपलब्ध करुन द्या. परंतु जेव्हा घरात त्याला उपयोगी पडतील अशा वस्तू नसतात आणि घरातील सर्व वस्तू त्याच्या मानाने मोठ्या, जड आणि दूरदूर ठेवलेल्या असतात तेव्हा त्याला त्याच्या गरजेच्या वस्तूंची मागणी पुन्हा पुन्हा करावी लागते. परंतु अशा अवस्थेमध्ये मूल आपले विनाकारण डोके खाते असे आपणाला वाटते. पण माझ्या अनुभवाच्या आधाराने मी असे म्हणू शकतो की मुलाच्या कामाच्या सर्व वस्तू छोट्या छोट्या असाव्यात. त्याला आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी घरात उपलब्ध करुन द्याव्यात. त्यामुळे मूल आपल्या आवडीचे काम स्वतः करत राहील आणि ते आपणाला अजिबात त्रास देणार नाही.

इथे शिशु शाळेत सर्व साहित्य अशा प्रकारे व्यवस्थित ठेवले जाते की मूल त्या साहित्याचा उपयोग आपल्या इच्छेनुसार आणि पाहिजे तेव्हा करु शकते. ते स्वतः आपले आसन अंथरुन त्यावर बसते. त्याला ज्या आणि जितक्या वस्तूंची गरज असते तेवढ्या वस्तू ते स्वतः घेते. त्या वस्तूंच्या मदतीने आनंदाने खेळत राहते. खेळ संपल्यावर ते त्या सर्व वस्तू पुन्हा जागेवर ठेवते. या संदर्भात मला त्यांना काहीही सांगावे लागत नाही.

एका जागेवर मुकाट्याने बसून राहणे हा मुलाचा स्वभाव नसतो. त्याला काही काहीतरी करत राहावे असे वाटत असते. काही श्रीमंत आणि मोठ्या



समजल्या जाणाऱ्या कुटुंबात नेहमी असे मानले जाते की मुलांनी काही कामे स्वतः करु नयेत. अशा काही कुटुंबामध्ये मुलांना स्नान घालणे, त्यांचे केस विंचरणे, त्यांना कपडे घालणे, मोजे व बूट घालणे अशी कामे घरातील म्हातारी माणसे किंवा नोकर करतात. जर कोणी आमचे अन्न चावून चावून आमच्या तोंडात घालण्याची नोकरी करु इच्छित असेल तर असे काम आपण करु द्याल का? आम्ही अशा नोकराला ताबडतोब नकार देवू. परंतु घरामध्ये आपल्या मुलांना आपण सर्व काही चावूनचावून देतो. आपण स्वतःच त्यांची सर्व कामे करतो. काम करताना मुलाला इजा होईल, त्याचे कपडे खराब होतील, तो घरातील कामामध्ये अडचण निर्माण करेल, त्याच्या हातून काहीतरी बिघडेल म्हणून आपण त्याला कोणतेही काम करताना अडवतो. त्याला कामाला पुन्हा पुन्हा नकार देतो. खरेतर आम्हाला आपल्या मुलाला इजा होईल अशी काळजी करण्याची गरज नाही. आपले मूल काम व्यवस्थित करणार नाही किंवा काम बिघडवेल असे वाटू देवू नका. आपल्या मुलाला कामाचा आनंद मिळेल आणि ते कोणत्याही संकटात सापडणार नाही एवढेच पहा.

असे म्हणतात की, 'मन तोडण्यापेक्षा हात तोडलेले बरे.' याचा अर्थ असा की मुलाने स्वतः एखादी तोडफोड करण्यापेक्षा आपण त्याची सर्व कामे करावी, हा विचार चुकीचा आहे. असे करण्याने स्वतःचे काम करायला मूल कधीच शिकत नाही. जी आई मुलांना स्वतःची कामे स्वतः करायला लावते तीच आई खरी आई होय. जे काम दोन वर्षांचे मूल स्वतः करु शकते ती कामे आईने न करणे यामध्ये वाईट ते काय?

युरोपमधील एका शाळेत ३-४ वर्षे वयाची मुले आपले जेवण स्वतःच काचेच्या भांड्यातून वाढून घेवून खातात आणि जेवण झाल्यावर स्वतःच ती भांडी स्वच्छ करुन जागेवर ठेवतात. हे सर्व करताना आपल्या हातून भांड्यांची तोडफोड ते होवू देत नाहीत. जर युरोपमधील एक भगिनी कुमारी मेरिया मॉन्टेसरीच्या शिशु शाळेतील गोष्ट आपल्याला सांगितली तर ती ऐकून आपणाला आश्चर्य वाटेल. या गोष्टी आपणाला या जगातील न वाटता त्या स्वर्गातील वाटतील. छोटी छोटी मुले आपल्या हाताने आपले केस विंचरतात, आपल्या हाताने बूट घालतात आणि बुटाचे बंद सुद्धा सोडतात आणि बांधतात. याच्या अगदी उलट आमच्या शाळेत साडेपाच वर्षे वयाची अशी मुले येतात की ज्यांची आई अजूनही त्यांना आपल्या

हाताने स्नान घालते, आपल्या हाताने त्यांचे केस विंचरते, त्यांना कपडे घालते आणि त्यांची सर्व कामे सुद्धा स्वतः करुन देते. खरेतर या मुलांनी आपली सर्व कामे स्वतः करावीत.

आमच्या शाळेमध्ये पाण्याने भरलेली एक टाकी ठेवलेली असते. तिच्यातून पाणी घेवून मूल स्वतःच आपले हात-तोंड धुतात आणि स्वतः स्वच्छ राहतात. म्हणून मी माझ्या अनुभवाच्या आधारावर असे सांगू इच्छितो की, जर आपल्या घरामध्येही मुलांना स्वतःची कामे स्वतः करण्याच्या सोयी उपलब्ध करु दिल्या तर हळूहळू मुले स्नान करणे, हात-पाय–तोंड स्वच्छ करणे, कपडे घालणे अशी कामे स्वतः करायला शिकतील. त्यांच्या दैनंदिन कामातील त्यांचाच त्रास कमी होईल आणि आईवडिलांची डोकेदुखी कायमची थांबेल.

माझेसुद्धा एक घर आहे. मी सुद्धा अशा अनुभवांनी लक्षात घेतले आहे की मुले घरात काहीना काही मागत राहतात. ती आम्हाला त्रस्त करतात. आमचे डोके उठवतात. परंतु जर त्यांना स्वतःची कामे करत राहण्याचा रस्ता दाखवला आणि त्यांच्या मार्गातील अडचणीदूर केल्या तर ती आपली सर्व कामे स्वतः करायला शिकतील. आम्ही मुलांना गुलामासारखे पारतंत्र्यात ठेवतो ही आमची चूक आहे. घरात आपली कामे मुलांनी स्वतः करावी असे वातावरण मुलांना उलपब्ध करुन द्या.

मुलांचे हातपाय लहान असतात आणि त्यांची शक्ती सुद्धा कमी असते. म्हणून मुले त्यांची कामे चपळतेने करु शकत नाहीत. जितक्या चांगल्या प्रकारे काम केले पाहिजे तितक्या चांगल्या प्रकारे काम करु शकत नाहीत. परंतु ते जे काम आपल्यासाठी करतात त्या कामाने त्यांना आनंद होतो. त्यांचा हा आनंद पाहून आपणालाही आनंद झाला पाहिजे. इथे आमच्या शाळेमध्ये मुलगा आपल्या आवडीची सर्व कामे स्वतः आणि अगदी मनापासून करतो हे मी पाहिले आहे. म्हणून माझी आपणाला विनंती आहे की आपण आपल्या घरात सुद्धा मुलांना जी कामे आवडीने करावीशी वाटतात. ती कामे करु द्या. त्यासाठी त्यांना योग्य सोय उपलब्ध करुन द्या. त्यांच्या कामामुळे त्यांना कोणतीही इजा होणार नाही याची काळजी घ्या.

आमच्या शाळेमध्ये मुलाला सुसंस्कारित बनविण्याचा प्रयत्न दररोज दोन तासासाठी असतो. याशिवाय आपले प्रयत्न २२ तास असतात. आपल्या दोघांच्याही



प्रयत्नामध्ये विरोधाभास असेल तर आम्ही शाळेमध्ये काहीच करु शकणार नाही. जर आपण आमच्या कामाबद्दल अनुकूल राहिलात आणि आपल्या घरामध्ये मुलांशी आम्हाला अनुकूल असे वागलात तर या कामामध्ये आम्हाला निश्चितपणे यश येईल.

आई वडिलांनी त्यांची मुले स्वच्छ आणि नीटनेटकी राहतील याची पूर्ण खबरदारी घ्यावी. परंतु आमचा असा अनुभव आहे की काही मुले आजसुद्धा आपल्या घरातून घाणेरड्या अवस्थेत येतात. आमच्या इथे काम करणाऱ्या काही स्त्रियांच्यां मदतीने आम्ही या मुलांना नीटनेटके ठेवण्याचा प्रयत्न करतो. आपल्या मुलाचे डोळे स्वच्छ राहावेत, दात स्वच्छ राहावेत, कानामध्ये मळ अथवा इतर घाण राहू नये आणि डोक्यातील केसामध्ये उवा नसाव्यात अशी खबरदारी आईने मुलांच्या स्वच्छतेच्या दृष्टीने घ्यावी. या सर्वांची स्वच्छता दररोज झाली पाहिजे. मुलांचे कपडे स्वच्छ रहावेत. बटने सुरक्षित ठेवावीत आणि फाटलेल्या कपड्यांची पुन्हा शिवण व्हावी. आईला या सर्व गोष्टीवर लक्ष ठेवता आले पाहिजे. मुलांची नखे वरचेवर कापावीत जर या गोष्टीमध्ये कमतरता राहात असेल तर यामध्ये मुलांचा दोष नसून तो दोष आई वडिलांचा मानावा.

आपल्या घरामध्ये मुलांची स्थिती ईश्वराने पाठवलेल्या देवदूतासारखी असते. सर्व मुले आपल्यासाठी छोटे छोटे देवच असतात. यासाठी त्यांच्या बरोबर आपला संबंध सन्मानाचा आणि प्रेमाचा असावा.

खरे प्रेम मुलांना दागिन्यांनी सजविण्यात नाही.

खरे प्रेम त्यांना चांगले चांगले पदार्थ खायला प्यायला देण्यामध्ये नाही.

खरे प्रेम त्यांना भारी कपडे घालायला देण्यात नाही.

खरे प्रेम त्यांना त्यांच्या आवडीनुसार काम करु देण्यात आणि त्या कामासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यात आहे. मुले जे काही करु इच्छितात त्यावर आपण आपल्या बाजूंनी प्रतिबंध लावू नये.

जर एखादी मोठी व्यक्ती आपणाला भेटायला आली तर आपण चटकन उठून तिचे स्वागत करतो आणि तिच्याबद्दल आपला विनय दाखवतो. परंतु जे मूल ईश्वराच्या घरातून आपला पाहुणा बनून येते त्याला मात्र आपण झिडकारतो आणि फटकारतो. आपण त्याच्या बरोबर प्रेमाच्या आणि विनयाच्या गोष्टी करत नाही. अगदी किरकोळ गोष्टीपासून त्यांचा अपमान करत राहतो. या गोष्टी किती चुकीच्या

आहेत याचा थोडा विचार करा. यासाठी मुलांबरोबरचा आपला व्यवहार प्रेम, विनय आणि आदरयुक्त असला पाहिजे. मुलाला लहान मानून आपण त्याची उपेक्षा आणि अनादर करु नये.

आपण आणखी एक गोष्ट लक्षात ठेवावी. आपण एका प्रकारचे वर्तन करावे आणि आपल्या मुलांनी त्यापेक्षा वेगळया प्रकारचे वर्तन करावे. अशा गोष्टी शक्य नसतात. कारण मूल आपल्या सर्व कामांमध्ये अत्यंत बारकाईने निरीक्षण करते आणि ते आपले अनुकरण करते. जर आपण आपल्या विचारावर आणि विकारावर नियंत्रण ठेवले तर मूल सुद्धा तसेच करायला शिकेल. आणि ज्याप्रकारे बोलू, ज्याप्रकारे काम करु त्याच प्रकाराने मूल बोलेल आणि काम करेल. ज्या स्त्रिया आपली घरातील सर्व कामे नोकराकडून करुन घेतात त्यांची मुले परस्वाधीन आणि गुलाम बनतात. आपल्या मुलाने त्याची सर्व कामे स्वतः करावीत असे तुम्हाला वाटत असेल तर तुमची कामे तुम्ही स्वतः करा. आपल्या मुलासाठी आपला व्यवहार, आपले बोलणे आणि आपले काम चांगले ठेवा.

मुलांना शिव्या देणाऱ्या, घाणेरड्या सवयी असणाऱ्या मुलांच्यामध्ये मिसळणे, हिंडणे, फिरणे यापासून दूर ठेवा. गल्लीमध्ये खेळणाऱ्या मुलांच्या घाणेरड्या खेळापासून आणि तेथील खालच्या स्तराच्या वातावरणापासून वाचवा. त्यांच्यासाठी आपल्या घरातच खेळण्यासाठी साधने उपलब्ध करा. मुलाला इजा होणार नाही आणि कोणत्याही प्रकारची वाईट गोष्ट घडणार नाही अशी सर्व कामे घरामध्ये करु द्या.

आमच्या या शाळेमधील अभ्यास हा एक नवीन प्रकारचा अभ्यास आहे. कदाचित इथले मूल लवकर लवकर अंक मोजणार नाही, कदाचित लवकर लवकर बाराखडी शिकणार नाही. पण ते खेळता खेळता बाराखडी आणि अंक मोजणे जरुर शिकेल. शाळेमध्ये मूल काय शिकेल? हे विचारण्याची गरज आपणाला भासणार नाही. आपल्या मुलाची आवड कोणत्या गोष्टीत आहे? त्याची वृत्ती कशी आहे? त्याला काय करण्याची इच्छा आहे? त्याला कोणत्या साधनांची आवश्यकता आहे? या सर्व गोष्टींचा विचार करुन त्या त्याला उपलब्ध करुन द्या. आपले मूल शाळेमध्ये काय शिकते? हे आपण जाणू इच्छित असाल तर, आठवड्यातून एक दिवस इथे येवून स्वतः सगळे काही जाणून घ्या. आपले मूल संथ गतीने का होईना काहीतरी शिकते आहे. याचा आपणास विश्वास



वाटू लागेल.

## मुलांचे कपडे

आता सर्वप्रथम मी हे सांगेन की आपण आपल्या मुलाचे कपडे कसे बनवावेत? आज काल फॅशनचा जमाना आला आहे. आपण इंग्रजांची नक्कल करुन त्यांच्यासारखे कपडे घालू लागलो आहोत. पुरूष कोट, पॅन्ट, मोजे, बूट, नेकटाय इत्यादी वापरायला शिकला आहे. तर स्त्रिया फ्रॉक घालू लागल्या आहेत. या फॅशनच्या भोवऱ्यात अडकून आपल्या मुलींनाही फ्रॉक घालणे पसंत करतात. परंतु यामुळे आपले खूप नुकसान होते. आपल्या देशाच्या वातावरणानुसार हे कपडे अनुकूल नाहीत. आपला देश जास्त तापमानाचा आहे. आपण उन्हाळयाच्या काळात इतके कपडे घालतो की त्यामुळे आपल्या शरीराची उष्णता वाढून आपणाला घाम येवू लागतो. परदेशात तर बारा महिने एवढी कडाक्याची थंडी असते की तेथील लोक एकावर एक असे चार चार कपडे घालून आपले शरीर गरम ठेवू शकत नाहीत. म्हणून जसा देश आहे तसा वेश असला पाहिजे.

जेव्हा आम्ही आपल्या मुलीला फ्रॉक घालतो त्यामध्ये एक मोठी अडचण निर्माण होते की तो फ्रॉक ती मुलगी आपल्या हाताने घालू शकत नाही आणि काढू शकत नाही. कारण फ्रॉकची बटने पाठीमागच्या बाजुला लावलेली असतात. म्हणून जेव्हा मुलीला फ्रॉक घालायचा असतो तेव्हा तिला इतरांच्या मदतीची गरज असते. अशा स्थितीमध्ये आपण कामामध्ये असतो. जर त्याचवेळी मुलीला फ्रॉक घालायचा असेल तर त्याच्यासाठी ती आपल्याला वैताग आणू लागते. जर आपल्यासारख्या शहाण्या लोकांनी कोणी असे कपडे स्वतःला घालायला सांगितले तर दुसऱ्याची मदत घ्यावी लागते म्हणून आपण असे कपडे नाकारतो. कारण आपण मोठी माणसे समजूतदार असतो आणि आपण 'होय' किंवा 'नाही' असे म्हणू शकतो. म्हणून कोणी आपणाला असे कपडे घालतही नाही. परंतु बिचारे मूल लहान असते, नादान असते, ते होय किंवा नाही म्हणून आपली आवड स्पष्ट करु शकत नाही. यासाठी कपड्यासाठी मुलाला परस्वाधीन रहावे लागते. जेव्हा आपण एखाद्या कामात गुंतलेले असता आणि त्याचवेळी आपल्या मुलीने आपणाला फ्रॉक घालायची मागणी केली तर आपण लगेच तिला झिडकारता. परंतु आपल्या मुलीने स्वतःच्या हाताने फ्रॉक कसा घालावा? याचा विचार आपण करत नाही.यासर्व पापाचे कारण म्हणजे चुकीचे कपडे हे होय. यासाठी मुलींना समोरच्या बाजूला

बटने असणारी चोळी किंवा पोलके आणि मुलाला साधा सदरा घालावा लागेल.

याशिवाय फ्रॉकला खिसा नसतो त्यामुळे जेव्हा कोणी त्या मुलीला एखादी चिठ्ठी जरी दिली तरी ती सांभाळून ठेवण्याचे काम करणे जड जाते. शिवाय मुलीजवळ एखादा रुमाल सुद्धा असतो. परंतु तो सांभाळून ठेवण्याचा प्रश्न वारंवार उभा राहतो. कोठे तरी रुमाल किंवा चिठ्ठी हरवेल या भीतीने ती कोणतेच काम करु शकत नाही. ती कोणत्याही वस्तूचा किंवा खेळण्याचा उपयोग करु शकत नाही. रुमाल कोठेतरी पडून हरवू नये या भीतीने ती तो सतत आपल्या हातात ठेवते. यामुळे तिचे हात बांधले जातात. हा सर्व वाईट परिणाम फ्रॉकचा आहे. म्हणून आपण आपल्या मुलीचा असा एखादा झगा किंवा कुडता अंगावर घाला की ती अशा वस्तू समोरच्या खिशात ठेवू शकेल.

दुसरे असे की आपल्याकडे मुली बहुधा घाघरा वापरतात. परंतु त्यामुळे लहान मुलींना सहज आणि स्वतंत्रपणे हिंडणे फिरणे अवघड जाते. घाघऱ्याला जमिनीवर लोळणारी झालर लावलेली असते. ती हिंडता फिरता मुलींच्या पायात अडकते आणि मुली पुन्हा पुन्हा पडतात. जेव्हा त्या पाणी भरायला जातात तेव्हा झालर असणारा घाघरा पाण्यात भिजतो आणि त्यामुळे हिंडण्या फिरण्यात त्यांना अडचण येते. अशा घाघऱ्यामुळे मुली मुलांच्याप्रमाणे स्वतंत्रपणे हिंडू फिरू शकत नाहीत. आम्ही मुलगा आणि मुलगी यांना समान लेखले पाहिजे. दोघांनाही एकाच प्रकारे स्वातंत्र्य आणि सोयी दिल्या पाहिजेत. यासाठी दहा वर्षांच्या मुलीपर्यंत त्यांना पायजमा किंवा चड्डी घालण्यात कोणतीच अडचण नसावी. अशी चड्डी घालून मुली मोकळया अंगाने हिंडतील व फिरतील.

डॉक्टरांचे म्हणणे आहे की, मुलांना तंग कपडे घालण्याने त्यांच्या शरीराचा विकास योग्य रीतीने होत नाही. म्हणून मुलांचे कपडे शक्य असेल तेवढे सैल परंतु जमिनीला न लागणारे असावेत. जेव्हा मुली जमिनीला घासणारा घाघरा घालतात तेव्हा त्यांना पायात भरपूर अंतर घेवून चालता न येण्याने त्या पडतात. म्हणून आपण आपल्या मुलींना पायजमा अथवा चड्डी वापरायला द्या.

मुलांच्या डोक्यावर टोपी किंवा टोप असण्याची आवश्यकता नाही. त्यांच्यासाठी हे सगळे ओझे आहे. म्हणून शहाण्या आणि समजूतदार लोकांनी याचा वापर बंद करावा. याप्रमाणे मुलांच्यासाठी बूट किंवा मोजे आवश्यक नाहीत. असे समजा की आपण एक बी पेरले आहे. जेव्हा ते बी एक छोटे रोप



बनून जमिनीच्या आतून बाहेर येते, अगदी त्याचवेळी सर्व बाजूंनी आणि त्याच्यावर एक मजबूत आच्छादन घातले तर ते रोप अजिबात वाढणार नाही. याच प्रमाणे बूट आणि मोज्यामुळे मुलाच्या पायाचा अपेक्षित विकास होत नाही. उलट बूट, चपला घालण्याने मुलाचे पाय नाजुक आणि कमजोर बनतात आणि त्याला मोकळे पणाने हिंडता फिरता येत नाही. काटा किंवा खडा त्याच्या पायात रुतेल अशी आपणाला सतत भीती असते. पायतर आपल्या शरीराचे वजन सहन करतात. शरीराला सांभाळणे, शरीराची सेवा करणे, शरीराचे वजन पेलणे ही कामे पायच करतात. परंतु आपण पायात वहाणा घालून त्यांना नाजुक आणि कमजोर बनवतो म्हणून शरीरात पायांची काळजी वारंवार घ्यावी लागते. एखादा काटा पायात रुतु नये, पायाला कुठे चटका बसू नये, पायला कोठे ठेच लागू नये यासाठी आपल्या पायाने नेहमी काळजी घ्यावी लागते. म्हणून मुलांसाठी वहाणा वापरण्याची सवय गरजेची नाही.

मुलांना कपडे घालणे हे बहुधा पसंत नसते. हे आपण अनुभवाने ओळखले असेलच, ते कपडे घालायला घाबरतात आणि त्यांना आपण कपडे घालताना ते उखडतात. कारण परमेश्वरानेच त्यांच्यासाठी कपडे आवश्यक मानलेले नाहीत. जोपर्यंत मूल ईश्वराजवळ असते किंवा ते जोपर्यंत जगरहाटीला अजाण असते तो पर्यंत त्याला कपड्याशिवाय राहणे, मोकळया हवेत फिरणे, ऊन सहन करणे चांगले वाटते. मोकळे राहून ईश्वराने बनवलेल्या निसर्गाचा भरपूर उपयोग करुन घेणे हा मुलांचा शरीर धर्म आहे. जर आपण त्यांच्या या शरीराला कपड्याने झाकले किंवा वहाणांनी मढवले तर त्याचा विकास नीट होत नाही म्हणून मूल सहा-सात वर्षांचे होईपर्यंत त्याला कपडे घालणे आवश्यक नाही.

आमच्या शाळेत आल्यावर कित्येक मुले आपला पायजमा काढून ठेवतात. त्याला पायजम्याची गरज नाही म्हणून ते पायजमा काढून ठेवतात. म्हणून आम्ही त्यांना जबरदस्तीने पायजमा घालण्याचा प्रयत्न करत नाही. आम्ही तो पायजमा एका बाजूला सांभाळून ठेवतो. मूल आपल्या उघडेपणाची कोणतीही लाज बाळगत नाही. परंतु आमच्याच मनात लाज वाटते म्हणून आपण मुलाला कपडे घालण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे मूल बालपणापासूनच लाजू लागते. पण त्याने लहान वयात लाज बाळगणे आवश्यक नाही. मूल स्वभावाने निर्दोष असते तसेच ते दीर्घ काळापर्यंत, मोठ्या वयापर्यंत निर्दोषच राहावे हे आपण पाहिले पाहिजे. त्याचे असे

निर्दोष आणि निःसंकोच राहाणे जेवढा काळ असेल तितका दीर्घकाळ त्याचे आरोग्य वाढून वयही वाढेल. म्हणून ही निर्दोष स्थिती बराच काळ रहावी म्हणून त्याला बालपणी कपड्याची गरज नाही.

मुलांच्या कपड्याबद्दल मला अजून एक गोष्ट सांगायची आहे. मुलाचे कपडे भारी नसावेत. भारी कपडे वापरण्याने कोणताही फायदा होत नाही. मुलाला कपड्याची किंमत कळत नाही. कपड्याच्या किंमतीचा त्याचा विचार नसतो. कपडा महाग असला तरी तो त्याच्या नजरेत एक कपडाच आहे. महाग कपड्यांची काळजी घेणे त्याच्यासाठी सोपे नाही परंतु जेव्हा आपण मुलाला महाग कपडे घालता तेव्हा ते कपडे घाण करु नयेत अशी आपली इच्छा असते. म्हणून महाग कपडे घातल्यावर मुलाने एकाच जागेवर बसून राहावे असे आपणास वाटते. पण असे कपडे घालून एकाच ठिकाणी बसून राहाणे मुलाला शक्य होत नाही. मग ते मूल आपणाला त्रास देवू लागते. तसेच ते मनातून अस्वस्थ होते. म्हणून मुलाला अगदी साधे, स्वच्छ पण हवामानानुसार योग्य कपडे घालावेत. उन्हाळयाच्या दिवसात मोठ्या कपड्यांची गरज नसते. मलमली सारखे मऊ तसेच शक्य तेवढे साधे आणि स्वच्छ कपडे त्याला चालू शकतात. महाग चोळी किंवा ओढणी वारंवार धुतली जात नाही. म्हणून ती मळाली तरी वापरावी लागते. असे मळणारे कपडे महाग नसावेत. शिवाय मळलेले कपडे सुंदर वाटत नाहीत. तेलाचे डाग पडलेली ओढणी जरी ती महाग आणि रेशमाची असली तरी, मळामुळे मुलींना डोकेदुखी निर्माण करते. त्यामुळे त्यांचे स्वास्थ्य बिघडवते.

इतर लोकांना आपले मूल सुंदर दिसावे म्हणून काही स्त्रिया आपल्या मुलांना महाग तसेच गरजेपेक्षा जास्त कपडे घालतात. दुसऱ्याला सुंदर दिसावे म्हणून आपल्या मुलांना महाग आणि अनावश्यक कपडे घालू नका. मुलांना योग्य वाटणारे, मुलांना आवडणारे तसेच हवामानानुसार योग्य असेच कपडे मुलांना वापरु द्या.

## मुलांची स्वच्छता

मुलांच्या स्वच्छतेबद्दल सुद्धा मला काही गोष्टी सांगायच्या आहेत. सध्या आपला देश दांभिक बनला आहे. जेव्हा आपण आपल्या परिचितामध्ये जेवायला जातो, एखाद्या मैत्रिणीला भेटायला जातो, शाळा बघायला येतो, सभेमध्ये भाषण ऐकायला जातो त्यावेळी आपण खूप नटून थटून जात असतो. ही आपली सवय



आपल्या पर्यंत मर्यादित ठेवावी. त्याचा इतरांशी काहीही संबंध नाही. परंतु स्वच्छतेचा प्रश्न कायम आणि प्रत्येक वेळेला असतो. ईश्वराने आपणाला दिलेले शरीर आपण सतत स्वच्छ व व्यवस्थित ठेवले नाही तर आपण ईश्वराच्या नजरेत गुन्हेगार असतो. मुलाला सतत स्वच्छ व नीटनेटके ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. त्यात आपलाही स्वार्थ आहे. आपण मुलाला स्वच्छ आणि नीटनेटके ठेवले नाहीतर ते आजारी पडेल. त्याला स्वच्छ ठेवण्याने ते निरोगी राहील. यामध्ये आपला स्वार्थ लपला आहे हे आपणास सांगण्याची गरज नाही. आपण कशाप्रकारे मुलांची स्वच्छता ठेवावी याबद्दल मी आपणाला सांगणार आहे.

बऱ्याच दिवसापासून डोक्यावरील न धुतलेल्या केसांना तेल लावून भांग पाडला आणि त्यांना थोडेसे नीटनेटके केले याचा अर्थ त्यांची स्वच्छता केली असा होत नाही. नखामध्ये मळ भरलेला आहे आणि साबण लावून हात धुतले आहेत. कानामध्ये मळ आहे, डोळयामध्ये चिपडे आहेत. नाकात घाण आहे आणि साबणाने तोंड धुवून पावडर चोपडण्याने स्वच्छता होत नाही. आपण लक्षपूर्वक पाहिले तर आपल्या असे लक्षात येईल की बऱ्याच मुलामध्ये अशा प्रकारची अस्वच्छता दिसते. कानामध्ये मळ भरलेला असेल तर कान वाहू लागतात आणि बहिरेपणा येतो. आजकाल अशी अनेक मुले दिसतात की ज्यांच्या कानामधून 'पू' वाहतो आहे. डोळयामध्ये चिपडे असतात. त्यावर चिलटे बसतात. यासाठी मुलांचे डोळे, नाक, कान, नखे, तोंड, दात इत्यादी रोजच चांगल्याप्रकारे पाहून स्वच्छ करावेत. अन्यथा आपण मुलाचे तोंड बाहेरुन धुतलेले असेल तर आत मात्र खूप घाण साठलेली असेल. यासाठी आपण मुलाच्या प्रत्येक अवयवाला, त्याच्या शरीराच्या प्रत्येक भागाला चांगल्या प्रकारे स्वच्छ करा. यामुळे मुलाचे प्रकृती स्वास्थ्य सुधारेल. याप्रमाणे मुलाला स्वच्छ आणि नीटनेटका राहण्याच्या सवयीचा बनवणे आवश्यक आहे. आपण आपल्या घरात एखादा आरसा ठेवून मुलांना त्यांचे डोळे, कान, नाक, दात इत्यादी मध्ये असणारी घाण दाखवा.

जेव्हा जेव्हा आणि जिथे जिथे त्यांना घाण दिसेल तेव्हा आणि तिथे ती घाण लगेच दूर करुन स्वच्छ राहण्याची सवय त्यांना लागेल. आमच्या शाळेमध्ये आम्ही आरसा, फणी, कंगवा, पाण्याची टाकी मुलांना स्वतःला उपयोग करता येईल अशा पद्धतीने ठेवतो. मुले यासर्व गोष्टींचा उपयोग स्वतः आनंदाने करतात व स्वच्छ आणि नीटनेटके राहतात. जर कधी आपण आमच्या शाळेत आला

असाल तर आपण ही सर्व व्यवस्था आपल्या डोळयाने पाहिली असेल.

आपण असे मानले आहे की मुले म्हटले की, ती शेमडी-मेकडी असणारच. त्यांचे कपडे तर मळलेले आणि घाण असणारच. त्यांचे गुदद्वार दुर्गंधीयुक्त आणि मैलामय असणार. त्यांना आपले दात स्वच्छ करण्याची गरज काय आहे? स्नान म्हणजे काय हे त्यांना कसे समजणार? त्यांचे केस विंचरणे, त्यांना स्नान घालणे, त्यांच्या कपाळावर टिळा लावणे ही सर्व कामे आम्ही आठवड्यामध्ये आपल्या सवडीने चांगली वेळ पाहून करतो. जर खरेच असे होत असेल तर हा एक सर्वात मोठा गुन्हा आहे. आपण दररोज घरातील भांडी घासतो, आपले घर दररोज झाडतो, घरातील वस्तूवर, टेबल खुर्चीवर साठलेली धूळ झटकतो, आपली पाण्याची भांडी दररोज आतून आणि बाहेरुन स्वच्छ करतो. अशी सर्व कामे आपण दररोज करतो. पण आपल्या मुलांना मात्र घाणेरड्या अवस्थेतच ठेवतो. त्यांची चिंता काय म्हणून करायची? आपण आपल्या घरातील सामान स्वच्छ ठेवतो आणि आपल्या मुलाला घाणेरडा बनवून ठेवतो. हे कधी आपल्या मनाला खटकत नाही का? जेव्हा आपण आपल्या घरातील निर्जीव वस्तूंना स्वच्छ आणि नीटनेटके ठेवता तेव्हा आपल्या घरातील चालती बोलती वस्तू घाणेरडी आणि मळालेली का राहते? घरातील साहित्य सजवलेले ठेवायचे आणि मुलांना मात्र अस्वच्छ ठेवायचे यामध्ये आपणाला काय कौतुक वाटते? जी मुले आमच्या शाळेत आपल्या शरीरावर मळाचा थर घेवून येतात, त्यांची नखे वाढलेली असतात, ज्यांच्या डोक्यावरील केस विस्कटलेले असतात, ज्यांच्या डोळयात चिपडे असतात, कानामध्ये मळ आणि नाकात मेकूड असतो त्यांना पाहून आम्ही त्यांच्या आईवडिलांची लायकी ओळखतो. काही स्त्रिया आपल्या घरातून नटून थटून येतात पण त्यांचा पदर पकडून मागे मागे येणारी मुले घाणेरडी असतात. अशा स्त्रियाकडे पाहून त्यांच्याबद्दल लोकांना काय वाटत असेल?

मुले स्वभावाने उंडगी असतात, ती धूळ आणि मातीबरोबर खेळतात, ती आपले हातपाय आणि कपडे घाण ठेवतात ही त्यांची सवय आहे. म्हणून आपण त्यांना अस्वच्छ ठेवत असाल. पण आपण त्यांना एकदा स्वच्छ आणि नीटनेटके राहण्याची शिकवण दिली, त्यांना नीटनेटके राहण्याची सवय लावली तर मुले कायम स्वच्छ आणि नीटनेटके राहतील हे आपल्या लक्षात येईल. आपण खाली दिलेल्या गोष्टी लक्षपूर्वक पाळाव्यात. आपण मुलांच्या गरजा स्वतः ओळखा.



मूल जेव्हा काही खायला बसेल तेव्हा त्याचे हात स्वच्छ धुतलेले आहेत की नाहीत ते नीट पहा. हाताचा उपयोग प्रत्येक वस्तू उचलण्यासाठी होतो आणि जेव्हा हात वेगवेगळया वस्तूंना स्पर्श करतो तेव्हा हातावर त्या वस्तूची धूळ चढते. जर मुलांना अशा अस्वच्छ हाताने जेवण करण्याची सवय लागली तर काही काळानंतर अस्वच्छतेमुळे त्याचे रक्त सुद्धा खराब होवू शकते. यासाठी मुलाने आपले हात जेवणापूर्वी स्वच्छ धुतलेले असतील तरच त्याला जेवायला बसू द्या.

मुलांच्या कानांची तपासणी आपण नेहमी करत रहा. त्यांचे कान स्वच्छ ठेवा. दोन-चार दिवसांच्या अंतराने त्यांच्या कानात तेलाचे थेंब टाका. आपल्या आणि आपल्या मुलांच्या डोक्याचे केस फार वाढू देवू नका. जर केस वाढलेले असतील तर ते दर आठवड्याला चांगल्या प्रकारे धुवून त्यातील घाण स्वच्छ करत राहा. मुलांच्या डोळयाचीही तपासणी वरचेवर करा. त्यांच्या डोळयांच्या पापणीवर चिपडे साठू देवू नका. लहान वयातच मुलीचे नाक टोचू नका. नाक टोचल्यावर नाकात घातल्या जाणाऱ्या मोरणीमुळे नाक चांगले स्वच्छ करता व ठेवता येत नाही. जर नाक टोचले तर त्यामध्ये फक्त दोरा घाला. मोरणी किंवा नथ घालू नका. मोरणी किंवा नथ घालण्याने मुलींना खूप दुःख होते. त्या खूप त्रासून जातात. त्यांच्या नाकात घाण साठते आणि प्रयत्न करुनही ती निघत नाही. मी हे सगळे माझ्या डोळयांनी पाहिलेले आहे.

मुलांच्या नखामध्येसुद्धा मळ आणि माती भरलेली असते. त्यासाठी दर आठवड्याला त्यांची वाढलेली नखे कापावीत. नाहीतर जेवण करताना वरण आणि दुधासारख्या पातळ पदार्थामध्ये नखात भरलेला मळ मिसळून त्यांच्या पोटात जातो. नखामधून काढलेल्या मळाची वडी आपल्या ताटलीमध्ये, वाटीमध्ये आपणाला ती खायला आवडेल का? मला विश्वास वाटतो की आपल्या मुलांना आपण नक्की असे काही खावू देणार नाही. म्हणून मी अशी आशा कारतो की आपण आपल्या मुलांची वाढलेली नखे न चुकता पुन्हा पुन्हा कापत असाल.

## मुलांना मारु नका

मला आपणाला एक महत्त्वाची गोष्टसांगायची आहे. आपण आपल्या मुलांना कधीही मारु नका. आपण म्हणाल की मारल्याशिवाय काम कसे चालेल? जी मुले वारंवार डोके खातात, हैराण करतात, वैताग आणतात, दंगामस्ती करतात त्यांना मारावे नाहीतर काय करावे? परंतु मी आपणाला असे म्हणतो की आपण

एकदा आमच्या शाळेत येवून पहा. आम्ही मुलांना मारत नाही. आमच्या शाळेत जवळ जवळ पन्नास मुले आणि मुली आहेत. हे सर्व जण आम्ही सांगितलेले ऐकतात. ही मुले आम्हाला कधी विसरत नाहीत. ती मुले त्यांच्या घरी गेले तरी तेथे त्यांना आमची आठवण येते. यासाठी आमच्या कडे कोणती जादू नाही. कोणता मंत्र नाही. याचे कारण एकच आहे की - आम्ही त्यांना मारत नाही.

मूल तर ईश्वराच्या घरून आमच्याघरी येणारा छोटा देव असतो. आपण संतती प्राप्तीसाठी दगडाला देव मानून त्याची पूजा करतो. मूल तर आपल्या घराचा दागिना असते. मूल हा धन दौलतीचा अनमोल खजिना आहे. मुले देशाचे दागिने आहेत. काय आपण आपल्या अशा महाग आणि मूल्यवान मुलांना मारणे पसंत कराल? ईश्वराने प्रेमाने दिलेल्या आपल्या मुलांना मारताना आपल्या मनामध्ये एखादी भीती असली पाहिजे. आपण मारहाणीने एखाद्या लेकराला मुकणार तर नाही ना? प्रथम संतती प्राप्तीसाठी आपण मोठमोठे नवस करतो, पण जेव्हा ईश्वराने पाठवलेले मूल आपल्या कुशीत येते तेव्हा आपण मागच्या सर्व गोष्टी विसरतो आणि आपल्या मुलाला न विसरता मारहाण करतो.

माझ्या मते आपल्या मनामध्ये मुलांना मारण्याबद्दल तसा उत्साह नसेलच. मुलांना मारण्याने पुण्य लाभते. असे कोणत्याही शास्त्रात आणि कोठेही लिहिलेले नाही. पुण्यप्राप्तीसाठी आपण आपल्या मुलांना मारत नाही. खरेतर आपण आपल्या मुलाला नव्हे तर त्याच्या खोड्यांना वैतागलेले असता. त्याचवेळी आपण तावात येवून मुलांना मारता. काही लोक दुसऱ्यावरील राग काढण्यासाठी आपल्या मुलांना मारतात. आपला राग शांत करुन घेतात. काही स्त्रिया आळसामुळे आपले शरीर काम करु शकत नाही, या लाचारीमधून आपल्या मुलांना मारपीट करतात. काही स्त्रिया आपल्या स्वभावाच्या कडकपणामुळे मुलांना मारतात. काही आपल्या मौजमजेसाठी किंवा आपल्या कमजोरीसाठी मुलांना मारतात. मुले वारंवार काहीतरी मागत असतात आणि ती आपणाला वैताग देत असतात. आपण आपल्या आळसामुळे मुलांनी मागितलेली वस्तू त्यांना चटकन देवू शकत नाही. मुलाला जेवण करण्याची इच्छा असते. खेळण्याची इच्छा असते. पाणी पिण्याची इच्छा असते. अशा प्रकारच्या कित्येक वस्तू मूल आपल्या आईला वारंवार मागते. आईला हे सर्व चांगले वाटत नाही. हतबल होवून आई मुलाने मागितलेल्या वस्तू देते. अशा परिस्थितीत तावात येवून आई मुलांना मारते.



अशा प्रकारे मुलांना मारहाण करण्याची मोठी चूक सर्व लोक करतात. मुलाला हट्टी मानून, जेव्हा ते अभ्यास करत नाही, एखादी वस्तू ते वारंवार मागते तेव्हा आपण रागात येवून त्यांना मारतो. मूल स्वतःच्या इच्छेने आणि आवडीने एखादे काम करु इच्छिते याचा आपण विचार करत नाही. मुलाचा स्वतःचा जीव आहे. त्याला काही इच्छा असतात. याचा आपण विचार करावा. अशी मुले मारहाण करण्याने कधी सुधारत नसतात. आमच्या शाळेत येणाऱ्या मुलांना जेव्हा आम्ही विचारतो, 'तुझी आई तुला मारते का?' त्यावेळी आमचा प्रश्न ऐकताच मूल मुसमुसून रडू लागते. त्यापैकी काही मुले आम्हाला म्हणतात की, 'आपण ही गोष्ट माझ्या आईला सांगू नका. नाहीतर ती मला पुन्हा जास्त मारेल.' मोठेपणी अशी मुले विशेषतः लग्नानंतर आईवडिलांपासून वेगळी राहतात. त्यांच्या मनात आपल्या आईवडिलांबद्दल अजिबात प्रेम नसते. प्रेम राहीलच कसे? अशी स्थिती आपल्या कुटुंबामध्ये दिसण्याचे कारण एकच आणि हेच आहे. म्हणून कोणतेही कारण असो, आपल्या मुलाने केलेली कोणतीही चूक आपल्यासमोर आलेली असो, लाख रुपयांचे नुकसान झालेले असो, आपण आपल्या मुलांना कधीही मारु नका.

मारण्याचे काम खाटकाचे आहे. मारण्याने ईश्वर आपलेही हातपाय तोडून टाकेल. मूल हे गरीब आणि दुर्बळ असते. त्याच्याजवळ शक्ती नसते. बुद्धी आणि समज नसते. आपण त्याला मारले तर, आपला मार सहन करुन हुंदके देणारे मूल शेवटी आपल्याच कुशीत येवून बसते. ते बिचारे कोठे जाईल? माझ्या मते मुलाला मारल्यानंतर आपणालाही पश्चात्ताप होत असावा. आपण आपले मूल ईश्वराकडून मागून घेतले आहे नं? मूल हे आपण मागितलेले वैभव आहे. त्याची प्राप्ती आपल्याला ईश्वराकडून झाली आहे. म्हणून कोणत्याही परिस्थितीत आपण मुलांना मारु नका. मारण्यामुळे मूल सुधारण्याऐवजी बिघडेल. ज्या मुलांना मार खाण्याची सवय लागते ती मुले खूप गरीब बनतात. किरकोळ गोष्टीवर रडतात व ओरडतात. मुले आपले धाडस हरवून बसतात. आपल्या मारक्या आईची आठवण येताच ते घाबरतात, जणू काही एखाद्या राक्षसाच्या आठवणीने ती कापत आहेत.

आपण आपल्या मोठ्या आणि वयस्कर माणसांकडून ऐकतो तसेच पुस्तकातूनही वाचतो की, आईच्या प्रेमासारखे दुसरे प्रेम नाही. मग आम्ही आपणाला मुलांना मारताना पाहिले तर? आपल्याबद्दल आमच्या मनात आदराची भावना

निर्माण होईल का?

सर्व जग जाणते की, कमजोर मनुष्य आपल्या बायकोपुढे वाघ बनतो. जो जेवढा कमजोर असेल, तो तेवढा अधिक रागीट असतो. याच प्रकारे आपल्यामध्येही राग भरलेला असतो. असा रागही आपली कमजोरी असते. प्रसंगाने एखाद्यावेळी घरात एखादी वस्तू फुटली, चुलीवर ठेवलेली खिचडी करपली किंवा घरातील एखादी वस्तू हरवली आणि ती लवकर मिळत नसेल. अशा परिस्थितीत आपल्यासमोर आपल्या मुलाने हट्ट धरला तर त्याला निश्चितच मारहाण होते. परंतु मला असे वाटते की आपण अशा कमजोरी आणि बेजबाबदारपणासाठी आपल्या मुलाला विनाकारण मारता. जर आपण आपल्या मुलाला असे वारंवार मारत राहिलात, तर तो मोठा झाल्यावर आणि स्वतः आई किंवा बाप बनल्यावर आपल्या मुलांना मारु लागेल. अशा पद्धतीने या जगात मुलांना मारत राहण्याची वाईट परंपरा चालत राहील. याचे सारे पाप आपणाला लागेल. मुलाला एकदा मारण्याने आपण पाच पंचवीस वेळेला केलेल्या एकादशीचे पुण्य नष्ट होईल.

मारहाण करण्याने हिंसा होते. मारल्यावर मूल मुसमुसून रडू लागते. मुलाच्या या मुसमुसून रडण्यात संपूर्ण घराला जाळण्याची शक्ती असते म्हणून मुलाच्या मनाला कधीही दुःख देवू नका. मुलाने दिलेला शाप भयंकर असतो. मला एक शास्त्र सापडले आहे. त्या शास्त्रात असे म्हटले आहे की, ज्यांना पुत्र प्राप्तीची इच्छा असते त्यांनी आपल्या मुलांना कधीही मारु नये. ज्या स्त्रीला स्वतःसाठी अखंड सौभाग्य आणि सुख पाहिजे असेल अशा स्त्रीने मुलांना मारु नये. दान करणे, तप करणे, उपवास करणे, व्रत करणे, तीर्थ यात्रा करणे यामुळे पुत्र प्राप्ती होते. हे आपणास माहीत आहे. त्यामुळे जेव्हा केव्हा राग येण्याने आपल्या मुलाला मारण्याची आपली इच्छा तीव्र होईल तेव्हा आपण त्या इच्छेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तप करा. आपल्या तपाचा महिमा खूप मोठा आहे. आपला राग आवरण्यासाठी आपण केलेल्या तपाच्या या प्रभावाने आपणाला आपला मुलगा, मुलगी आणि पतीचे अखंड सुख, सौभाग्य, धन, वैभव हे सहज प्राप्त होईल. म्हणून आपण आपल्या घरात आलेल्या या छोट्या छोट्या देवांचे मन कधीही दुखवू नये.

आपण मला विचाराल की माझी स्वतःची सुद्धा मुले आहेत ना? त्यांच्याबरोबर मी घरात कसा वागत असेन? याबद्दल मला असे सांगता येईल की



माझ्या घरात मुलांना मारहाण अजिबात होत नाही. मी आपल्या मुलांना कधीच मारत नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत घरातील कोणत्याही व्यक्तीने मुलांना मारु नये. अशी ताकीद मी दिलेली आहे. तसेच माझ्या घरातील सर्व लोक या सूचनांचे पालन करतात. एक अशी वेळ होती की मला राग येत होता. मी पण आमच्या मुलावर हात उगारत होतो. पण हे सर्व थांबवण्यासाठी मला मोठी कठीण तपस्या करावी लागली आहे. आपण सुद्धा आजपासूनच आपणाला कधीही राग येणार नाही असे व्रत घ्या. तसेच मुलाला मारले तर उपवास करेन असा निश्चय करा. असे करण्याने राग येणे आणि मुलांना मारणे याच्या आपल्या सवयी सुटतील. नंतर आपल्या मुलांना मारण्याचा विचार मरुन जाईल.

✻✻✻

✻ ✻ ✻ ✻
✻ ✻ ✻ ✻

# ८. श्रीमंतांना.........

हा लेख मी विशेष करुन श्रीमंत लोकांसाठी लिहितो आहे. पण मध्यम वर्गीय अथवा गरीब लोक याचा फायदा घेवू शकणार नाहीत असे नाही. या लेखामध्ये लिहिलेल्या सर्व सूचनांचा अंमल श्रीमंत लोक करु शकतील म्हणून त्यांना विचारात घेवून हा लेख लिहिला आहे.

आपल्या मुलांसाठी आया, नोकर, शिक्षक देखरेखीसाठी ठेवला म्हणजे आपण आपले सर्व कर्तव्य पाळले असा समज भारतामध्ये श्रीमंत लोकात झालेला आहे. आया आणि नोकरांनाही असे वाटते की मालकाने ज्या मुलाला आपल्या ताब्यात दिले आहे त्या मुलाला मालकाच्या मोठ्या बंगल्यातील कपाटावर ठेवलली भारी आणि सुंदर खेळणी दाखवून कसे का होईना पण त्या मुलाला खूष ठेवावे. मुलांना मालकाच्या रीतिरिवाजानुसार तयार ठेवावे आणि त्याला आपल्या मालकापुढे एखाद्या सजवलेल्या पुतळयाप्रमाणे ठेवावे. एवढेच त्यांचे कर्तव्य असते.

आईवडील आपल्या काम धंद्यात किंवा ऐष आरामात डुबलेले असतात म्हणून ते आपल्या मुलांना आया आणि नोकरांच्या हाती सोपवतात, आया किंवा नोकराला मुलांच्या शिक्षणाचा कोणताही विचार नसतो. म्हणून त्यांच्या मनात उच्च विचार कधीही येत नाहीत.

अधिकाधिक आईवडील आणि नोकरचाकर दोघांनाही एकच गोष्ट समजते ती म्हणजे मूल जिवंत राहिले म्हणजे सपंले. सुदैवाने ते मूल ऐष आरामात वाढले म्हणजे फार चांगले. कोणतीही अडचण अथवा त्रास न देता मूल भारी कपड्यांनी आणि दागिन्यांनी सजवून पुतळयाप्रमाणे फिरवत राहिले म्हणजे संपले.

श्रीमंतांची मुले घरातील नोकरचाकरांच्यावर आपला राग काढणारी, आपल्या दुर्गुणांचे प्रदर्शन करणारी आणि जेव्हा आईवडिलांना सवड होईल तेव्हा थोडावेळ त्यांचे मनोरंजन करणारी तसेच खेळणे बनून राहणारी बनलेली आहेत. असे दिसते. मुलांच्या स्वभावाची, त्यांना सांभाळण्याची माहिती असणारी अशी माणसे घरात कमी असतात. मालकाच्या पोपटाची देखभाल करणाराला पोपटाच्या स्वभावाची आणि त्याच्या खाण्यापिण्याची जेवढी माहिती असते, मालकाच्या



बागेतील माळयाला रोपांची काळजी आणि राखण करण्याचे जेवढे ज्ञान असते तेवढे ज्ञान देखील कुटुंबातील मूलरुपी रोपांची काळजी घेणाऱ्या नोकराला नसते. मालक जेव्हा आपल्या दुकानावर एखाद्या नोकराला ठेवतो तेव्हा तो त्याची नोकर म्हणून काम करण्याची योग्यता पाहूनच ठेवतो. या प्रमाणे घरामध्ये स्वयंपाकी ठेवताना त्याला चांगला स्वयंपाक करता येतो की नाही हे पाहूनच मालकीण कामाला ठेवते. पण घरामध्ये जेव्हा मुलासाठी आया, नोकर ठेवताना तो मुलाचे कपडे आणि दागिन्यांच्या मोहाने मुलाला कोणतीही हानी पोहोचवणार नाही एवढेच पाहिले जाते. फारतर मुलाला एकटे सोडून इकडे तिकडे भटकायला जाणार नाही असे पाहिले जाते. आया किंवा नोकरामध्ये खरेतर एक गुण नक्की पाहिला पाहिजे. तो म्हणजे त्याच्याजवळ अशी कला पाहिजे की त्याने त्या मुलाला एक मोठा गुलाम बनविले पाहिजे काय? जो इतरांच्या मदतीने जगतो तो गुलाम नाही का? जो आपले काम आपल्या हाताने करण्याची शक्ती हरवून बसतो तो अपंग नव्हे का? श्रीमंतांच्या मुलांच्या जीवनाचा आधार नोकर असतात. जे नोकर त्या मुलांची हंजी हंजी करतात, जोपर्यंत नोकर मुलाच्या 'हो' ला 'हो' आणि 'ना' ला 'ना' करतो तो पर्यंत मूल त्या नोकराचे गुलाम बनते. मूल पराधीन बनते. जर मुलाला कोठे फिरायला जायचे असेल तर तो नोकराशिवाय जावू शकत नाही. नोकराच्या मदतीशिवाय मूल पाणी सुद्धा पिऊ शकत नाही. जर नोकर हजर नसेल तर ते मूल ना पाणी पिते ना फिरायला जाते. त्याला मनमारुन राहावे लागते. ही त्याची पराधीनता आहे. ही त्याची गुलामी आहे. ज्या मर्यादेपर्यंत एक माणूस दुसऱ्या माणसासाठी काम करतो त्या मर्यादेपर्यंत काम करणाऱ्याचा काम करवून घेणारा गुलाम बनतो. एक राजा - आपल्या राजपदाची शान राखण्यासाठी आपले मोजे आपल्या हाताने काढत नाही. आणि एक अपंग - ज्याच्यामध्ये आपले मोजे आपल्या हाताने काढण्याची शक्ती नसते. या दोघात कोणताही फरक नाही. एक मनाने पराधीन बनलेला आहे तर दुसरा शरीराने पराधीन आहे. एक मनाने अपंग आहे तर दुसरा हाताने अपंग आहे. याप्रमाणे ज्या मुलांची सर्व कामे नोकरचाकर करतात ती मुले मनाने, शरीराने अपंग आणि गुलाम बनतात.

आया आणि नोकरांच्या पराधीनतेपासून मुक्त झाल्यानंतर जी मुले शिकण्याच्या वयाची मानली जातात त्यांच्यावर दुसरी सत्ता सुरू होते. मुलांना पूर्णपणे गुलाम बनविण्यासाठी असलेले नवीन प्रकार आया आणि नोकरांच्या प्रकाराशी बरेच मिळते जुळते आहेत. या प्रकाराला मिळता जुळता प्रकार म्हणजे

मुलांना शिकवायला घरात शिक्षक ठेवणे. अलीकडे मुलांसाठी शिक्षक ठेवणे ही एक फॅशन बनली असून हा प्रकार प्रतिष्ठेचा बनला आहे. परंतु मुलांसाठी शिक्षक का ठेवावा? याचा विचार कोणी केला आहे काय? आपण मुलांसाठी शिक्षक ठेवू शकतो याच्यात आईवडील समाधान मानतात. मूल शिक्षकापासून हळूहळू काहीतरी शिकत आहे याचा ते आनंद मानतात. दुकानामध्ये मुनीम ठेवण्यात, घरात स्वयंपाकी ठेवण्यात आणि बागेसाठी माळी ठेवण्यात योग्यतेचा विचार करावाच लागतो. परंतु शिक्षक ठेवण्यामध्ये एखादा विचार करण्याची काय गरज आहे? शिक्षक म्हणजे स्वतः काहीतरी शिकलेला आणि शिकवणारा होय. याशिवाय जर तो एखाद्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत असेल तर जास्त चांगले. शिक्षकाची योग्यता याच्यातच आहे की त्याला शिक्षक म्हटले जाते, मुलाला आपल्याजवळ बोलावून तो बसवतो, स्वतः ज्याप्रमाणे शिकलेला असतो त्याच प्रमाणे तो मुलाला शिकवतो. याच्यापेक्षा जास्त योग्यतेची अपेक्षा त्याच्याकडून कोणती ठेवणार? तो मुलाला काय शिकवतो? काय शिकवत नाही? याची माहिती कोण घेतो? मुलाला बाराखडी आणि अंक मोजायला येतात म्हणजे भरपूर झाले. एवढेच सर्वजण मानतात. परंतु मुलाच्या विकासावर पाणी पडले आहे, मुलाच्या विकासाची शक्ती आणि उत्साह दाबला गेला आहे. मुलाचे व्यक्तिमत्त्व मरते आहे, मूल एक यंत्र बनले आहे, याचा विचार कोणी करत नाही. आज आपल्या देशातील मुलांची स्थिती अशीच आहे. यामधून सुटका करण्यासाठी आईवडिलांनी काय करायला पाहिजे याचा विचार आपण करणार आहोत. माझे हे विचार पुस्तकातील नाहीत. परंतु या विचारामागे माझा अनुभव आहे. हे विचार सूचनांच्या स्वरुपात आहेत. हे विचार मी तीन ते सहा वर्षे वय असणाऱ्या मुलांसाठी मांडले आहेत. जे शाळेच्या संदर्भात नाहीत पण घराच्या संदर्भात आहेत. ते पुढील प्रमाणे.

## (१)

माझी पहिली सूचना आहे की आपण आपल्या मुलांना नोकरांच्या गुलामगिरीतून मुक्त करा. म्हणजे मुलांसाठी नोकर ठेवू नका. परंतु गरजेनुसार मुलांच्या विकासासाठी किंवा विकासात मदत करण्यासाठी नोकर ठेवले जावू शकतात. शिवाय आईवडील स्वतः संपूर्ण दिवस मुलाला सांभाळू शकत नाहीत. म्हणून नोकर ठेवला जातो. परंतु नोकराने काय करावे आणि काय करु नये हे त्याला समजावून सांगितले पाहिजे. घरातील नोकर हा विद्वानच असला पाहिजे



असे नाही. परंतु आपणाला जी कामे करायची नाहीत ती त्याला माहीत असावीत. जी कामे नोकराने करावयाची नाहीत त्यांची एक यादी खाली देत आहे.

१) नोकराने मुलांना मारु नये.
२) नोकराने मुलांना भीती अथवा धाक दाखवू नये.
३) मुलांसमोर नोकराने शिव्या देवू नयेत व घाणेरड्या गोष्टी बोलू नयेत.
४) नोकराने मुलाला अपमानकारक शब्दात बोलावू नये.
५) नोकराने मुलाची खोटी आणि अमर्याद स्तुती करु नये.
६) जे काम मुलाला स्वतःला करावे वाटते त्या कामात नोकराने मदत करु नये. तसेच मुलाच्या कामात स्वतः अडथळा आणू नये.
७) मुलाला आपल्या नजरेसमोर खेळायला सोडल्यावर त्याच्या कोणत्याही खेळामध्ये नोकराने आडकाठी आणू नये.
८) गडबड आहे म्हणून किंवा मुलाला योग्य रीतीने काम करता येत नाही म्हणून, मोडतोड होईल म्हणून, मुलाचे कपडे आणि अंग घाण होईल म्हणून मुलाचे काम नोकराने करु नये.
९) श्रीमंतांची मुले अशीच खेळतात असे मानू नये. बहुधा ते खेळणी बरोबरच खेळतात. दगड मातीशी नव्हे. खेळताना मूल कोणतेही चुकीचे काम करत नाही किंवा असा कोणता खेळ खेळत नाही की ज्याच्यामुळे मुलाला इजा होईल. अशावेळी मुलांना त्यांचे मनपसंत खेळ खेळण्यापासून अडवू नका. नोकरानी याची खबरदारी घेतली पाहिजे.

## (२)

माझी दुसरी सूचना अशी आहे की आपण आपल्या मुलाला कोणत्याही शिक्षकाच्या हाती सोपवू नका. खरे पाहिले तर अगदी लहान मुलांना शिकवणी लावण्याची गरज नाही. तरीही शिकवणी लावण्याची इच्छा फारच असेल तर शिक्षणाच्या संदर्भात चांगल्या जाणकार अशाच शिक्षकाला ठेवावे. संबंधित शिक्षकात खालील गुण असावेत.

१) जे गुण नोकरासाठी आवश्यक आहेत ते सर्व गुण असावेत.
२) मुलाला जे काही शिकवायचे असेल ते जबरदस्तीने न शिकवता मुलाच्या कलानुसार शिकवणारा शिक्षक असावा.
३) शिक्षक स्वभावाने योग्य प्रमाणात धीर गंभीर असावा. तो खुषमस्करी करणारा नसावा.

४) आपले काम मालकाला खूष करण्याचे नसून मुलाला खूष करण्याचे आहे हा विचार त्याच्या मनात सतत असला पाहिले. आपल्यावर मुलाच्या विकासाची जबाबदारी सोपवली गेली आहे हे त्याने विसरु नये.

५) आपल्या अध्यापनाने मुलाला कोणताही फायदा होत नाही असे दिसले तर त्या शिक्षकाने ती नोकरी लगेच सोडावी.

सर्वसाधारणपणे वरील सर्व गुण असणारा शिक्षक अभावाने मिळतो. म्हणून मुलांना शिक्षकाशिवाय शिकू द्यावे. कोणतीही काळजी करण्याची गरज नाही. मूल कमी शिकेल असे वाटू देवू नका. कारण यामध्ये मुलाच्या विकासाचा नाश होणार नाही.

(३)

छोटे मूल स्वतःच आपल्या वयानुसार ज्ञान् प्राप्त करु शकेल यासाठी काही सुंदर आणि व्यावहारिक योजना आहेत. जर या योजनांचा वापर सावधानतेने केला गेला तर शिक्षक किंवा नोकराच्या मदतीशिवाय मूल खूप काही शिकू शकेल. तो इतका हुशार बनू शकतो की आपणालाच त्याचे आश्चर्य वाटेल.

या योजनापैकी मी एक योजना पुढे देत आहे. ही योजना अमलात आणली तर मूल आनंदी, स्वस्थ आणि स्वतंत्र राहू शकेल. त्याला आईवडील आणि नोकरांच्या पराधीनतेपासून सुटका मिळेल. मूल आपल्या इंद्रियांचा विकास स्वतःच करु शकते. ही योजना खालीलप्रमाणे आहे.

## मुलाची स्वतःची खोली

श्रीमंतांच्या बंगल्यातसुद्धा मुलांसाठी स्वतंत्र खोली ठेवली जात नाही. संपूर्ण बंगला आणि बंगल्यामध्ये ठेवलेल्या सर्व वस्तू अशा पद्धतीच्या असतात की त्याचा मुलांना काहीच उपयोग नसतो. मुलांच्या कामाची कोणतीच वस्तू नसते. घरातील सर्व वस्तू मोठ्या वयाच्या लोकांसाठी असतात. मुलांसाठी फक्त काही चांगली खेळणी असतात. त्यापैकी बरीच खेळणी कपाटामध्ये किंवा कपाटावर ठेवलेली असतात. जर कधी ती खेळणी मुलांसाठी खाली ठेवली तर त्याचा वापर इतका काळजीने करावा लागतो की मूल यापासून काहीच शिकू शकत नाही. अशा खेळणीपासून मुलांना कोणताच आनंद मिळत नसल्याने मुलांना ही खेळणी आवडत नाहीत. अशा खेळणींचा मुलांना उबग येतो व मुले ती खेळणी फेकून देतात किंवा या खेळणीच्या आत काय आहे हे जाणण्यासाठी मुले त्या खेळण्यांची तोडफोड करतात. आज बंगल्यात राहणाऱ्या मुलांची स्थिती अशीच आहे. म्हणून



मुलांना स्वतंत्र एकांत असणारी खोली मिळण्याची खरी गरच आहे. या खोलीतील सर्व वस्तू मुलाच्या वयाचा आणि गरजांचा विचार करुन ठेवाव्यात. मुलाच्या आपल्या स्वतंत्र खोलीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

१) खोली खूप मोठी किंवा खूप छोटी नसावी.

२) खोलीच्या भिंतींना निळा किंवा फिकट हिरवा रंग असावा.

३) मुलाला सहज हात लावता येईल अशा उंचीवर मोठ्या आकाराची चित्रे खोलीत लावावीत.

४) फरशीवर निळया आणि लाल रंगाच्या पट्ट्या असणारी सतरंजी अंथरावी.

५) खोलीमध्ये मूल स्वतः हलवू शकेल, इकडे तिकडे नेवू शकेल तसेच एखादा खण असणारे टेबल असावे. टेबलाचा पृष्ठभाग समतल असावा.

६) जेव्हा वाटेल तेव्हा मुलाला विश्रांती घेता यावी. यासाठी छोटा पलंग असावा. त्यावर स्वच्छ बेडसीट अंथरलेले असावे.

७) एका कोपऱ्यात हात-तोंड धुण्यासाठी पाण्याची सोय असावी. जवळच तोंड-हात पुसण्यासाठी छोटा टॉवेल असावा. भिंतीला एक आरसा व त्याच्याजवळ एक छोटा कंगवा असावा.

८) खिडकीवर फुले-रोप असणाऱ्या कुंड्या असाव्यात.

९) पाण्याचा एक टब असावा.

१०) झाडांना-रोपांना पाणी देण्यासाठी एक छोटी झारी असावी.

११) मुलाचे हात पोहोचू शकतील अशा उंचीवर भिंतीला खुंट्या असाव्यात.

१२) पाणी पिण्यासाठी छोटा डेरा किंवा घागर असावी. त्यावर छोटा व हलका पेला असावा.

## मुलाचे कपडे

१) जेवढे आवश्यक आहे तेवढ्या प्रमाणात मुलाचे कपडे सैल असावेत. त्यांची बटने पुढील बाजूला असावीत.

२) पायात बूट आणि मोजे असावेत.

३) डोक्यावर टोपी किंवा अन्य वस्तू नसावी.

४) घोट्यापर्यंतची चड्डी किंवा पायजमा तसेच कुडता असावा. बनियन आवश्यक नाही. सदऱ्याची बाही कोपरापर्यंत असावी.

## खोलीमधील साहित्य

१) एक पट्टा आणि त्यावर ओल्या मातीचा एक गोळा. जवळच हात धुण्यासाठी एक बादली आणि एक लहान भांडे मातीची खेळणी वाळविण्यासाठी एक पाट.

२) लहान लहान रुमाल, काही ब्रश, एक छोटी पेटी (कपड्याच्या घड्या घालून ठेवण्यासाठी)

३) रबराचा लहान आणि मोठा चेंडू व बॅट.

४) वेगवेगळया धातूंची आणि वेगवेगळया किंमतीची नाणी.

५) लोकर, सूत, रेशीम यांचे नमुने. तसेच यांचे प्रत्येकी दोन तुकडे.

६) काही गोटे

७) रंगीत चक्र

८) छोटा झाडू आणि छोटे सूप

९) भोवरा आणि दोरी

१०) दोन-चार काळया पट्ट्या आणि खडूची पेटी.

११) चित्रांचे अलबम. आपल्या देशातील जीवनाची ओळख करुन देणारी सुंदर आणि स्वच्छ चित्रे असावीत.

१२) सा-रे-ग-म असे स्वर निघू शकतील असे काचेचे पेले (दोन संच).

१३) लाकडाच्या घनाचे वीस तुकडे.

१४) एखादी हातोडी

१५) मॉन्टेसरी पद्धतीमध्ये उपयोगी पडणाऱ्या तीन पेट्या, रुंद आणि लांब, शिडी, मनोरा, रंगाची पेटी.

ही सर्व साधने असताना मुलाला जर मोकळे सोडले तर मूल आपल्या आवडीने खेळ सुरु करेल. त्यासाठी आपल्या पसंतीचे साधन घेईल. यामुळे मूल आपला विकास स्वतः करेल. गरजेनुसार एखाद्यावेळी मुलाला या साधनांचा उपयोग काय आहे? उपयोग कसा करायचा आहे? हे समजून सांगावे. नंतर मूल स्वतःच सर्व काही करेल. मुलाला ही साधने दिली तर तो स्वतंत्र बनेल, आनंदी बनेल. स्वस्थ बनेल आणि नोकर किंवा आयाच्या गुलामी पासून वाचेल. ते हट्ट करणे आणि भांडणे विसरेल. साहित्य चांगले असले पाहिजे. जी साधने मॉन्टेसरी पद्धतीने बनलेली आहेत त्यांचाच वापर करावा.

***



# ९. अपूर्ण मूल

सर्वसाधारणपणे कोणत्याही आदर्श शाळेमध्ये, जेथे समान धारणेची मुले असतात तेथे मुलामध्ये व्यवस्था ठेवणे किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. ज्यावेळी मुलांबरोबर शिक्षकांना पोलीस किंवा न्यायाधीशासारखे वागावे लागते तेव्हा ओळखावे की मुलामध्ये किंवा परिस्थितीमध्ये कोणता तरी दोष निर्माण झाला आहे. निर्माण झालेला दोष दूर करण्याकरिता शिक्षकाला वेगवेगळया युक्त्या कराव्या लागतात. यामुळे काहीकाळ काम योग्य चालले आहे असे वाटते. पण नंतर पहिलीच परिस्थिती पुन्हा निर्माण होते. खरेतर शिक्षकाने परिस्थिती लपवणे, दाबून टाकणे किंवा तिला दुसरे रुप देणे असा प्रयत्न करु नये. उलट याची कारणे त्याने मुळापासून शोधावीत. जो शिक्षक असे करणार नाही तो आपल्या मुलांचा सामाजिक, नैतिक आणि इतर प्रकारचा विकास करु शकत नाही. मूल हे एक अजब कोडे असते. त्याच्या शिक्षणाचा प्रश्न अगदी बारकाईने विचार करुन सोडवावा लागतो. शिक्षकाने त्याचे निरीक्षण शास्त्रीय पद्धतीने केले पाहिले. तटस्थ भावनेतून पाहिल्यानंतर जे करणे योग्य वाटते ते करावे. परंतु ते मुलासाठी हानीकारक नसावे. मुलाला उजळणी किंवा वाचणे न आल्यास त्या प्रकारे शास्त्रीय दृष्टी असणारा शिक्षक त्याची कारणे शोधतो. त्याचप्रमाणे मुलाच्या मानसिक दोषांची कारणे त्याने शोधली पाहिजेत. जर मूल आपल्या इच्छेने आपल्या मनावर, समजून उमजून, नियंत्रण ठेवू शकत नसेल तर त्याच्या अभ्यासामध्ये कोणताच अर्थ नाही हे शिक्षकाने ओळखले पाहिजे. शिक्षकाने मुलांच्या संदर्भात कधीही आळशी, बेजबाबदार, खोटारडा, फसवणारा, नीच, नालायक इत्यादी शब्द वापरु नयेत. कारण अशा शब्दांचा मुलांवर वाईट परिणाम होतो. याच बरोबर हे करु नको, ते करु नको अशा नकारात्मक सूचना शिक्षकाने देवू नयेत. मुलाच्या कमजोरीबद्दल शिक्षकाने टीका किंवा चर्चा करु नये. तसेच मुलांना त्याने भीती दाखवू नये. यामुळे मुलांमध्ये सुधारणा घडविणे अधिक कठीण बनते. शिक्षकाने नीतिबोध अथवा उपदेशाचे काम कमीतकमी करावे. असे करण्याने मुलाची नैतिक भावना आणि संस्कारक्षमता मंद होते. मूल

विनाकारण अस्वस्थ आणि बेचैन बनते. ज्या पद्तधीने मुलाचे वाचन आणि लेखन शिक्षक शास्त्रीय पद्धतीने सुधारेल त्याच पद्धतीने शिक्षकाने मुलाची नैतिकता सुधारावी.

कधीकधी शाळेमध्ये आणि घरामध्ये मुलांमुळे समस्या उभ्या राहतात. मुलाच्या वागण्यामध्ये आपणाला नको असणारा व्यवहार दिसू लागतो. जर आपण त्याचे कारण, परिस्थिती आणि त्यावरील संभाव्य उपाय जाणवले तर शिक्षण आणि बालसंगोपनाचे आपले काम सोपे बनते.

मुलांशी संबंधित अशा समस्या दूर करण्याला उपयोगी ठरेल असा एक तक्ता आम्ही खाली देत आहोत. यासाठी आम्ही श्री. चार्लेटन वॉशबर्न चे आणि श्री संपादक 'न्यू इरा' यांचे आभारी आहोत.

या तक्त्याचे पाच भाग आहेत. पहिल्या भागात मुलाचे माहित असणारे दोष दिले आहेत. दुसऱ्या भागात या दोषांच्या कारणांची चर्चा आहे. तिसऱ्या भागात ज्या परिस्थितीमुळे दोष निर्माण होतात. त्याचा विचार केला आहे. चौथ्या भागात हे दोष दूर करण्याचे उपाय दिले आहेत. शेवटी पाचव्या भागामध्ये मुलांचे वागणे ज्या कारणाने जास्त वाईट बनते ती कारणे दिली आहेत.

या तक्त्यावरुन आपल्याला हे लक्षात येईल की आपण दोष दूर करण्याच्या उपायाऐवजी दोष वाढवण्याचेच उपाय करतो. त्यातून दोष जास्त गंभीर बनतात. याचा पुरावा हा तक्ता देईल.

***

* * * *
* * * *



| क्र. | अपूर्णतेचा प्रकार | संभाव्य कारण | जबाबदार परिस्थिती | उपाय | अशुद्ध उपाय |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरजेपेक्षा जास्त गोंधळ, आवाज | क) अनुकरण करणे | गोंधळाची जागा, जोराचा आवाज, अति उत्साहाचे वातावरण | शांतता<br>संथ आवाज<br>स्वस्थता | छडीने मारणे किंवा घंटा वाजवणे, अगदी रागाने बोलणे, उडवून लावणे, लालूच दाखवणे, सर्वांसमोर टीका करणे, दंगा होतो आहे असे म्हणणे, धमकावणे, गप्प बसवणे |
| | | ब) अवयवांचा थकवा<br>ग) ज्ञान तंतूंचा थकवा | अयोग्य बैठक, अयोग्य काम थकवा आणणारा अयोग्य आहार, अयोग्य आराम | अनुकूल बैठक योग्य तेवढे काम शारीरिक दृष्टीने आराम, चांगला आहार, कार्यक्रमातील बदल | |
| | | घ) खराब हवा | हवेचा कमीपुरवठा | खूप ताजी हवा | एकाच प्रकारचे काम करत राहणे |
| | | च) उद्धटपणा किंवा हट्टीपणा | आपल्या पेक्षा वरच्या दर्जाचा विचार करणे | इतरांना मदत करणे | इतरांना नापसंती दाखवणे |
| | | छ) लक्ष वेधून घेण्याची इच्छा | अयोग्य महत्त्व देणे | इतरांचा विचार करणे | मन दुखावणे<br>भेदभाव करणे |
| | | ज) घाबरणे | घाबरटपणा | स्वस्थपणा | नाराज होणे |
| | | झ) अस्वस्थता | अव्यवस्थित खोली किंवा बसण्याची सोय | व्यवस्थितपणा | दिखावू अशा निरर्थक वस्तूंचा संग्रह |
| २ | वेळेचा दुरूउपयोग किंवा उंडगेपणा | क) विकासाच्या हेतूचा अभाव | मार्ग न सापडणे | वेगवेगळ्य कामांची सूचना | सक्तीने कामाला लावणे |
| | | ख) पुढे जाण्याची इच्छा नसणे | कामातील असंतोष | चांगले काम आणि सहज प्रोत्साहन | टीका करणे |
| | | | खूप सोपे काम | जास्त आवडीचे काम | एकच काम पुन्हा-पुन्हा करायला लावणे |
| | | ग) जबाबदारीचा अभाव | दुसऱ्याने काळजी घेणे | जबाबदारी सोपवणे | शिक्षकाकडून जबाबदारी उचलली जाणे |

| क्र. | अपूर्णतेचा प्रकार | संभाव्य कारण | जबावदार परिस्थिती | उपाय | अशुद्ध उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | घ) तौलनिक शक्तीचा अभाव | इतरांच्या निर्णयानुसार वागणे | तुलना आणि निर्णय करणे | शिक्षकाकडून निर्णय केला जाणे |
| | | च) स्वतःच्या योजनांचा अभाव | इतरांनी योजना करून देणे | स्वतःच्या योजना आखून मार्ग शोधणे | शिक्षकाकडून योजना बनवून देणे |
| | | छ) क्रिया शक्तीचा अभाव | निर्णय दुसऱ्याने घेतलेला असेल, क्रिया शक्ती कमजोर असणे | स्वतः निर्णय करणे | शिक्षकाकडून निर्णय |
| | | ज) विरोधी आकर्षण | शाळा पसंत नसणे नावडते मित्र वाईट सवयी | आवडीचे काम पसंत करणे आई व वडिलांनी लक्ष द्यावे. आई वडील आणि नोकरांनी लक्ष द्यावे | सक्तीने काम करायला लावणे धिक्कार करणे |
| | | झ) लक्ष आकर्षित करण्याची इच्छा | गर्विष्ट आणि स्वार्थी बनण्याची सवय | दुसऱ्यांचा विचार करायला शिकणे, महत्त्व न देणे | सर्वांच्या समोर नावे ठेवणे, दोष काढणे. |
| | | ट) ज्ञान तंतूचा थकवा | कुपोषण, अनियमित जीवन, ज्ञानतंतूंचा अस्थिरपणा | चांगला आहार, नियमित जीवन, विश्रांती देणे | |
| ३ | वारंवार मदत मागणे | क) परावलंबन | इतरांनी निर्णय देणे | स्वतःचा निर्णय | शिक्षकाकडून निर्णय देणे |
| | | ख) बेजबावदारपणा | इतरांनी जबावदारी स्वीकारणे | जबावदारी देणे | शिक्षकाने जबावदारी घेणे |
| | | ग) स्वतःवर अविश्वास | निराशा | आनंददायी काम | अधिक निराशा वाढविणे |
| | | घ) स्वाभिमान नसणे | उघड टीका किंवा निंदा | वैयक्तिक प्रोत्साहन | स्पष्ट रूपात जास्त टीका करणे |
| | | च) आळशीपणा | कुपोषण मानसिक मंदपणा अयोग्य व्यायाम अयोग्य आराम अनियमित आहार अनियमित झोप | पोषक आहार भरपूर काम योग्य व्यायाम विश्रांती नियमितपणा | आहार, मादक पेय, मिठाई यांचा उपयोग बंद करणे |



| क्र. | अपूर्णतेचा प्रकार | संभाव्य कारण | जबावदार परिस्थिती | उपाय | अशुद्ध उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | छ) क्रियाशक्तीचा अभाव | इतरांनी काम करणे दुर्बल क्रिया शक्ती | स्वतः काम करणे | शिक्षकाने काम करणे |
| ४ | मंद प्रगती | क) निराश व्हावे लागले असे वाटणे | मिळालेले अपयश | आनंददायी काम | जास्त निराशा |
| | | ख) कमी आत्मविश्वास | टीका करणे | प्रोत्साहन देणे | इतरांबरोबर तुलना करणे |
| | | ग) अपूर्ण तयारी | वरच्या क्रमांकावर ढकलणे | योग्य जागेवर बसवणे | अद्दल घडवणे |
| | | घ) कामातील कमी उत्साह | शिक्षकाच्या प्रेरणेने काम | स्वतःच्या प्रेरणेने काम | शिक्षकाची प्रेरणा |
| | | च) क्रिया शक्तीचा अभाव | दुसऱ्याची जबावदारी असणे,क्रिया शक्तीची कमजोरी | जबाबदारी सोपवणे स्वतःचा निर्णय | शिक्षकाकडून निर्णय करणे |
| | | छ) महत्वाकांक्षेचा अभाव | कामात किंवा काम करण्यात असंतोष | चांगले काम आणि प्रोत्साहन | उत्साहाचा भंग करणे |
| | | ज) बेसावधपणा | आवड नसणारे काम | विनोद कामातील बदल शारीरिक तपासणी | बेसावध आहे म्हणणे. |
| | | झ) अस्वस्थ शरीर | अयोग्य आहार | योग्य आहार | मिठाई, लोणचे इत्यादीचे उपयोग शाळेत न करू देणे |
| | | | अयोग्य व्यायाम | योग्य व्यायाम | नाटक, सिनेमा जास्त पाहणे |
| | | | अयोग्य विश्रांती अनियमितपणा | योग्य विश्रांती नियमितपणा | |
| | | ट) विस्मरण | आवड नसणारे काम विचार साहचर्याची संथ गती | विषय समजण्यास विविधता प्रत्यक्ष अनुभव | विसराळू म्हणणे |
| | | ठ) वयात आलेला | वरच्या इयत्तेत चढविणे अविकसित मन | खालच्या इयत्तेत घालणे | वरच्या इयत्तेत ढकलणे |
| ५ | फसवणे | क) परिणामाची भीती | दुसऱ्यांची टिंगल दुसऱ्यावर टीका अयोग्य दंड नापास होणे | आनंददायी काम प्रोत्साहन योग्य दंड प्रगतीचा योग्य निर्णय करणे. | लुच्चा म्हणणे सर्वांसमोर नावे ठेवणे व रागावणे अधिक नापास करणे |

| क्र. | अपूर्णतेचा प्रकार | संभाव्य कारण | जबाबदार परिस्थिती | उपाय | अशुद्ध उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | ख) आपल्यावरील अविश्वास | काम स्पष्टपणे सांगितलेले नसणे जास्त वरच्या क्रमांका वर चढविलेला असणे | प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहन देणे, योग्य स्थानावर ठेवणे | टीका व व्यंग दाखवणे चढविणे |
| | | ग) कसेतरी काम पूर्ण करणे | असे काम सक्तीने करणे. | वैयक्तिक काम सोपवणे रचनात्मक कामाची योजना | अशा कामाचे कौतुक होणे |
| | | घ) नक्कल करण्याची सवय | अनुकरण आणि नक्कल करणे | विकासाचा हेतू ठेवणे | नक्कल करून अभ्यास चालू ठेवणे |
| | | च) केवळ उत्तर देण्यासाठी काम करण्याची सवय | कामाची माहिती असणे म्हणजे शिक्षा वाटणे | प्रोत्साहन | फक्त उत्तर पाहून गुण देणे |
| | | छ) स्वाभिमानाची कमतरता | काम कमी प्रतीचे असणे | | थोडी टीका करणे |
| | | ज) मोठे काम करण्याची आवड | सोपविलेले काम खूप सोपे असणे | अवघड आणि जास्त आवडीचे काम देणे | अशी कठीण अवस्था करणे की फसविणे अशक्य व्हावे |
| ६ | हट्टी किंवा चिडचिडे पणा | क) ईर्षा | अयोग्य निर्णय कुटुंबियांच्या मनात मुलावद्दल आवड किंवा प्रेम नसणे, बहीण, भाऊ किंवा शाळेतील मित्राबरोबर भेदभाव केला जातो | मुलांबद्दल ममता दाखवणे | निंदा करणे इतरांचे कौतुक करणे |
| | | ख) प्रत्येक गोष्टीत उत्तेजित होणे | सर्वांसमोर टीका करणे, दोष दाखवणे | सहानुभूती दाखवणे व प्रोत्साहन देणे | सर्वांसमोर निंदा करणे |
| | | ग) तिरस्कार करून अनादर दाखवणे | आडकाठी आणणे हुकूम चालवणे | आडकाठी न आणणे स्वातंत्र्य देणे | सल्ला देणे |
| | | घ) दुःखी होणे | घरातील भांडणे, बाहेरच्या अडचणी, मैत्रीचा अभाव | काळजी, सावधानता, ममता दाखवणे | व्यंग दाखवणे कठोरपणा दाखवणे |
| | | च) आपल्या मतावर ठाम राहणे | अती बलवान क्रिया शक्ती | स्वतःचा अनुभव | हुकूम चालवणे |
| | | छ) स्वार्थीपणा | अती दुर्बल क्रिया शक्ती, स्वतःलाच | इतरांचा विचार करणे | स्तुती करणे |



| क्र. | अपूर्णतेचा प्रकार | संभाव्य कारण | जबाबदार परिस्थिती | उपाय | अशुद्ध उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | | जपायला शिकवलेले असणे | | |
| | | ज) एकाग्रता | पाहिजे ते करण्याची सवय सुदृढ क्रियाशक्ती | अचानक दखल न देणे, विनय | कटकट करत राहणे |
| | | झ) शंकेखोरपणा | अयोग्य टीका | तटस्थ व्यवहार करणे | अविचाराने निर्णय घेणे, निंदा करणे |
| ७ | प्रत्येक गोष्टीत वाईटपणा वाटणे | क) टीका होते आहे असे वाटण्याची सवय | टीका आणि अयोग्य शंका | प्रोत्साहन | अविचाराने निर्णय घेणे |
| | | ख) तिरस्कार करतात असे वाटण्याची सवय | खोचडेपणा | योग्य वागणूक दुसऱ्यांचा विचार करणे, निष्कपट बोलणे | गंभीर बनणे |
| | | ग) खिन्नपणा | अयोग्य आहार अनियमित आणि कमी झोप, ज्ञान तंतूंची पिढीजात दुर्बलता | योग्य आहार नियमितपणा भरपूर झोप | शिक्षा, सूचना |
| ८ | मूर्खपणा | क) आत्मजाणीव | शारीरिक बदल | आई-वडिलांनी लक्ष ठेवावे | कष्टाचे काम, किंवा जोर लावून काम करणे |
| | | ख) परस्पर विरोधी हित | अतिश्रम | कामापासून मुक्तता क्रमांक दोन पहा | |
| | | ग) जबाबदारीची जाणीव नाही | | क्रमांक दोन पहा | |
| | | घ) महात्वाकांक्षा नसणे | | क्रमांक दोन | |
| | | च) क्रियाशक्तीचा अभाव | | क्रमांक दोन पहा | |
| | | छ) अजाण असणे | अपरिपक्वता | खालच्या दर्जात उतरणे | वरिष्ठ दर्जात प्रवेश |
| ९ | शहाणपणाचा अतिरेक वाचाळपणा चपळता | क) वृथा अभिमान | खोटी प्रतिष्ठा मिळणे | दुसऱ्याची काळजी न करता प्रतिष्ठा खेचून घेणे | राग, मन दुखावणे |
| | | ख) व्यवहाराचे अज्ञान | रानटी वातावरणात वाढलेला | अतिशय नम्रता, विवेकाने वागणे, मौनाबद्दल आश्चर्य | अविवेकीपणा |
| | | ग) मोठे म्हणवून घेण्याची इच्छा | कौतुक केले जाणे | मोठेपणा कमी करणे | सर्वांसमोर टीका करणे |

| क्र. | अपूर्णतेचा प्रकार | संभाव्य कारण | जबाबदार परिस्थिती | उपाय | अशुद्ध उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | घ) काही लपवण्या-ची इच्छा | कांही कारणाने लाजणे | विश्वास देणे साहस वाढविणे | |
| | | च) लक्ष खेचून वेधून घेण्याची सवय | घरामध्ये योग्य मान नसणे | आवडीचे काम देणे इतरांचे लक्ष वेधून घेण्याची इच्छा | त्रास देणे |
| | | छ) ईर्षा | घरामध्ये पर्वा केली जात नाही. स्वार्थी प्रवृत्ती | मैत्री, इतरांबरोबर इतरांबद्दल विचार करणे | इतरांचे कौतुक |
| | | ज) संतुलितपणा चा अभाव | खोटे आदेश | शांततेने विचार करण्याचे बंद करणे स्वतःचे नियमन | राग |
| | | झ) चिडवणे | | चिडू नये | राग |

* * * *
* * * *



# १०. मुलांचे घाणेरडे खेळ

मी जेथे जेथे जातो, तेथे तेथे आईवडील मला नेहमी असा प्रश्न विचारतात, 'कधी कधी आमचा मुलगा घाणेरडे खेळ खेळतो, आम्ही जेव्हा त्याला हटकतो किंवा मारतो, तेव्हा तो लपून छपून खेळतो आणि आमच्या बरोबर सर्व लपवून खोटे बोलतो. आम्ही या घाणेरड्या खेळापासून आपल्या मुलाला कसे वाचवावे? आणि त्याबद्दल कोणता उपाय करावा?'

प्रत्येक आई वडिलांपुढे हा प्रश्न कोणत्या ना कोणत्या स्वरुपात उभा राहतोच. कधी मुलांच्या जीवनात असा एखादा क्षण येतो की मुले अशा प्रकारच्या एखाद्या घाणेरड्या खेळात अडकतात किंवा त्या खेळाच्या जवळ तरी जातात. सर्व आई वडिलांनी या बाबतीत बेजबाबदारपणा दाखवू नये. एवढेच नव्हे तर आई वडिलांनी काही विशेष गोष्टींची पक्की काळजी घेतली पाहिजे.

बालपणी मी आपल्या आजोळी एका मुलीसोबत राहात होतो. त्यावेळी आम्ही एखादे घाणेरडे काम करत होतो. हे मला लक्षात येत नव्हते. परंतु ती मुलगी माझ्याकडून कोणतेतरी घाणेरडे काम करुन घेत असावी असे मला अजून ही वाटते. पण आम्हाला 'त्या' संदर्भात काही माहीत - कळत नव्हते. कदाचित यामुळे आम्ही घाणेरड्या खेळात अडकण्यापासून वाचले असू.

आमचे अनुभव आणि निरीक्षणाच्या आधारावर मी असे म्हणतो की मुलांमध्ये हा वाईटपणा सहज आहे. असे म्हणण्यापेक्षा असे म्हणणे अधिक योग्य होईल की हा वातावरणाचा परिणाम आहे. जास्त करुन ती घाण सवय मुलांमध्ये सहवासाने येते आणि एकाकडून दुसऱ्याकडे जाते.

माझा अनुभव असा आहे की ही गोष्ट मुलांना मोठ्या कडूनच मिळते. काही तरुण लहान मुलांबरोबर दोस्ती करतात आणि त्यांना पैसे, मोती, खेळणी किंवा खाण्याचे पदार्थ देतात. मुलांना एकांतात घेवून जातात आणि त्यांच्या हाती वाईट कामे करुन घेतात. मोठ्या वयाचे लोक मुलांना दुसऱ्या प्रकारे बिघडवतात आणि संधी मिळताच त्यांना वाईट सवय लावतात.

लहान मूल अथवा मोठे मूल अशा तरुणांच्या सहवासात पडून घाणेरडे

खेळ शिकते. या खेळात त्यांना काही गंमत वाटू लागते. म्हणून नंतर ते हा खेळ आपापसात सुरु करतात. मोठी मुले ज्या गुप्त परिस्थितीत हा खेळ शिकवतात तशाच परिस्थितीत लहान मुले हा खेळ खेळून लपवू पाहतात. '

याशिवाय मोठ्या वयाच्या मुली सुद्धा या लहान मुलांना घाणेरड्या खेळामध्ये आकर्षित करतात. मुलांमध्ये असे चैतन्य निर्माण करतात की ते मुलांना चांगले वाटते. लहान मुलांना माया दाखवून सुद्धा मुली त्यांच्याबरोबर या प्रकारचे खेळ खेळतात. याच्या परिणामाने लहान लहान मुले मुलीसुद्धा असे घाणेरडे खेळ खेळणे शिकतात आणि ते गुप्त रुपाने या खेळांचा प्रसार करतात. जेव्हा ते पकडले जातात. तेव्हा आपण त्यांना मारतो, धमकावतो म्हणून नंतर ते हा खेळ अधिक गुप्ततेने खेळतात.

आपल्या घरी नेहमी पाहुणे वगैरे येतात. हे लोक सुद्धा वाईट सवय असणारे असू शकतात. आपण त्यांच्याबरोबर आपल्या मुलांना सुरक्षित समजतो परंतु जेव्हा आमची मुले यांच्याबरोबर झोपतात. अजाणतेपणी वाईट खेळ शिकतात. अशा पाहुण्यामध्ये पुरुष आणि स्त्री अशी दोघांचाही समावेश असतो. वसतिगृहासारख्या ठिकाणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अशी शिकवण देण्यासाठी लोक तयारच असतात. जेव्हा अशा लोकांशी आपल्या मुलांची ओळख होते. तेव्हा या ओळखीचा गैरफायदा घेतल्याशिवाय ते राहत नाहीत.

ही वाईट सवय कोठून येते. हे आम्हाला समजू शकते. ही वाईट सवय लावण्यामध्ये सहवास, ओळख आणि एकमेकाबरोबर राहणे या गोष्टी जबाबदार आहेत यात शंका नाही.

या वाईट सवयीकडे मुले झुकण्यामागे त्यांना मिळालेला वारसा जबाबदार आहे. आपण मोठ्या वयाचे लोक ज्या मर्यादेपर्यंत आपल्या मोठ्या वयात किंवा बालपणात या वाईट सवयींचे शिकार झालेले असतो त्या मर्यादेपर्यंत त्याचे फळ आपल्या मुलांना भोगावे लागते. आपल्या मुलांना आपली शक्ती आणि दुबळेपणा, चांगलेपणा आणि वाईट सवयी सुद्धा वारसा म्हणून मिळतात. मूल आमचे बालपण दुसऱ्यावेळी जगत असते. असे करताना ते आम्हाला आमच्या खऱ्या स्वरुपाची आठवण देते. गृहस्थी जीवनातील आमचे आपले जीवन सुद्धा या घाणेरडे पणाला जागवण्याचे अनुकूल वातावरण तयार करण्यात मदत करते. मुलांच्या नजरेपुढे येवू नये अशा प्रकारचे जीवन आम्ही स्त्री आणि पुरुष जगत



असलो किंवा ज्या गोष्टी मुलांच्या कानावर पडू नयेत त्या पडत असतील तर त्यांचा परिणाम मुलांवर होणारच आणि त्याचे नुकसान मुलांना सोसावेच लागणार.

मुले बालपणी आपल्या वातावरणाबद्दल अगदी जागृत असतात. त्यांच्यावर वातावरणाचा परिणाम खोल आणि पक्का हातो. शेजारच्या घरातील, आपल्या घरातील आणि घरातील सर्व लोकांच्या चांगल्या वाईट परिणामांचा मुलांना स्पर्श होतो, हा स्पर्श त्यांच्या नफा नुकसानीला जबाबदार असतो. जेव्हा मूल गाढ झोपेत असते तेव्हा त्याच्या आसपासचे वातावरण त्याला प्रभावित करते. हा प्रभाव केवळ शरीरावरच नव्हे तर त्याच्या मनावर तसेच मनाच्या मुळात राहणाऱ्या इतर शक्तीवर व प्रवृत्तीवर परिणाम करतो.

अशा प्रकारे मुलांच्या घाणेरड्या सवयीमध्ये आईवडिलांचे वागणेही परिणाम करते. मुलांच्या समोर आपण आई-वडील या नात्याने संयम किती पाळतो हे आपणास माहीत आहे. म्हणून मुलांच्या वाईटपणामध्ये आपण जबाबदार नाही किंवा त्यामध्ये आपला वाटा नाही. असे आईवडील म्हणू शकत नाहीत.

ज्यावेळी घरामधील मोठ्या आणि वयस्कर माणसांना काही काम नसते. तेव्हा ही माणसे वाईट मार्गाकडे झुकू लागतात. प्रत्येक माणूस काही ना काही करु इच्छितो. काही ना काही करत राहणे ही माणसाची प्रवृत्ती असते. या वृत्तीचे पोषण झाले नाही, तिला संधी मिळाली नाही, म्हणजे जेव्हा माणसाच्या हातून एखादे काम काढून घेतले जाते. तेव्हा तो बसल्याबसल्या ऱ्हासाचा मार्ग शोधू लागतो. म्हणजेच तो एखाद्या वाईट कामामध्ये फसू लागतो. विकृती किंवा वाईट प्रवृत्ती हे चांगल्या प्रवृत्तीला अडवून धरणारे विष आहे. वाहते पाणी अडवून ठेवले तर त्याची दुर्गंधी येवू लागते. ते पाणी रोगाला कारण ठरते. त्याच प्रमाणे अशा प्रवृत्तीला अडवण्यात विकृती उत्पन्न होते. त्यातून वाईट सवय लागते.

मुलांना जेव्हा घरात काहीच करायला मिळत नाही, जेव्हा त्यांना घरात कोणते काम मिळत नाही, ज्यामध्ये त्यांना आपले हात, पाय, डोळे आणि मन तसेच बुद्धी इत्यादीचा उपयोग करावा लागतो, जेव्हा त्यांना एखादे काम करायचे असते, तेव्हा काम करत राहण्याचा त्यांच्या सहज आवडीचा पवित्र झरा वाहता वाहता थांबतो. तेव्हा त्यामध्ये दुर्गंधी निर्माण होते. संगतीने निर्माण झालेली वाईट सवय त्याचवेळी जोर धरते. कारण अशावेळी मुलांना आपल्या आवडीचे काम करायला मिळालेले नसते. आईवडील मुलांच्या हातातून एखादे काम काढून

घेतात, त्याला अद्दल घडविण्यासाठी एखाद्या कोपऱ्यात बसवतात तेव्हा वाईट कामे वाढू लागतात. जी वाईट सवय मोठ्या माणसाकडून लहान मुलांना मिळते. त्याचेही कारण हेच आहे. कामाचा अभाव, खोटी सवय, कामकाजावर बंधन आणि कामकाजाचा विरोध यामुळे मोठी माणसे बिघडतात.

आपण आपल्या घरात मुलांना कोणतेही काम देत नाही. कारण आपण मुलांना कोणते काम द्यावे हे आपणालाच समजत नाही. मुले अनेक प्रकारची कामे करु इच्छितात. पण आपणच त्यांना वेगवेगळया कारणाने काम करण्यापासून अडवून ठेवतो. आपल्याला वाटते की, हे काम मूल करु शकणार नाही, ते काम करणे जाणत नाही. हे काम करता करता त्याला एखादी इजा होईल किंवा मुलाने काम केले तर वस्तू बिघडतील. भांडी फुटतील. कपडे फाटतील. कारण काम करणे हे मुलांसाठी आवश्यक नाही. काम करताना मुले एखादा अनुभव घेत असतात ते त्यांचे कामच असते. जर आपण मुलांकडून एकामागून एक काम काढून घेतले तर मुलांमध्ये विकृती निर्माण होते. हीच विकृती पुढे विविध रुपे धारण करते. सर्व प्रकारच्या वाईट कामात रस घेणे, वाईट काम करणे, घाणेरडे खेळ खेळणे, घाणेरड्या गोष्टी बोलणे ही वेगवेगळया प्रकारची विकृती आहे.

या सर्व गोष्टी मुलांच्या घाणेरड्या खेळाच्या मुळाशी आहेत. घरामध्ये त्यांच्या वाढीला पोषक वातावरण मिळते.

अशा स्थितीमध्ये घरातील मोठ्या आणि वयस्कर लोकांनी काय करावे? सर्वात प्रथम आपण मुलांना कोणते ना कोणते तरी काम दिले पाहिजे. लिहिणे वाचणे हे सुद्धा एक काम आहे. परंतु या कामामध्ये मुलाची सृजनशीलता वाढण्याला पूर्ण संधी मिळत नाही. यामुळे त्यांना खूप कमी काम आणि कमी विश्रांती मिळते. मूल आपल्या हात व पायांचा उपयोग करुन एखादी चांगली गोष्ट निर्माण करेल त्या कामाला सृजनशील काम म्हणता येईल. मातीची खेळणी बनविणे, लाकडी वस्तू तयार करणे, हातोडी, खिळा, लाकूड यांच्या मदतीने विविध वस्तू तयार करणे, खड्डा खोदणे, बागेत काम करणे, झाडांना पाणी देणे, झाडलोट करणे, भांडी घासणे, कपडे धुणे, घरातील वस्तू सजवून ठेवणे. सुरी आणि कात्रीच्या मदतीने कित्येक उपयोगी वस्तू बनवणे. इत्यादी कामे मुलांना द्यावीत. ही कामे मुलांमधील सध्याच्या सृजनशील वृत्तीला गती देतील. त्याच्या मदतीने प्राण ओततील आणि मुलाला समाधानी करतील. यामुळे मुलाचे वाईट



मार्गाने जाणे सहज बंद होईल. घाणेरडे खेळ खेळून शरीर आणि मनाला घाणेरडे करण्यापेक्षा या खेळांनी हातपाय घाणेरडे होत असतील किंवा कपडे घाणेरडे होणार असतील तर त्यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही. याशिवाय हे सर्व खेळ मुलाच्या शरीराला उजळ तसेच मनाला स्वच्छ आणि निरोगी बनवतील. घाणेरडे खेळ हा मनाचा आजारीपणाच आहे. मनाच्या या आजारी पणाचे एकच औषध आहे. ते म्हणजे काम - असे काम जे मुलाच्या आवडीचे व त्याच्या उपयोगाचे असेल.

वर सुचविलेल्या कामाऐवजी नाटक करणे, नाचणे, खेळणे, उडी मारणे, नटणे, वस्तू व्यवस्थित ठेवणे इत्यादी कामात मुले आवड दाखवतात. ही सर्व कामे करताना तसेच ज्यामध्ये हात आणि पायांचा उपयोग करावा लागतो, ज्यामध्ये ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये वापरुन वस्तू बनवायच्या असतात, अशी कामे मुलांना पतन होण्यापासून वाचवतात. तसेच त्यांचे चरित्र घडवतात.

खूप काही जाणून घेणे म्हणजे चारित्र्य नव्हे. पोपटाप्रमाणे खरे काय आणि खोटे काय हे बोलणे म्हणजे चारित्र्य नव्हे. चांगले आणि वाईट समजणे म्हणजे चारित्र्य नव्हे. चारित्र्य म्हणजे वाईट कामापासून दूर जावून चांगले काम करणे. ज्याची हात-पाय इत्यादी कर्मेंद्रिये आणि डोळे, कान इत्यादी ज्ञानेंद्रिये स्वस्थ, बलवान, तेजस्वी व नियंत्रित असतात. असाच माणूस चांगले आचरण करु शकतो. सतत काम करण्याने आणि हालचाल करण्याने परिस्थिती नियंत्रणात राहते. खुर्चीवर बसून वाचन करण्याने किंवा विचार करत राहण्याने परिस्थितीवर नियंत्रण राहत नाही. काम हाच चारित्र्याचा पाया आहे.

आपल्या मुलांना सतत काम देत राहण्याची व्यवस्था करणे हे समजूतदार आईवडिलांचे काम आहे. मुलांना शिकण्याकरिता शिक्षक ठेवणे हे आपले काम नसून तो आपल्या कामाला विरोध असतो. शिक्षक मुलाला जबरदस्तीने बसवून जितका वेळ शिकवतो तितका वेळ मूल आपल्या आत सडत राहते आणि वाईट बनण्याच्या तयारीला लागते. याशिवाय मूल जेव्हा आनंदाने खेळते, उड्या मारते, नाचते, गाते, खांदते, विणकाम करते, मोडतोड करते तेव्हाच ते तयार होत असते. मोठे बनत असते आणि माणूसपणा प्राप्त करत असते.

अभाव असणाऱ्या वातावरणात, शून्य स्थितीमध्ये कोणतेही काम होत नाही. आपल्या घरातील वातावरण कामकाजाने भरलेले ठेवणे तसेच त्या प्रकारचे

पोषक वातावरण तयार करणे हे आपले कर्तव्य आहे. यासाठी वर ज्या सृजनशील कामांची चर्चा केली त्यासाठी आवश्यक साधने आपण आपल्या घरात उपलब्ध करावीत. घरामध्ये मुलाला एक जागा देवून तेथे त्याच्या आवडीचे काम करण्याचे स्वातंत्र्य द्यावे. मुलांच्या या कामातून आपण कोणत्या उत्पन्नाची आशा ठेवू नका. त्यांच्या कामात सुंदरता आणि परिपूर्णता नाही आली तर त्यांना त्रास देवू नका. आपण आपल्या मुलाने घरातील भांडी घासावीत अशी इच्छा धरत नसतो. यासाठी नोकर आहेतच. घर झाडून पुसून स्वच्छ करण्याचे काम आपण आपल्या मुलांना देत नाही. आपण यातून आपले कष्ट वाचवत नाही. परंतु आपल्या मुलाचे जीवन चांगले व्हावे, त्याचा विकास व्हावा, त्याची शक्ती वाढावी असे वातावरण तयार करतो. येथे मुलाच्या विकासाची अपेक्षा असते. घराची सफाई करणे, भांडी घासणे हा फायदा नाही. चारित्र्य निर्माण करण्यात या कामाला महत्त्व नाही. जर कामामुळे चारित्र्य बनत नसेल तर ते काम आपोआप एक मौल्यवान वस्तू बनते. तोच मोठा लाभ आहे.

दुसरी गोष्ट सहवासाची आहे. याबद्दल आई-वडिलांनी सतत जागरुक राहिले पाहिजे. जी गोष्ट संसर्गजन्य रोगांची आहे तीच सहवासाची आहे. भले संसर्गजन्य रोग बाहेरुन येत असतील, ते नुकसान करत असतील. त्याचप्रमाणे सहवास सुद्धा बाहेरचा असतो आणि तो वाईट परिणाम करतो.

मुलांनी एकत्र येवून खेळावे अशी व्यवस्था आईवडिलांनी करावी. मुलांनी एकांत जागी, पडद्यामागे, जिन्याखाली किंवा कपाटामागे खेळू नये. कोणाला ऐकू जाणार नाही अशी कुजबूज आपापसात करु नये. लपून छपून आणि गुपचुप कोणतेही काम करु नये. जे काही करायचे ते मोकळया वातावरणात करावे. आपली मुले कोणत्या प्रकारचे खेळ खेळतात हे आई वडिलांनी वारंवार पहावे. आपल्या मुलाच्या आसपास कोणती मुले आहेत हेसुद्धा पहावे. खूप मोठ्या मुलामध्ये अगदी लहान मुलांना मिसळू देवू नका. बरोबरीच्या मुलांबरोबर मूल एकांतात जावून कुजबुजत असेल किंवा लपून खेळ खेळत असेल तर तो प्रकार थांबवा, सुरवातीला मूल एकांत शोधेल नंतर गुपचुप खेळेल व शेवटी वाईट खेळ खेळू लागेल. या सर्वांची पहिली पायरी एकांताचा शोध ही असते. बिघडलेले मूल एकांताचा अर्थ समजते. ते आपणाला कोणी पाहू नये याची अगदी सुरवातीपासून काळजी घेते. आपण आपल्या एखाद्या नातेवाईकाकडे अविश्वासाने पाहून त्यांच्यात



घबराट निर्माण करु नका. तरीपण त्यांचे रंगढंग ओळखून त्यांना आपल्या मूलापासून दूर ठेवा. असे करण्यात खोटी लाज किंवा संकोच ठेवू नका. अशा नातेवाईकांना दूर ठेवा. त्यांच्याशी मुलांनी खेळू नये याची मुलांना कल्पना द्या. घाणेरड्या/वाईट मुलांच्या आई वडिलांपासूनही सावध राहा. जर मनाई करुनसुद्धा आपले मूल घाणेरड्या सवयी असणाऱ्या मुलांबरोबर खेळत असेल किंवा तशा मुलाबरोबर खेळण्याचा हट्ट धरत असेल तर असे करण्यापासून त्याला अडवण्यात मागेपुढे पाहू नका. वाईट मुलांबरोबर खेळणे चांगले नाही. हे आपल्या मुलाला अगोदरच समजावून सांगा. जर मुलाला आपले म्हणणे आवडले नाही तर आपल्या मुलाला थांबवा. दुसऱ्या बाजूने आपल्या मुलांपुढे चांगल्या चांगल्या सुंदर कामांची साधने ठेवा. आपण मुलांना फक्त अडवून ठेवले तर मूल हळूच संधी साधण्याचा प्रयत्न करेल. त्याला हवे ते वाईट काम आपल्याला फसवून करेल. एवढेच काय तर ते दुप्पट वेगाने वाईट गोष्टीत अडकेल आणि दुसऱ्यालाही अडकवेल. म्हणून त्यांना चांगल्या कामात गुंतवा.

आपण आपल्या मुलाला गल्लीमध्ये खेळायला जावू न देण्यासाठी परिस्थिती आता राहिलेली नाही. आता गल्ल्या तर घाणेरडेपणाचे आगार बनलेल्या आहेत. बहुतेक मुलांना यामधूनच वाईट सवयी लागतात. मुलांना घरात बंद करुन ठेवता येत नाही व ठेवू नका. मूल खेळणे, पळणे, उड्या मारणे, आपल्या बरोबरीच्या मुलांमध्ये मिसळणे यासाठी घरामधून गल्लीमध्ये जाते. आपल्या बरोबरीच्या मुलांबरोबर मैत्री करणे मुलांना गरजेचे असते. आपण त्यांना त्यांच्या मित्रामध्ये जाण्यापासून अडवले तर ते आपली नजर चुकवून पळून जातात. मित्रांच्या मैत्रीबरोबरच त्यांच्यापासून काही वाईट गोष्टीही शिकतात.

आपल्या मुलांच्या मित्रांनी त्यांना भेटायला आपल्या घरी यावे अशी सोय आई वडिलांनी करावी. आपल्या मुलांच्या मित्रांना आपण स्वीकारावे. मुलांच्या स्वस्थ वातावरणासाठी त्यांच्या काही निवडक मित्रांना आपल्या घरात स्थान द्या. आपण आपल्या मित्रांसाठी खूप वेळ काढतो आणि खूप पैसा खर्च करतो. अशा वेळी आपण आपल्या मुलांच्या मित्रासाठी थोडे पैसे खर्च केले तर आपल्या मुलांना स्वस्थता आणि आनंद मिळेल.

विशेष म्हणजे घाणेरड्या कपड्यांची आणि अस्वच्छ शरीराची मुले वाईट सवयीकडे लवकर झुकतात हे आपण लक्षात घ्या. यामुळे मुलांच्या मनातील

वाईट वृत्तीलापोषक वातावरण बनते. म्हणून मुलांचे कपडे व अंग एकदम स्वच्छ ठेवा. कपडे स्वच्छ, नीटनेटके आणि योग्य प्रमाणात सैल असावेत. घट्ट व तंग कपड्यापासून मुलांना वाचवा. मुलांचे अंग खाजू लागले किंवा शरीराचा एखादा भाग त्याला चोळावा वाटला तर त्या पासून त्याला वाचवा. हे सर्व अयोग्य आहे. या किरकोळ गोष्टींची सुद्धा व्यवस्था आपणाला करावी लागेल.

घाणेरडे खेळ खेळण्याबद्दल आपल्या मुलाला मारणे, धाक दाखवणे, त्याला भीती दाखवणे असे प्रकार करु नका. आपण आपल्या मुलाला मारहाण करण्याची वृत्ती ठेवणे म्हणजे आपली सौजन्यता कमी होणे होय. मुलांना मारहाण करणे ही एक विकृती आहे. एक वाईट सवय आहे. मारहाण करण्याने विकृती न संपता वाढत राहाते. मार खाणारे मूल इतरांना मारायला शिकते व एवढेच नव्हे तर इतरांना घाणेरडे आणि वाईट बनवायला शिकते. मारहाणीच्या रसायनातून वाईटपणा आपोआप जन्माला येतो. म्हणून मारहाण करणे वर्ज्य करा.

भीती दाखवणे आणि धमकावण्याने मूल लबाड बनते, चोर बनते. भीती नेहमी माणसाला चोर आणि धूर्त बनवते भीतीमुळेच माणूस बुद्धीचा उपयोग वाईट रीतीने करतो. माणसाची शुद्ध प्रवृत्ती मळकट बनते. म्हणून ज्यावेळी मूल एखादे घाणेरडे काम करेल तेव्हा त्याला धाक दपटशा दाखवू नका. ज्याप्रमाणे आपण मुलाला ताप आल्यावर औषध देतो त्याप्रमाणे मूल एखाद्या वाईट कामात अडकले तर त्या वाईट कामाला आजारपण समजून त्याच्यावर उपाय केला पाहिजे. मारहाण करणे किंवा भीती दाखवणे हा आजारपणा वरील उपाय नव्हे. ते आजारपणावर झाकण्याचे एक झाकण आहे. वरुन दाबलेले आजारपण हे आजारपणच राहाते. आणि ते माणसासाठी घातक बनते. त्याचप्रमाणे मूळ कारण न शोधता वरुन दाबून ठेवलेला वाईटपणा जसाच्या तसा राहतो. शेवटी तो तोडून फोडून बाहेर येतो. त्यामुळे मूल हैराण आणि त्रस्त बनते. मुलाच्या वाईट वृत्ती आपण दाबून न ठेवता त्या दूर कराव्यात. दूर सारलेली वृत्ती दूर जाते.

भीती दाखवणे आणि धमकावण्याने मुलाला लाज वाटेल असे करु नका. लाज वाटण्याने मुलाला अपमान वाटतो. असा अपमान सहन करण्यापेक्षा आईवडिलांना न समजू देता त्याच्याबद्दल त्यांनी खबरदारी घेतली तर याचा आईवडिलांना पत्ता लागत नाही. तसेच आता मी हे काम करु शकणार नाही असे मुलाला वाटते. परंतु मूल पुन्हा ते काम करु लागते. कारण आता त्याचे हात अशा



कामात गुंतलेले असतात.

अमूक एक काम करणे चांगले आहे आणि अमूक एक काम करणे वाईट आहे. असा उपदेश मुलांना करु नका. चांगलेपणा आणि वाईटपणा यांना समजून उमजून घेवून सुद्धा माणूस चांगले वाईट काम करतच राहतो. कारण त्याची क्रियाशक्ती दुर्बल बनलेली असते. उपदेशाने गोष्ट लक्षात येते पण तिची अंमलबजावणी करण्याची शक्ती येत नसते. उपदेशामुळे निर्माण झालेल्या समजूतदारपणामुळे मनामध्ये भावना निर्माण होते. चांगला निश्चय करण्याची वृत्ती तयार होते. पण यामधून त्याच्यावर अंमल करण्याची शक्ती प्रकट होत नाही. कारण केलेल्या निश्चयाला कार्यामध्ये रुपांतरित करण्यासाठी क्रिया शक्तीच्या बळाची आवश्यकता असते. म्हणून मुलांना उपदेश करण्याऐवजी आपण काम करण्याची साधने द्यावीत. चांगला सहवास द्यावा आणि चांगले वातावरण द्यावे. जोपर्यंत हातामध्ये काम आहे. जोपर्यंत मनामध्ये कामाचा विचार आहे, जोपर्यंत चांगली संगत आहे आणि जोपर्यंत वातावरण स्वच्छ आणि निर्मळ आहे तोपर्यंत मूल वाईट कामापासून सुरक्षित आहे.

❊❊❊

✻ ✻ ✻ ✻
✻ ✻ ✻ ✻